CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३५३ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

बळीराजाला सुखी, समाधानी ठेव

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पांडुरंगाला साकडं

## दर्शन मंडपाचे काम जलद गतीने करून भाविकांना कमी वेळेत दर्शनाची सुविधा द्यावी

तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर
पंढरपूर, दि. २ नोव्हेंबर -

**श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांना कमी वेळ लागावा तसेच दर्शन रांगेमध्ये पाणी, बैठक व्यवस्था यासह सर्व प्रकारच्या सुविधा मिळाव्या याकरिता तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन मंडप निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने १३० कोटीचा निधी मंजूर केलेला होता. या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून प्रशासनाने हे काम अत्यंत जलद गतीने पूर्ण करून भाविकांना दर्शनाची सुविधा सुलभ व कमी वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी रामराव वालेगावकर यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, तानाजी सावंत, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

(पान नं. ५ वर...)

### कार्तिकी यात्रेसाठी पाच कोटींचा निधी

यावर्षीच्या कार्तिकी वारीमध्ये भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त पाच कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्याचेही श्री.शिंदे यांनी सांगितले.

### कायमस्वरुपी मोफत एसटी पासची घोषणा

राज्य परिवहन महामंडळ मार्फत मानाच्या वारकऱ्यांना वर्षभर एसटीने प्रवास करण्यासाठी मोफत पास दिला जातो. यापुढील काळात या वारकऱ्यांना कायमस्वरूपी एसटीचा मोफत पास देण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.



### मानाच्या वारकरी दांम्पत्याची २० वर्षापासून सुरु आहे वारी

शासकीय महापूजेवेळी उपस्थित राहणाऱ्या मानाच्या वारकरी निवडीसाठी दर्शन रांगेतून मु.पो. पोटा।।बू ।। ता.हिमायतनगर जि नांदेड येथील रामराव बसाजी वालेगावकर व सुशिलाबाई रामराव वालेगावकर या दांम्पत्याची निवड करण्यात आली. रामराव (वय ४२) यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले असून ते शेती करतात. गेल्या २० वर्षापासून ते कार्तिकी वारी करतात. वालेगावकर दाम्पत्याला दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### बळीराजावरील अरिष्ट दूर कर

राज्यातील शेतकऱ्यावर मोठे संकट आलेले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून शासनाने ३२ हजार कोटीचे पॅकेज जाहीर केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी समितीची स्थापना केल्याची माहिती उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली. बळीराजावर आलेले अरिष्ट दूर कर, त्यांना सुख व समाधानाचे दिवस येऊ दे, असे साकडं पांडुरंगाला घातले असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे सांगितले.

### पर्यटन विकास मंडळाची जागा आणखी पुढे तीस वर्षे मंदिर समितीच्या ताब्यात

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे असलेली महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाची जागा आणखी पुढे तीस वर्ष राहील असा करार लवकरच करण्यात येणार आहे. तसेच सर्वे नंबर १६१ मधील जागा मंदिर समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्यात नगर विकास विभागाला सादर करावा, याबाबतचाही निर्णय तात्काळ घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली.

---

### विचारपुष्प



संपूर्ण हिंदू समाजाच्या ऐक्यावर आपल्या जीवनाची श्रद्धा असली पाहिजे. तर मग समाजावर होणाऱ्या आघातांनी आपले मन हेलावून जाईल. घराच्या कुठल्याही कोपऱ्यात जर आग लागली तर घरातील सारे जण लगेच आग विझविण्यासाठी का पुढे धावतात? 'घर माझे आहे' अशी आत्मीयतेची भावना साऱ्यांच्या अंत:करणात असल्यामुळेच. याप्रमाणेच आपल्याला असे वाटले पाहिजे की देश माझे घर आहे आणि समाज माझा परिवार आहे.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह


### महत्त्वाचे

#### यूपीआय व्यवहारांनी गाठला नवीन विक्रम

**नवी दिल्ली** : सणासुदीच्या हंगामाने डिजिटल पेमेंटसाठी एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. ऑक्टोबरमध्ये, मध्ये २७.२८ लाख कोटी किमतीचे विक्रमी २०.७ अब्ज व्यवहार झाले. हे आकडे मागील महिन्याच्या सप्टेंबरच्या तुलनेत व्हॉल्यूममध्ये ५ टक्के वाढ आणि मूल्यात १० टक्के वाढ दर्शवतात. एनपीसीआयच्या ताज्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबरमध्ये दररोज सरासरी ६६८ दशलक्ष व्यवहार झाले, ज्याचे मूल्य अंदाजे ८८,००० कोटी होते. सणासुदीच्या काळात खरेदीला चालना मिळाली, ज्यामुळे वापरात लक्षणीय वाढ झाली. दिवाळी आणि दसऱ्यासारख्या सणांमध्ये, लहान खर्चापासून ते मोठ्या व्यावसायिक पेमेंटपर्यंत सर्व काही वापरून केले जात असे. एनपीसीआयच्या मते, जीएसटी २.० मध्ये सवलती दिल्याने व्यावसायिक क्रियाकलापांनाही पाठिंबा मिळाला.

#### अमली पदार्थ, नकली नोटांसह गांजा जप्त

**रिसोड** : उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार रिसोड शहरातील अमरदास नगर येथे कारमधून एमडी ड्रग्ज, गांजा व एक लाख ८५ हजार रुपयांच्या पाचशे रुपयांच्या ३७० नकली नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून रिसोडमधील कोण या प्रकरणात सहभागी आहे याची चौकशी होणे जरूरी असल्याचे बोलले जात आहे.ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या पथकाने २ नोव्हेंबर रोजी केली. या प्रकरणात दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. बातमी लिहीपर्यंत मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन रोड शहरात दाखल झाली असून एमडी ड्रग्जची चाचणी करून त्याची किंमत ठरविण्यात येत आहे.



# सागरावर 'तिसरा डोळा'

**सीएमएस-०३ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण • बाहुबली एलव्हीएम ३-एम ५ रॉकेटचा वापर • नौदलाची क्षमता वाढणार**

♦ **श्रीहरिकोटा, २ नोव्हेंबर**

येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून नवीन पिढीच्या स्वदेशी बाहुबली रॉकेटच्या माध्यमातून सर्वात वजनदार दळणवळण उपग्रहाचे रविवारी सायंकाळी ५.२६ वाजता यशस्वीपणे प्रक्षेपण करण्यात आले. त्यानंतर तो कक्षेत स्थापन करण्यात आल्याची माहिती इस्रोने दिली. नौदलासाठी तो समुद्रातील तिसरा डोळा ठरणार आहे.

४,४१० किलो वजनाचा सीएमएस-०३ हा उपग्रह एलव्हीएम३-एम५ रॉकेटच्या माध्यमातून प्रक्षेपित करण्यात आला. या माध्यमातून भारतीय अंतराळ संस्था इस्रोने आणखी एक पराक्रम घडवला. सीएमएस-०३ हा एक मल्टीबॅण्ड कम्युनिकेशन उपग्रह आहे आणि तो भारतीय भूभागासह महासागरीय भागात विस्तृत सेवा प्रदान करेल, अशी माहिती इस्रोने दिली. या उपग्रहात देशात विकसित करण्यात आलेले अत्याधुनिक तांत्रिक उपकरणांचा वापर करण्यात आला. याच्या मदतीने भारतीय नौदलाची संचालन क्षमता आणखी बळकट होणार आहे.

इस्रोने 'एक्स'वरील पोस्टमध्ये एलव्हीएम३-एम५/सीएमएस-०३ मोहिमेची माहिती दिली. यात सीएमएसच-०३ रॉकेटपासून यशस्वीपणे वेगळे झाले. हे एक अचूक प्रक्षेपण असल्याचे इस्रोने म्हटले आहे. सीएम-०३ हा एक मल्टीबॅण्ड दळणवळण उपग्रह आहे. याची नजर भारतीय भूभागासह समुद्रातही राहणार आहे. तो किमान १५ वर्षे सेवा देईल, अशी माहिती इस्रोचे प्रमुख व्ही नारायणन् यांनी दिली. या उपग्रहात कित्येक नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. आत्मनिर्भर भारताचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. देशाच्या संचार व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण हा उपग्रह आहे. (वृत्तसंस्था)

> "आपले अंतराळ क्षेत्र आपल्याला अभिमानाचे क्षण देत आहे! भारताचा सर्वात वजनदार दळणवळण उपग्रह सीएमएस-०३च्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल इस्रोचे अभिनंदन. अंतराळ शास्त्रज्ञांच्या मदतीने आपले अंतराळ क्षेत्र उत्कृष्ट झाले, हे कौतुकास्पद आहे. त्यांच्या यशाने राष्ट्रीय प्रगतीला चालना दिली आहे."
>
> **पंतप्रधान नरेंद्र मोदी**

### उपग्रहाची तांत्रिक माहिती

- **वजन आणि आकार** : ४४१० किलो वजनाचा उपग्रह भारताचा सर्वात वजनदार संचार उपग्रह आहे. यापूर्वीचे उपग्रह वजनाने हलके होते.
- **ट्रान्सपॉँडर्स** : या उपग्रहात संचार उपकरणे आहेत. ते ध्वनी, डेटा आणि व्हिडीओ लिंकला कित्येक बॅण्ड्सच्या फ्रिक्वेन्सीवर सपोर्ट करतील. म्हणजेच नौदलाच्या नौकेवरून किंवा विमानातून अत्यंत सुलभपणे संपर्क साधता येईल.
- **कव्हरेज एरिया** : हा उपग्रह भारतीय महासागर क्षेत्रात बळकट टेलिकम्युनिकेशन कव्हरेज देईल. म्हणजेच हिंद महासागराच्या मोठ्या भागात मजबूत सिग्नल मिळतील.
- **हाय कॅपेसिटी बॅण्ड्सविड्थ** : हा उपग्रह मोठ्या प्रमाणात डेटा ट्रान्सफर करेल. याच्या माध्यमातून नौका, विमान, पाणबुड्या आणि नियंत्रण कक्षात सुरक्षित आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय संपर्क स्थापन करता येईल.

### भारतीय नौदलासाठी महत्त्वपूर्ण का?

सध्याच्या परिस्थितीत सागरी सुरक्षा आव्हान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. चीन-पाकिस्तानसारख्या शेजारी देशांमुळे हिंद महासागरात तणाव निर्माण झाला आहे. जीसॅट-७ आरच्या माध्यमातून नौदलाला अंतराळात नजर ठेवण्यासह तातडीने कारवाईसाठी बळ मिळेल. हा उपग्रह देशाच्या सामुद्री संरक्षणात एक मोठे पाऊल असल्याचे नौदलप्रमुख दिनेश त्रिपाठी यांनी म्हटले.

**मजबूत दळणवळण** : पूर्वी उपग्रहाच्या माध्यमातून मर्यादित दळणवळण होते. आता ते वेगवान आणि अधिक सुरक्षित होईल

**पाळत वाढेल** : सागरी क्षेत्रात शत्रूच्या हालचालींवर पाळत ठेवणे सोपे होईल.

**आत्मनिर्भरता** : हा उपग्रह १०० टक्के भारतीय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार करण्यात आला. यामुळे आपले विदेशातील उपग्रहांवरील अलंबन कमी होईल.

# हत्येच्या आरोपात जदयू उमेदवाराला अटक

**निवडणूक आयोगाच्या निर्देशानंतर पोलिसांची कारवाई**

♦ **पाटणा, २ नोव्हेंबर**

बिहारच्या मोकामा भागात निवडणूक प्रचारावेळी संयुक्त जनता दल पक्षाचे उमेदवार अनंत सिंह आणि जनसुराज्यचे नेते पीयूष प्रियदर्शी उर्फ लल्लू मुखिया यांच्या समर्थकांमध्ये हाणामारीची घटना घडली. या घटनेत दुलारचंद यादव यांचा मृत्यू झाला होता. निवडणूक आयोगाने कारवाईचे निर्देश दिल्यानंतर पोलिसांनी माजी आमदार व जदयूचे उमेदवार अनंत सिंह यांच्यासह त्यांचे साथीदार मणिकांत ठाकूर आणि रंजीत राम यांना शनिवारी रात्री अटक करण्यात आली.

अटकेच्या कारवाईनंतर अनंत सिंह आता कारागृहातूनच निवडणूक लढवणार आहे. पोलिस अधीक्षक कार्तिकेय शर्मा यांनी सांगितले की, बाढ येथून अनंत सिंह यांच्यासह तिघांना अटक करण्यात आली. ३० ऑक्टोबरला प्रतिस्पर्धक असलेल्या दोन राजकीय गटात हाणामारी झाली. त्यावेळी झालेल्या दगडफेकीत अनेक लोक जखमी झाले. हिंसाचाराच्या घटनेनंतर ७५ वर्षीय दुलारचंद यादव यांचा मृत्यू झाला. दोन्ही गटाकडून आलेल्या तक्रारीनंतर गुन्हे दाखल करण्यात आले. शवविच्छेदन अहवालात वाहनाने चिरडल्याने दुलारचंद यादव यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. दरम्यान तक्रारीच्या आधारे अनंत सिंह व त्यांच्या



अटक केल्यानंतर न्यायालयात घेऊन जाताना पोलिस

साथीदारांवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हाधिकारी एस.एम. त्यागराजन यांनी सांगितले की, मोकामा विधानसभा क्षेत्रातील घटना जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी खूप गांभीर्याने घेतली आहे. कारवाई करून किमान ८० लोकांना अटक केली. सामाजकंटकांकडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. (वृत्तसंस्था)

# 'सत्याचा मोर्चा' आयोजकांवर गुन्हा

**बेकायदेशीर सभा, आदेश उल्लंघन प्रकरणी कारवाई**

♦ **मुंबई, २ नोव्हेंबर**

मुंबईच्या रस्त्यावर निवडणूक आयोगाच्या विरोधात महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी संयुक्तपणे काढलेला सत्याचा मोर्चा आता आयोजकांच्या अडचणी वाढवणारा ठरला आहे. पोलिसांनी या मोर्चाला औपचारिक परवानगी नाकारली असतानाही, प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करून आणि बेकायदेशीरपणे सभा घेतल्याबद्दल मुंबई पोलिसांनी या मोर्चाच्या आयोजकांवर कठोर कारवाई केली असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मतदार याद्यांमधील कथित घोळ आणि दुबार मतदारांच्या मुद्यावरून महाविकास आघाडी आणि मनसेच्या वतीने निवडणूक आयोगाच्या विरोधात शनिवारी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. या मोर्चाला सत्याचा मोर्चा असे नाव देण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. यापूर्वी झालेल्या मराठा आंदोलनावेळी सर्वसामान्यांना झालेल्या त्रासामुळे आणि उच्च न्यायालयाच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे पोलीस परवानगी देण्यास टाळाटाळ करत असल्याचे बोलल्या जात होते. परवानगी नाकारल्यानंतरही मोर्चा काढल्यास कायदेशील कारवाई केली जाईल, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या होत्या. गुन्हे दाखल झाल्याने ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# मध्यप्रदेशात जहाल महिला माओवाद्याची शरणागती

♦ **बालाघाट, २ नोव्हेंबर**

मध्यप्रदेशातील बालाघाट येथे जहाल महिला माओवाद्याने शरणागती पत्करली. तिच्या शिरावर १४ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

सुनीता असे तिचे नाव आहे. तिने १ नोव्हेंबर रोजी पोलिसांच्या विशेष नक्षलविरोधी पथक हॉक फोर्सचे सहाय्यक कमांडर रूपेंद्र धुर्वे यांच्यासमोर शस्त्रे ठेवली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रतिबंधित भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या (माओवादी) केंद्रीय समितीचा सदस्य आणि एनएमसी झोन प्रभारी रामदरची ती सशस्त्र रक्षक होती. सुनीतावर छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश पोलिसांनी संयुक्तपणे १४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ती छत्तीसगडच्या बिजापूर तहसीलमधील भैरमगड येथील गोमवेटा येथील रहिवासी आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सुनीताकडे इन्सास रायफल होती. ती मध्यप्रदेश, महाराष्ट्रातील गोंदिया आणि छत्तीसगडमधील राजनांदगाव येथे सक्रिय होती. बेकायदेशीर चळवळीसोबत ती २०२२ पासून संबंधित होती आणि तिने शेजारच्या छत्तीसगडमधील मढ भागात प्रशिक्षण घेतले होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# निवडणूक आयोगासाठी देशातील सर्व पक्ष समान

**ज्ञानेश कुमार यांनी विरोधकांचे आरोप फेटाळले**

♦ **कानपूर, २ नोव्हेंबर**



निवडणूक आयोग तटस्थ असून कोणत्याही पक्षासाठी काम करीत नाही, निवडणुका पारदर्शक, कार्यक्षम आणि सुरळीत पद्धतीने घेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहे. काही आक्षेप आणि समस्या असल्यास तक्रार द्यावी त्याचे निराकरण केले जाईल, विनाकारण आरोप करून आयोगाची बदनामी करू नये अशा शब्दात देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी उत्तर प्रदेशच्या कानपूर येथे सुनावले.

कानपूरच्या आर्यनगर स्पोर्ट्स हब येथे रविवारी माथुर वैश्य समाजाने आयोजित केलेल्या पुरस्कार संमारंभासाठी आले असता, ज्ञानेश कुमार यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवर भर देताना ते म्हणाले, निवडणूक आयोग हा सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही; तो सर्वांसाठी तटस्थ आहे. निवडणूक आणि मतदार याद्यांसंदर्भात तक्रार असल्यास त्यांनी राज्य निवडणूक आयुक्तांना निवदेन द्यावे, त्याचे निराकरण केले जाईल. (वृत्तसंस्था)

### हिंसाचाराची घटना खपवून घेणार नाही

बिहारमधील मोकामा हत्याकांडावर बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले, आयोग हिंसाचाराची कोणतीही घटना खपवून घेणार नाही. हिंसा घडविणारे आणि त्यासाठी प्रवृत्त करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहे. बिहारमध्ये मोठ्या संख्येने पोलिस अधिकारी, निवडणूक अधिकारी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यास तयार आहे. मोकामा येथील हत्येनंतर, आयोगाने विधानसभा मतदारसंघात तैनात असलेल्या प्रमुख प्रशासकीय आणि पोलिस अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई देखील करण्यात आली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रावसाहेब दानवेंच्या नातवावर गुन्हा दाखल

**नाशिक** : माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कुटुंबाशी संबंधित एका प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दानवे यांचे नातू शिवम पाटील आणि त्यांच्यासह आठ जणांविरुद्ध नाशिकच्या सातपूर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उद्योजक कैलास अहेर यांनी तक्रार दाखल केली असून, १० कोटींची फसवणूक झाल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, कैलास अहेर हे भाजपाचे पदाधिकारी आहेत. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. हे प्रकरण २०१८ मधील आहे. तक्रारदार कैलास अहेर यांच्या कंपनीतील शेअर भागीदारी आणि आर्थिक व्यवहारासंदर्भात हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे.

### जमैकातील लोकांची अन्नान्न दशा

**किंग्स्टन** : जमैका पाचव्या श्रेणीतील चक्रीवादळ मेलिसामुळे झालेल्या विध्वंसाशी झुंजत आहे. ब्लॅक रिव्हर शहरात, रहिवासी चिखल आणि ढिगाऱ्यात अन्न आणि साहित्य शोधत आहेत. बरेच लोक नष्ट झालेल्या दुकाने आणि सुपरमार्केटमधून पाण्याच्या बाटल्या आणि आवश्यक वस्तू शोधत आहेत. वादळानंतर गेल्या तीन दिवसांपासून शहरात अराजकता आणि उपासमारीची परिस्थिती आहे. चिखलाने माखलेले रस्ते, कोसळलेल्या इमारती, उलटलेल्या बोटी आणि विखुरलेली वाहने. वीज आणि पाणीपुरवठा बंद आहे. लोकांचा त्यांच्या कुटुंबांशी संपर्क तुटला आहे.

### तेलंगणामध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांचा बीआरएस कार्यालयावर हल्ला

**हैदराबाद** : तेलंगणातील खम्मम जिल्ह्यातील मनुगुरु भागात रविवारी काँग्रेस कार्यकर्त्यांनी बीआरएस (भारत राष्ट्र समिती) च्या स्थानिक कार्यालयावर हल्ला केला. त्यांनी कार्यालयाची तोडफोड केली, फर्निचर जाळले आणि काँग्रेसचा झेंडा फडकावला. व्हायरल व्हिडिओमध्ये काँग्रेसचे झेंडे हातात घेतलेले लोक बीआरएस कार्यालयात घुसताना आणि घोषणाबाजी करताना दिसत आहेत. या हाणामारीदरम्यान दोन्ही बाजूंनी हाणामारी झाली आणि काही लोक जखमी झाले. तथापि, पोलिसांनी अद्याप कोणत्याही दुखापतीची पुष्टी केलेली नाही. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आम्हाला आमचे कार्यालय परत द्या, अशा घोषणा देत निदर्शनेही केली. माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आग आटोक्यात आणली. मोठ्या संख्येने सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.

### भावाच्या हत्येनंतर गर्भवती वहिनीवर बलात्कार, हत्या

**राजकोट** : गुजरातमधील जुनागड शहरापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या शोभावदला गावातील खोडियार आश्रमात, एका १५ वर्षीय मुलाने त्याच्या भावाची आणि गर्भवती वहिनीची निर्घृण हत्या केली. तिला मारण्यापूर्वी त्याने तिच्यावर बलात्कारही केला. आरोपीने महिलेच्या पोटात इतक्या जोरात लाथ मारली की तिचे ६ महिन्यांचे बाळ तिच्या पोटातून बाहेर पडले. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी घडली होती, परंतु शुक्रवारी, ३१ ऑक्टोबर रोजी ती उघडकीस आली. आरोपीने त्याच्या भावाचे आणि वहिनीचे मृतदेह घरात नग्न अवस्थेत पुरले होते. त्याने त्यांच्या कपड्यांना आग लावली आणि रक्ताचे डाग पुसले. त्याच्या आईने त्याला मोठ्या मुलाचे आणि सुनेचे मृतदेह घरी पुरण्यास मदत केली. पोलिसांनी आश्रमात जाऊन आश्रमाच्या मागे असलेल्या घरातून जोडप्याचे आणि एका नवजात बाळाचे कुजलेले मृतदेह बाहेर काढले. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीलाही अटक केली.

### दिलजीतच्या ऑस्ट्रेलियातील शोमध्ये खलिस्तान्यांचा गोंधळ

**मेलबर्न** : प्रसिद्ध पंजाबी गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझ याच्या एका शोमध्ये खलिस्तानी समर्थकांनी बराच गोंधळ घातला. एएएमआय पार्कच्या बाहेर झालेल्या या घटनेनंतर शहरातील शीख समुदायात संतापाची लाट उसळली आहे.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,१०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. १,५०,००० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.७ | २३.२ |
| अमरावती | ३३.२ | २१.० |
| भंडारा | ३१.० | २२.० |
| बुलडाणा | २७.८ | २१.८ |
| चंद्रपूर | ३२.६ | २२.८ |
| गडचिरोली | ३१.६ | २२.८ |
| गोंदिया | ३१.६ | २२.१ |
| नागपूर | ३१.६ | २३.१ |
| वर्धा | -.- | २४.२ |
| वाशीम | ३०.४ | २१.४ |
| यवतमाळ | ३२.० | २१.४ |

# राजदने बंदुकीच्या धाकावर लुटले मुख्यमंत्रिपद

## पंतप्रधान मोदी यांची इंडिया आघाडीवर टीका

**पाटणा, २ नोव्हेंबर**

बिहारमधील आरा येथे एका सभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी महाआघाडीवर खरपूस टीका केली. राजदने काँग्रेसच्या डोक्यावर बंदूक ठेवून मुख्यमंत्रिपद लुटून नेले. काँग्रेसने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवनराम यांचा अपमान केला, असा घणाघात नरेंद्र मोदी यांनी केला.



बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राजद सोबत लढत असले, तरी त्यांच्यात तणाव आहे. मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवारीसाठी राजदने बळजबरीने काँग्रेसकडून समर्थन असल्याची घोषणा केली, असा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला.

रालोआचे संकल्पपत्र हे बिहारमधील सामाजिक न्यायासोबतच राज्याच्या विकासाची हमी आहे. राज्यातील नागरिकांनी पुन्हा एकदा रालोआला सत्तेत आणण्याचा निर्णय घेतला असल्याचे या सभेला उसळलेली गर्दी सांगत आहे.

तुमच्या मुलांची जबाबदारी माझ्यावर आहे. बिहारमधील नागरिक यावेळी रालोआला विक्रमी जागा जिंकवून देणार आहेत. जंगलराजवाले यावेळी सर्वाधिक लाजीरवाण्या पराभवाला जाणार आहेत. राज्यात पुन्हा एकदा रालोआचे सरकार आणण्याचा निर्णय बिहारमधील जुन्या पिढीसोबतच नवीन पिढीने घेतला आहे. (वृत्तसंस्था)

### एक कोटी रोजगार देणार

एकीकडे रालोआने प्रामाणिक संकल्पपत्र जाहीर केले, दुसरीकडे विरोधकांनी लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करणारा जाहीरनामा तयार केला आहे. बिहारमधील तरुण बिहारमध्येच काम करतील आणि बिहारचेच नाव करतील, असा आमचा संकल्प आहे. येत्या काही वर्षांत एक कोटी रोजगार दिले जातील, अशी घोषणा केली आहे. हे नेमके कसे होईल, याची योजना लोकांसमोर ठेवली जाईल, असे मोदी म्हणाले.

### शेतकरी सन्मान निधीत होणार तीन हजारांची वाढ

बिहार पूर्व भारताचे टेक, टेक्सटाईल आणि टुरिझमचे केंद्र होईल, तो दिवस दूर नाही. दिल्लीत बसून गणित करणाऱ्यांनी येथील खरे चित्र पाहावे. आमचे सरकार लहान शेतकऱ्यांना पंतप्रधान सन्मान निधीचे सहा हजार रुपये देते. बिहारमधील रालोआचे नवीन सरकार यात तीन हजार रुपयांची भर घालणार असल्याचे मोदींनी सांगितले.

# ...तर खून, अपहरण, खंडणीसाठी तीन नवीन मंत्रालये असतील : अमित शाह

**मुझफ्फरपूर, २ नोव्हेंबर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) प्रमुख लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबावर हल्लाबोल केला आणि म्हटले की जर त्यांचा मुलगा सत्तेत आला तर बिहारमध्ये खून, अपहरण आणि खंडणीसाठी तीन नवीन मंत्रालये निर्माण केली जातील.

मुझफ्फरपूर येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना शाह यांनी दावा केला की जर राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकार सत्तेत राहिले तर बिहार पूरमुक्त केला जाईल आणि यासाठी एक वेगळे मंत्रालय स्थापन केले जाईल. राजद राजवटीत दिसलेल्या



जंगलराजची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शाह यांनी जनतेला एनडीएला मतदान करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, जर लालूजींचा मुलगा (तेजस्वी यादव) मुख्यमंत्री झाला, तर बिहारमध्ये तीन नवीन मंत्रालये निर्माण केली जातील: एक खून, दुसरे अपहरण आणि तिसरे खंडणीसाठी. तुमच्या मतांमुळे बिहारला पुन्हा जंगलराजात जाण्यापासून वाचवता येईल. नवीन चेहऱ्यांसह जंगलराज परत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. (वृत्तसंस्था)

### महाआघाडीमध्ये अंतर्गत कलह

वैशाली येथील दुसऱ्या एका रॅलीत शाह म्हणाले, राजदच्या काळात अपहरण, हत्या आणि अत्याचार या घटना सामान्य होत्या. त्या काळात परत जावे लागू नये म्हणून मतदारांनी यावेळी मतदान करावे. महाआघाडी च्या घटक पक्षांमध्ये अंतर्गत कलह सुरू आहे. असे सरकार आले तर त्यांचे कधीच कोणत्याच मुद्यावर एकमत होणे शक्य नाही.

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!

# संस्कृती वाचवण्यासाठी मराठीचे संवर्धन महत्त्वाचे

**ठाणे, दि. २ नोव्हेंबर -**

मराठी भाषेचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असल्यास, तिची संस्कृती आणि साहित्याची समृद्धता जपणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध लेखक आणि कादंबरीकार विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

जानेवारीत सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून विश्वास पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आपले साहित्य आणि संस्कृती आजच्या इतकी धोक्याच्या उंबरठ्यावर कधीच नव्हती, असे विश्वास पाटील यांनी ठाणे महापालिकेने त्यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उत्तर देताना सांगितले.

मराठी संस्कृती टिकवण्यासाठी मराठी भाषेचे अस्तित्व आवश्यक आहे. आपली मराठी भाषा, मराठी शाळा आणि मराठी साहित्य जपण्यासाठी आपण एकत्रितपणे लढले पाहिजे. मराठीचे जतन करणे हे केवळ एक सांस्कृतिक कार्य नाही तर, एक सामाजिक चळवळ आहे, जी लोकांकडूनच आली पाहिजे, असे पाटील यांनी स्पष्ट केले. कोणत्याही परिस्थितीत मराठी शाळा बंद करू नयेत. मराठी शाळेत एकच विद्यार्थी असला, तरी त्याला शिकवले पाहिजे आणि शाळा सुरू ठेवली पाहिजे. अशा विद्यार्थ्यांपासून संत तुकाराम किंवा संत ज्ञानेश्वर उदयास येऊ शकतात. स्थानिक साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात किमान दोन ते तीन मराठी भवन बांधले गेले पाहिजे, असे पाटील म्हणाले.

# जेव्हा मासोळ्या पकडण्यासाठी पाण्यात उडी घेतात राहुल गांधी!



**बेगुसराय, २ नोव्हेंबर**

२०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असताना राजकीय पक्ष प्रचारात सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. बेगुसरायमध्ये एक अनोखे दृश्य पाहायला मिळाले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्वतः तलावात उडी मारली आणि स्थानिक मासेमारांसोबत पारंपारिक मासेमारी प्रक्रियेत भाग घेतला.

राहुल गांधींच्या या कृतीने उपस्थित गावकऱ्यांमध्ये उत्साहाची लाट पसरली, त्यांना फार आनंद झाला. लोकांनी राहुल गांधींना तलावात उडी मारताना, जाळे टाकताना आणि मासे पकडताना पाहिले. या दृश्याने सर्वांनाच आश्चर्याचा मोठा धक्का बसला आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळपासूनच तलावात तयारी सुरू होती. राहुल गांधी आल्यावर गावकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. कोणताही संकोच न करता त्यांनी तलावात उडी मारली आणि मासेमारांसोबत जाळे टाकले. तलावाजवळ उपस्थित असलेले लोक म्हणाले, आम्ही यापूर्वी कधीही असे दृश्य पाहिले नव्हते. आमच्या परंपरांना स्वीकारत एक प्रमुख नेता अशा प्रकारे आमच्यात आला आहे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

राहुल गांधींसोबत यावेळी व्हीआयपी प्रमुख मुकेश सहनी आणि काँग्रेस नेते कन्हैया कुमार देखील उपस्थित होते. तिन्ही नेते एकत्र तलावात उतरले, गावकऱ्यांशी संवाद साधला आणि स्थानिक जेवणाचा आस्वाद घेतला. सहनी म्हणाले, हा केवळ एक उपक्रम नाही तर बिहारच्या मातीशी जोडले जाण्याचा संदेश आहे.

राहुल गांधी तलावात उतरल्याच्या व्हिडीओला काही तासांतच लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. लोकांनी व्हिडीओ शेअर करत त्यांना खरा लोकनेता असे म्हटले आहे. काँग्रेस नेते म्हणतात, राहुल गांधी केवळ भाषणांद्वारेच नव्हे तर ग्राऊंड लेव्हलवर येऊन जनतेशी जोडले जात आहेत. राजकीय तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, राहुल गांधींचा दौरा बिहार निवडणुकीच्या संदर्भात एक महत्त्वाचा प्रतिकात्मक मेसेज देत आहे. (वृत्तसंस्था)

# पहलगाममध्ये केबल कार प्रकल्पाला एनआयएची मंजुरी

**नवी दिल्ली, २ नोव्हेंबर**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) जम्मू-काश्मीर सरकारला पहलगामच्या पर्यटन स्थळातील बैसरन येथे केबल कार प्रकल्पाला मान्यता दिली आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. जम्मू-काश्मीर सरकारने एनआयएकडून मंजुरी मागितली होती, जी या हल्ल्याची चौकशी करत आहे, ज्यामध्ये पाकिस्तानस्थित दहशतवाद्यांनी २६ लोक, बहुतेक पर्यटक मारले होते.

एनआयए अधिकाऱ्यांनी सांगितले की, केंद्रशासित प्रदेश प्रशासनाने या प्रकल्पावर दहशतवादविरोधी संस्थेशी त्यांचे मत जाणून घेतले होते.

आम्हाला आमचे मत (केबल कार प्रकल्प सुरू करण्याबद्दल) विचारण्यात आले आणि आम्ही कळवले की आम्हाला तपासाच्या दृष्टिकोनातून कोणताही आक्षेप नाही, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

२७ ऑक्टोबर रोजी, जम्मू आणि काश्मीर विधानसभेत पहलगामचे आमदार अल्ताफ अहमद वाणी यांनी एका अतारांकित प्रश्नाच्या उत्तरात, सरकारने सांगितले की प्रकल्पाचे काम एका कंपनीला देण्यात आले आहे परंतु पहलगाम नंतरच्या परिस्थिती लक्षात घेता ते सुरू झालेले नाही. (वृत्तसंस्था)

# धावत्या ट्रेनमध्ये थरार, १० प्रवाशांना भोसकले

## ब्रिटनमधील घटना, दोन संशयित ताब्यात

**लंडन, २ नोव्हेंबर**

डॉनकास्ट स्थानकावरून लंडनच्या किंग्स क्रॉस स्थानकाकडे जाणाऱ्या एका धावत्या ट्रेनमध्ये माथेफेरूने १० प्रवाशांवर चाकूने हल्ला केली. त्यातील ९ प्रवाशांची प्रकृती गंभीर आहे, पोलिसांना याप्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

ब्रिटिश ट्रान्सपोर्ट विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, डॉनकॉस्ट रेल्वे स्थानकावरून ट्रेन रवाना होताच दोघांनी प्रवाशांना



दमदाटी केली, त्यानंतर बॅगमधून चाकू काढत प्रवाशांवर हल्ला करणे सुरू केले. त्यांनी १० प्रवाशांना चाकूने भोसकले आणि घटनेची माहिती पोलिसांना दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. लंडनच्या किंग्स क्रॉस स्थानक आल्यावर ट्रेनचा वेग कमी झाला, आणि चालत्या गाडीतून उडी मारून आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. रेल्वे स्थानकावर ट्रेन थांबताच पोलिसांना जखमींना रुग्णालयात पोहोचविले आणि घटनेचा तपास सुरू केला. या घटनेप्रकरणी दोन संशयितांबा ताब्यात घेतली असून त्यांची चौकशी सुरू आहे. एका प्रत्यक्षदर्शीने वृत्तसंस्थेला सांगितले, की एका व्यक्तीच्या हातात रक्ताने माखलेला चाकू होता आणि चालत्या ट्रेनमधून उडी टाकून तो पळून गेला. दरम्यान, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी घटनेप्रकरणी संवेदना व्यक्त केली आणि म्हणाले, ही भयावह व चिंताजनक घटना आहे. मी या हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांसोबत आहे. आपत्कालीन सेवा व पोलिसांनी तातडीने दिलेल्या प्रतिसादाबद्दल मी त्यांचे आभार मानतो. घटना घडली त्या परिसरातील लोकांनी पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे. (वृत्तसंस्था)

# शेती विषय शालेय अभ्यासक्रमात ठेवा

## पाच ठराव : विदर्भ साहित्य संमेलनाचे वाजले सूप




व्यासपीठावर उपस्थित संमेलनाध्यक्ष रमाकांत कोलते, कुलगुरू डॉ. अविनाश आवळगावकर, प्रदीप दाते व इतर मान्यवर

**यवतमाळ, २ नोव्हेंबर**

जिल्ह्यात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत द्यावी, जांब आणि परिसरात पाणी समस्या असून, पाणीपातळी ५०० फुटांवर पोहचली आहे. पाणी समस्येवर शासनाकडून उपाययोजना करण्यात यावी, यासह विदर्भातील शाळांमध्ये शेती हा विषय अभ्यासक्रमात ठेवावा, नवीन शैक्षणिक धोरणातील त्रुटी दुरुस्त करावी, असे पाच ठराव ६९ व्या विदर्भ साहित्य संमेलनात मार्गदर्शक समितीने मांडून सर्वानुमते मंजूर करण्यात आले आहे.

समारोप कार्यक्रमात रिद्धपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवळगावकर, संमेलनाध्यक्ष डॉ . रमाकांत कोलते, माजी मंत्री प्रा. वसंत पुरके, प्रदीप दाते, पांडुरंग खांदवे, डॉ. तीर्थराज कापगते, डॉ. संतोष चव्हाण, हेमंत कांबळे, मनोहर शहारे इत्यादी उपस्थित होते.

रिद्धपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवळगावकर म्हणाले, मराठी साहित्य आणि संशोधनच्या सुरुवातीला अनेक अभ्यासक, समीक्षक लाभले. साहित्याच्या निर्मितीचा विचार म्हणजे विकसित दृष्टी होय. मराठी साहित्यांमध्ये समृद्ध परंपरा पाहायला मिळते. समृद्ध वारसा यवतमाळ जिल्ह्याला लाभला आहे.

साहित्य हे विवेकी दृष्टी म्हणून समजणे योग्य ठरेल. साहित्यांच्या संवर्धनात साहित्यिकांनी शेतीबाबत लिहिले, भूमिका मांडली आहे. मराठी साहित्य समृद्ध, विकसनशील आहे. साहित्यिकांनी अफाट लेखन जबाबदारीने केले आहे. लेखकांना 'लिहारे' असे म्हणून चालत नाही, खरे तर शेती, तरुण, सर्वांनाच प्रश्न साहित्यिकांना खुणावतात. ते कविता, साहित्य यातून लिहिले जाते. साहित्य लेखकांचा आत्मस्वर आहे.

साहित्याबाबत भावना कुचंबून आल्या की तो सहज लिहितो. साहित्याचे वैभव खूप मोठे आहे. साहित्यिक सामर्थ्य समाजापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. आता सामाजिक दु:खाची कळ किती आहे, हे उमगणे गरजेचे आहे.

प्रसिद्धीच्या माध्यमातून सोशल मीडियावर लिहिणाऱ्यांची संख्या वाढली आहे. तसेच साहित्याला जात, धर्म नसतो. मला बरेच जण विचारतात, रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ झाले, पण ते कुठे आहे. फार लोकांना माहिती नाही. ही एक शोकांतिका आहे. भाषांचे विद्यापीठ विदर्भात आहे. मराठी भाषेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

मराठी भाषा टिकवण्यासाठी आंदोलन, मोर्चा करतो, पण इंग्रजीकडे दुर्लक्ष करतो. कोणत्याही भाषेला माझा विरोध नाही. तर रिद्धपूर विद्यापीठात पाश्चात्य भाषेचा अभ्यास सुरू करणार आहे. केवळ आध्यात्मिक अंगाने संत साहित्याचा अभ्यास करून चालणार आम्ही. डोळसपणे साहित्याकडे पाहणे आवश्यक आहे. मूल्याधिष्ठित शिक्षणावर सरकारने भर दिला पाहिजे.

विदर्भ साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. रमाकांत कोलते म्हणाले, लीलाचरित्र ग्रंथावरील असलेली बंदी उठवावी. ती बंदी उठवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच आज असलेल्या इंग्रजी शाळेतही मराठी भाषेतील ग्रंथाचे वाचन झाले पाहिजे. त्यासाठीसुद्धा प्रयत्न होणे अपेक्षित आहे. ज्या पद्धतीने शक्तिपीठ मार्ग झाला आहे. त्याच पद्धतीने शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी रस्ते झाले पाहिजेत. जांब येथे झालेले विदर्भ साहित्य संमेलन अतिशय चांगले झाले आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना साहित्यिकांचे विचार ऐकायला मिळाले. समारोपीय अधिवेशनाचे सूत्रसंचालन जयंत शेट्ये यांनी केले. (तभा वृत्तसेवा)

# मिनीबसची ट्रकला धडक, १८ ठार

## राजस्थानमधील घटना, कोलायत मंदिरातून परतताना अपघात

**जोधपूर, २ नोव्हेंबर**

राजस्थानमधील फलोदी जिल्ह्यातील माटोडा पोलिस ठाणे परिसरात भरतमाला एक्सप्रेसवेवर रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास भरधाव मिनीबसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. या घटनेत १८ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चार गंभीर जखमी आहे.



फलोदीचे पोलिस अधीक्षक कुंदन कंवरिया यांनी सांगितले की, जोधपूरमधील सुरसागर येथील रहिवासी असलेले २४ जण बिकानेरमधील कोलायत मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर मिनीबसने परतत होते. हनुमान सागर चौकाजवळ, वेगाने येणारी मिनीबस अचानक रस्त्याच्या कडेला असलेल्या ट्रकवर आदळली. घटनेची माहिती मिळताच पोलिस अपघातस्थळी पोहोचले. स्थानिकांच्या मदतीने मिनीबसमधून अपघातग्रस्तांना बाहेर काढले आणि फलोदी येथील ओसियन रुग्णालयात हलविले, तिथे डॉक्टरांनी १८ जणांना मृत घोषित केले, तर चार जणांवर प्राथमिक उपचार करून गंभीर अवस्थेत ग्रीन कॉरिडॉरने जोधपूर येथील रुग्णालयात हलविले. धडक इतकी भीषण होती की, अपघातानंतर मिनीबसचा चक्काचूर झाला. प्राथमिक तपासात कमी दृश्यमानतेमुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याचे समोर आले. पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, फलोदीच्या माटोडा भागातील अपघातात झालेल्या जीवितहानीमुळे अत्यंत दुःखद झाले. माझ्या संवेदना शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत. जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सर्व जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत. मृतांच्या आत्म्यांना शांती मिळावी आणि जखमींना लवकर बरे व्हावे अशी मी देवाकडे प्रार्थना करतो. (वृत्तसंस्था)

# 'त्यांनी' भंगारातून खरेदी केले विमान!

## उज्जैनमधील भावांची अशीही शक्कल

**उज्जैन, २ नोव्हेंबर**

जर कोणी तुम्हाला सांगितले, मी भंगारातून विमान खरेदी केले, तर तुम्हाला विश्वास बसणार नाही, उलट धक्का बसेल, पण हे खरे आहे. मध्यप्रदेशातील उज्जैनमधील दोन भावांनी मिळून भंगारातून ५५ आसनी विमान ५० लाख रुपयांना खरेदी केले. ते विमानाचे आलिशान हॉटेलमध्ये रूपांतर करण्याची योजना आखत आहेत. विमान दोन ट्रकवर उज्जैनमध्ये आणले आहे.

वीरेंद्र आणि पुष्पेंद्र या भावांनी सांगितले की भंगार खरेदी करणे हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय आहे. ते २०११ पासून हे करत आहेत. ते राजलक्ष्मी एंटरप्रायझेस आणि कुशवाह अँड सन्सद्वारे चालवतात. २०१९ मध्ये, एका व्यक्तीने भारतीय हवाई दलाकडून लिलावात ३.५ लाख रुपयांना मिग-२१ लढाऊ विमान खरेदी केले, जे नंतर अटींनुसार भागांमध्ये मोडण्यात आले. आता, त्यांनी सीमा सुरक्षा दलाकडून ५० लाखांना ५५ आसनी विमान खरेदी केले आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी हे विमान खरेदी केले होते आणि ते एचसीएलला दिले होते आणि नंतर ते १९९१ मध्ये वापरण्यासाठी बीएसएफला सुपूर्द करण्यात आले.

बीएसएफने वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत भारतीय सैनिकांना नेण्यासाठी हे विमान वापरले. त्यांनी २००९ पर्यंत ते वापरले, त्यानंतर ते भंगार घोषित करण्यात आले आणि तेव्हापासून ते दिल्ली विमानतळावर साठवले जात आहे.

खरेदीदाराने सांगितले की त्याने खरेदी केलेल्या विमानात इंजिन नाही; त्यात फक्त बॉडी आणि कॉकपिट आहे. हे विमान मकसी रोडवरील करोंडिया गावातील अनंता व्हिलेज फार्म स्टे येथे ठेवण्यात आले आहे. ते पर्यटकांसाठी एका आलिशान निवासस्थानात रूपांतरित करण्याची योजना आहे. विमानाचे वजन २० टन आहे आणि ते ७० फूट लांब आहे. त्याचे पंख प्रत्येकी ५० फूट पसरलेले आहेत. विमानाचा मुख्य भाग ७० फूट लांबीच्या ट्रॉलीवर आणि पंख ५० फूट लांबीच्या ट्रॉलीवर नेण्यात आले. दिल्लीहून उज्जैनला नेण्यासाठी ५ लाख रुपये खर्च आला. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अरुणाचल प्रदेशात तिन्ही दलांचा युद्ध सराव

## मेचुका येथे 'पूर्व प्रचंड प्रहार', लढाऊ, तांत्रिक कौशल्य आणि तयारीची चाचणी करणार

◆ **इटानगर, २ नोव्हेंबर**

भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय लष्कर, वायुसेना आणि नौदल अरुणाचल प्रदेशातील मेचुका येथे २० ते २५ नोव्हेंबर या कालावधीत युद्धसराव करणार आहे. 'पूर्व प्रचंड प्रहार',असे नाव युद्ध सरावाला देण्यात आले. यावेळी संयुक्त लढाऊ कौशल्य, तांत्रिक कौशल्य आणि तयारीची चाचणी घेतली जाईल.

लष्कराचे जनसंपर्क अधिकारी लेफ्टनंट कर्नल महेंद्र रावत यांनी सांगितले की, या सरावाची उद्दिष्ट्ये मोहीम राबविताना सैन्य, हवाई दल आणि नौदलात समन्वय साधणे आहे. हा सराव उंचावर, कठीण भूभागावर आयोजित केला जाईल आणि भविष्यातील परिस्थितींसाठी भारतीय सैन्याच्या तयारीची चाचणी घेईल. हा एक दूरदर्शी लष्करी सराव आहे जो बहु-डोमेन एकात्मता ओळखण्यासाठी आहे. तो जमीन, हवाई आणि सागरी आघाड्यांवर एकाच वेळी लढाऊ क्षमता प्रदर्शित करेल. या सरावाचे उद्दिष्ट भविष्यातील संभाव्य युद्ध परिस्थितींमध्ये संयुक्त दलांची तयारी आणि अचूक प्रतिसाद क्षमता मजबूत करणे आहे. या सरावाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे विशेष दलांचा समन्वित वापर, मानवरहित प्लॅटफॉर्म, अचूक प्रणाली आणि नेटवर्क-आधारित ऑपरेशन सेंटर ही सर्व संसाधने वास्तववादी उच्च-उंचीच्या वातावरणात एकत्रितपणे कार्य करतील. (वृत्तसंस्था)



लेफ्टनंट जनरल आर.सी. तिवारी, एअर मार्शल सुरत सिंग आणि कमांडर अजय यादव तसेच इतर अधिकाऱ्यांनी प्रचंड प्रहार युद्ध सरावासाठी जागेची पाहणी केली

### आपत्कालीन परिस्थितीत सक्षम

सरावात सैन्याची नवीन तांत्रिक क्षमता आणि सुधारित प्रक्रियांचीदेखील चाचणी केली जाईल. यामुळे सशस्त्र दलाचा जलद प्रतिसाद आणि अनुकूलता सुधारण्यासाठी मदत होणार आहे. या सरावामुळे भारतीय सैन्य सर्व परिस्थितीत मिशनसाठी तयार राहतील आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत संयुक्त कारवाई करण्यास सक्षम असतील याची खात्री होईल. 'पूर्व प्रचंड प्रहार' हा युद्धसराव देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी सशस्त्र दलांची सामूहिक वचनबद्धता आणि तयारीची पुष्टी करते.

# प. बंगालमध्ये एसआयआर प्रशिक्षणाला विरोध

### बीएलओंची सुरक्षा देण्याची मागणी

◆ **कोलकाता, २ नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमधील निवडणूक आयोगाने शनिवारी बीएलओ फॉर स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन अर्थात् एसआयआरसाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला, यावेळी अनेक बीएलओंनी जीवाला धोका असल्याचे कारण देत प्रशिक्षणाला विरोध केला आणि सुरक्षा देण्याची मागणी केली.

प्रशिक्षण आणि क्षेत्रीय काम कर्तव्य मानले जावे आणि आवश्यक कागदपत्रे जारी करावी, अशी मागणी बीएलओंनी केली आहे. निवडणूक आयोगाने त्यांना त्यांच्या विभागात उपस्थिती सिद्ध करण्यासाठी कोणतेही वैध प्रशिक्षण प्रमाणपत्र किंवा कागदपत्रे प्रदान केलेली नाहीत, असा त्यांचा आरोप आहे. निवडणूक आयोगाने सांगितले की, प्रशिक्षणादरम्यान केंद्रीय सुरक्षा दल तैनात केले जाणार नाहीत. सुरक्षा ही राज्य प्रशासनाची जबाबदारी असेल. मोठ्या बूथसाठी दोन बीएलओ नियुक्त करण्याचा प्रस्तावही आयोगाने फेटाळून लावला. निवडणूक आयोगाने बीएलओंसाठी १६ कलमी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत आणि फील्ड वर्क सुलभ करण्यासाठी एक नवीन मोबाइल ॲप लाँच केले आहे. प्रशिक्षणादरम्यान, बीएलओंना विशिष्ट किट आणि प्रक्रियांबद्दल तपशीलवार माहिती दिली जात आहे.



**तृणमूलचे विरोधात आंदोलन**

तृणमूल काँग्रेसने एसआयआरविरोधात ४ नोव्हेंबर रोजी कोलकातामध्ये निषेध मोर्चाचे आवाहन केले आहे. या मोर्चाचे नेतृत्व मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचे पुतणे, पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी करतील. मंगळवारी दुपारी १:३० वाजता रेड रोडवरील बीआर आंबेडकर पुतळ्यासमोर जमण्याचे आदेश पक्षाने कोलकाता आणि आसपासच्या जिल्ह्यांतील नेते आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. (वृत्तसंस्था)

# सुपरमार्केटमध्ये आग, २३ ठार

## मेक्सिकोच्या हर्मोसिलो शहरातील घटना, मृतांमध्ये मुलांचाही समावेश

◆ **मेक्सिको सिटी, २ नाव्हेंबर**

मेक्सिकोच्या हर्मोसिलो शहरातील वाल्डो भागातील सुपरमार्केटमध्ये शनिवारी रात्री लागलेल्या भीषणा आगीत २३ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतकांमध्ये मुलांचादेखील समावेश आहे. या अपघातात अकरा जण जखमी झाले आहे.





राज्याचे ॲटर्नी जनरल गुस्तावो सालास चावेझ यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात शॉर्ट सर्कीटमुळे आग लागल्याचे समोर आले. मृतांपैकी अनेक अल्पवयीन आहेत. सुरक्षा आणि आरोग्य सेवकांनी तत्काळ उपाययोजना राबवून अनेकांचे जीव वाचवले. या घटनेत २३ जणांचा मृत्यू झाला असून जखमी ११ जणांवर उपचार सुरू आहे. आग लागल्याची घटना घडली तेव्हा सुपरमार्केटमध्ये एकच गोंधळ आणि आरडाओरडा झाला. बचाव पथकाने घटनास्थळी पोहोचून १५ जणांना सुरक्षित बाहेर काढले. आगीवर नियंत्रण मिळविल्यानंतर ३४ जणांना रुग्णालयात पोहोचविण्यात आले, त्यातील २३ जणांना मृत घोषित करण्यात आले. गव्हर्नर अल्फोन्सो दुराझो म्हणाले, मी सखोल आणि पारदर्शक चौकशीचे आदेश दिले आहेत. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आणि प्रियजनांप्रती माझी मनापासून संवेदना आहे. तसेच पीडितांच्या कुटुंबियांना आणि जखमींना मदत करण्यासाठी मदत पथके पाठवण्याचे निर्देश दिले आहेत. मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शेनबॉम यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, भयानक अपघातात प्रियजनांना गमावलेल्या सर्व कुटुंबांप्रती माझ्या संवेदना आहेत. घटनेचा तपास करण्यासाठी उच्चस्तरीत समिती गठीत केली जाईल. (वृत्तसंस्था)

# युक्रेनचा रशियातील तेल प्रकल्पांवर हल्ला

## ऊर्जा पायाभूत सुविधांवर ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा, पाच ठार, २५ पेक्षा अधिक जखमी

◆ **कीव्ह, २ नोव्हेंबर**

युक्रेनियन सैन्याने शनिवारी रात्री रशियाची राजधानी मास्कोपासून दीडशे किमी अंतरावर असलेल्या कोल्त्सेवॉय प्रदेशातील दोन तेल प्रकल्पांवर हल्ला केला, त्यात तेल पाईपलाईन आणि उर्जा पायाभूत सुविधांचे प्रचंड नुकसान झाले. ड्रोन आणि क्षेपणास्त्राच्या माऱ्यात पाच नागरिक ठार, तर २५ पेक्षा अधिक जण जखमी झाले.



युक्रेनच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रशियाच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून शनिवारी रात्री कोल्त्सेवॉय प्रदेशात ड्रोन आणि क्षेपणास्त्राने जोरदार हल्ले केले. रशियाची आर्थिक रसद रोखण्यासाठी उर्जा प्रकल्पांना लक्ष्य करून हल्ले करण्यात आले. त्यात रशियामधील एक महत्त्वाची तेल उत्पादन पाइपलाइन उद्ध्वस्त करण्यात आली, तसेच उर्जा पायाभूत सुविधांचेदेखील प्रचंड नुकसान झाले. उद्ध्वस्त करण्यात आलेली तेल पाईपलाइन वायव्य रशियामध्ये स्थित आहे, ज्याची एकूण लांबी अंदाजे ४०० किलोमीटर आहे. त्यातून रियाझान, निझनी नोव्हगोरोड आणि मॉस्को येथील रिफायनरीजमधून रशियन सैन्याला पेट्रोल, डिझेल आणि जेट इंधन पुरवले जाते. ही पाइपलाइन दरवर्षी ३ दशलक्ष टन जेट इंधन, २.८ दशलक्ष टन डिझेल आणि १.६ दशलक्ष टन पेट्रोल वाहून नेण्यास सक्षम आहे. रशियाने हल्ल्याची पुष्टी केली असून पाच नागरिक आणि २५ पेक्षा अधिक नागरिक जखमी झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### रशियाचेही जोरदार प्रत्युत्तर

युक्रेनच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी रशियन लष्कराने दक्षिण युक्रेनमध्ये बॅलेस्टिक क्षेपणास्त्राचा मारा केला. स्थानिक अधिकारी विटाली किम यांनी सांगितले की रशियाच्या हल्ल्यात एक नागरिक ठार झाला, १५ जण जखमी आहे. मायकोलाईव प्रदेशात झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्यांमध्ये पाच मुलांचा समावेश आहे. रशियन हल्ल्यामुळे मध्य पोल्टावा प्रदेशातील एका गॅस प्रकल्पाला आग लागली होती.

# कट्टरपंथी इस्लामींचा नायनाट करणार

## नायजेरियामधील सामूहिक नरसंहारावरून ट्रम्प यांचा इशारा ● ख्रिश्चन समुदायाचे रक्षण करण्यासाठी प्रत्युत्तर देणार

◆ **वॉशिंग्टन, २ नोव्हेंबर**

नायजेरियातील सामूहिक नरसंहारासाठी कट्टरपंथी इस्लामी जबाबदार असून नागरिकांच्या रक्षणासाठी कारवाई करून त्यांचे अस्तित्वच नष्ट करू, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. ख्रिश्चन समुदायाच्या रक्षणासाठी प्रत्युत्तर देणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.





ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, नायजेरियात मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायांमधील हिंसाचार वाढत आहे आणि ख्रिश्चन अल्पसंख्याकांच्या छळाला कट्टरपंथी इस्लामी गट जबाबदार आहेत. मी नायजेरियाला विशेष चिंतेचा म्हणून देश घोषित करत आहे. पण ही फक्त सुरुवात आहे. जेव्हा ख्रिश्चन किंवा अशा कोणत्याही गटाची अशा प्रकारे कत्तल केली जाते तेव्हा काहीतरी केले पाहिजे.



जगभरात ४,४७६ ख्रिश्चन मारले गेले, तर एकट्या नायजेरियात ही संख्या ३,१०० इतकी आहे. मी काँग्रेसमन रिले मूर, अध्यक्ष टॉम कोल आणि हाऊस ॲप्रोप्रिएशन कमिटीला या प्रकरणाची त्वरित चौकशी करून अहवाल देण्याचे आवाहन केले आहे. अमेरिका अशा अत्याचारांवर शांत बसणार नाही. अमेरिका ख्रिश्चन लोकसंख्येचे रक्षण करण्यास तयार आहे. दरम्यान आफ्रिकेच्या अनेक भागांमध्ये धार्मिक तणाव आणि अतिरेकी हिंसाचार वाढत आहे. विशेषतः नायजेरियाच्या उत्तर आणि मध्य भागात, बोको हराम आणि इतर इस्लामिक अतिरेकी संघटना सक्रिय असून त्यांच्याकडून सामूहिक हत्याकांड घडविले जात आहे. (वृत्तसंस्था)

### अणुचाचणी पुन्हा सुरू करणार

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की अमेरिका अणुचाचणी पुन्हा सुरू करेल. पेंटागॉनला अण्वस्त्र चाचणीची तयारी तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले आहे. अमेरिकेकडे जगात सर्वाधिक अण्वस्त्रे आहेत. माझ्या पहिल्या कार्यकाळात ते पूर्णपणे अपग्रेड केले गेले. मला हे करायला आवडत नाही, परंतु माझ्याकडे पर्याय उरलेला नाही.

# मणिपूरमध्ये सात बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, २ नोव्हेंबर**

सुरक्षा दलाने मणिपूरच्या इम्फाळ पूर्व, इम्फाळ पश्चिम, बिष्णुपूर आणि काकचिंग जिल्ह्यात छापेमारी करीत प्रतिबंधित संघटनेच्या सात बंडखोरांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून पिस्तूल, मॅगझीन, डिटोनेटर आणि आयईडी जप्त करण्यात आला.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दल आणि पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवत इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातून बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेश आर्मी अर्थात् पीपीएलच्या दोन सदस्यांना अटक केली. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील क्वाकेइथेल येथून प्रेपाक संघटनेच्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. बिष्णुपूर जिल्ह्यातील थांगा चिंगखा ख्वेरकपम येथून प्रेपाकच्या एका सदस्याला पकडण्यात आले. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील कोनो खोंगनांग खोंग भागातून कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी या संघटनेच्या एका सदस्याला अटक करण्यात आली. या कारवाईत दारूगोळा आणि शस्त्रे जप्त करण्यात आली. अटक केलेल्या बंडखोरांवर खंडणी उकळणे, पोलिसांवर हल्ले आणि हिंसा भडकविण्याचे आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# भाविकांची बस दरीत कोसळली: २ जणांचा मृत्यू, १५ गंभीर

◆ **नैनिताल, २ नोव्हेंबर**

उत्तराखंडमधील नैनितालमध्ये भाविकांनी भरलेली खासगी बस ६० फूट खोल दरीत कोसळली, या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण गंभीर जखमी आहे. चालकासह १७ पर्यटकांचा हा गट कैची धाम येथे बाबा नीम कलोरी यांच्या दर्शनासाठी गेला होता आणि दिल्ली परत येत असताना ज्योलिकोटमधील मटियाली येथे हा अपघात झाला.

ज्योलिकोट चौकीचे प्रभारी उपनिरीक्षक श्याम सिंग बोरा यांनी सांगितले की, शनिवारी रात्री १०:४७ च्या सुमारास, भाविक बसने ज्योलिकोटमधील मटियाली येथन जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि अपघातग्रस्तांना रुग्णवाहिकेच्या मदतीने हल्द्वानी येथील सुशीला तिवारी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी दोन जणांना मृत घोषित केले, तर १५ जखमींवर उपचार सुरू आहे. नैनितालचे एसएसपी डॉ. मंजुनाथ यांनी रात्री उशिरा रुग्णालयात पोहोचून जखमींच्या प्रकृतीची विचारपूस केली. सर्व अपघातग्रस्त दिल्लीचे रहिवासी आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मीना कुमारीच्या बायोपिकमध्ये कियारा

**मुंबई** : ट्रॅजिडी क्वीन मीना कुमारीच्या जीवनावर आधारित चित्रपटात कियारा अडवाणीचे नाव निश्चित झाल्याची चर्चा आहे. काही महिन्यांपूर्वी कियाराने मुलीला जन्म दिला. आई झाल्यानंतर तिने हा पहिला सिनेमा साईन केल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटात मीना कुमारी आणि कमाल अमरोही यांची कथा दाखवली जाणार आहे. कियारा या भूमिकेसाठी घरीच तयारी करत असून उर्दूही शिकत आहे. या भूमिकेसाठी आधी क्रिती सेननच्या नावाची चर्चा होती. त्यातच कियारा गर्भवती झाल्याने क्रितीच ही भूमिका करणार, असे निश्चित मानले जात होते. मात्र, आता कियाराने यात बाजी मारली आहे.



### 'ऑपरेशन सफेद सागर' सीरिजचा प्रोमो रिलीज

**मुंबई** : १९९९ च्या कारगिल युद्धात भारतीय लष्कराला पाठिंबा देण्यासाठी भारतीय हवाई दलाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. याच हवाई दलाच्या कारवाईवर आधारित बहुप्रतिक्षित वेबसीरिज 'ऑपरेशन सफेद सागर'चा पहिला लूक समार आला आहे. यात अभिनेता सिद्धार्थ, जिमी शेरगिल आणि अभय वर्मा यात प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. 'रंग दे बसंती' फेम अभिनेता सिद्धार्थ या सीरिजमध्ये एका महत्त्वाच्या हवाई योद्ध्याच्या भूमिकेत दिसत आहे. आपल्या गंभीर आणि प्रभावी अभिनयासाठी ओळखला जाणारा जिमी शेरगिल यात अनुभवी वैमानिकाच्या भूमिकेत राहील. अभय वर्मा याने आधी 'मुंज्या'मध्ये काम केले आहे. आता तो हवाई दल अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. ही सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार असून तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.



### यामी गौतमचा 'हक' वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई** : अभिनेत्री यामी गौतम आणि इमरान हाश्मी अभिनीत 'हक' हा चित्रपट येत्या ७ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र, हा चित्रपट सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. याच्या प्रदर्शनाला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली जात आहे. शाहबानो प्रकरणावरील या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत आणि यात शरियत कायदा महिलांविरोधात असल्याचे दाखवले आहे. यावर आक्षेप घेत ॲड. तौसिफ वारसी यांनी याचिका दाखल केली असून ती शाहबानोच्या कुटुंबीयांनी दाखल केल्याचे सांगितले जात आहे. निर्मात्यांना यासंदर्भात कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली होती. शाहबानो यांच्या कुटुंबीयांची संमती न घेता त्यांचे वैयक्तिक आयुष्य दाखविण्यात आल्याचे नोटीसमध्ये म्हटले आहे.



# संगणकाच्या मेमरीसाठी मशरूमचा वापर

## मेमरी हार्डवेअरला स्वस्तात पर्याय ● विद्युत आणि रासायनिक संकेतांमुळे लागला शोध

◆ **वॉशिंग्टन, २ नोव्हेंबर**

संगणकाच्या मेमरीसाठी शस्त्रज्ञांनी भन्नाट शोध लावला आहे. त्यांनी शिताके मशरूममधील मायसेलियमचा वापर करून मेमरी रजिस्टर तयार केले. त्यांच्या या कृतीमुळे अत्यंत स्वस्तात मेमरी हार्डवेअरला पर्याय उपलब्ध झाला आहे.



या मशरुममधील मेमरिस्टर मायसेलियमच्या चेतापेशीसारख्या गुणधर्माचा वापर करून भूतकाळातील अवस्था लक्षात ठेवतो. टिटॅनियम डायऑक्साईड किंवा सिलिकॉनसारख्या पदार्थापासून बनवलेल्या सध्याच्या मेमरी हार्डवेअरला हा नवीन आयाम देऊ शकतो.

शास्त्रज्ञांना मिळालेल्या या यशामुळे मेंदूप्रमाणे कार्य करणारा संगणक विकसित करणे शक्य होणार आहे. न्यूरॉन्समधील माहितीचा प्रवाह व्यवस्थापित करण्यासाठी सायनॉप्ससारख्या मेमरिस्टर्सचा वापर यासाठी केला जातो. मज्जातंतूंप्रमाणे काम करणाऱ्या मायक्रोचिप्स तयार करणे शक्य आहे. त्यामुळे तुम्हाला स्टॅण्डबाय मोड आणि मशीनचा वापर केला जात नसताना जास्त ऊर्जेची गरज भासणार नाही, अशी माहिती ओहयो विद्यापीठाचे मानसोपचार तज्ज्ञ जॉन लारोको यांनी सांगितले. यामुळे प्रचंड संगणकीय तसेच आर्थिक फायदा होऊ शकतो, असे ते म्हणाले.

मेंदूप्रमाणे वर्तन, विद्युत आणि रासायनिक संदेशवहन करण्याची म्हणजेच मायसेलियल नेटवर्कची क्षमता असल्याने मशरूमला संगणकाचा भाग करता येईल का, याची चाचपणी सध्या संशोधक करीत आहेत. मात्र, या क्षमतांचा पुरेपूर वापर करण्यासाठी अभियांत्रिकीची गरज आहे. मजबुती आणि लवचिकतेमुळे संशोधकांनी शिताके मशरूमची निवड केली. त्यांनी नियंत्रित परिस्थितीत मशरूमचे नऊ नमुने वाढवून मेमरिस्टर विकसित केले. (वृत्तसंस्था)

### १७० मायक्रोसेकंदांनी बदलवतात संकेत

संशोधकांनी त्यांच्या 'मशरिस्टर' वर ५,८५० हट्‌र्झचा स्विचिंग स्पीड नोंदवला. यामुळे सुमारे ९० टक्के अचूकता मिळाली. याचा अर्थ असा की, हे उपकरण अंदाजे दर १७० मायक्रोसेकंदांनी संकेत बदल करू शकते. अगदी मूलभूत व्यावसायिक मेमरिस्टरच्या तुलनेत हा वेग कमी आहे. हे मेमरिस्टर मशरिस्टरच्या तुलनेत जवळपास दुप्पट वेगाने काम करतात. मात्र, सुरुवातीचे निकाल आशादायी आहेत, असे लारोको म्हणाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# काँग्रेसची हताशा, विरोधकांच्या बोंबा

वारंवार चुका करून आणि अपयश पदरी पाडून घेण्यात काँग्रेस पक्ष पटाईत आहे. त्याचा परिणाम म्हणजे सर्वांत मोठे आयुष्य लाभलेला हा पक्ष पार रसातळाला जाण्याच्या स्थितीत आहे. याची सुरुवात खरे तर १९७५ मधील आणिबाणीपासूनच झाली, असे म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळून जेमतेम पाव शतक पूर्ण झाले होते. अवघ्या २८ वर्षांपूर्वी साडेपाचशेच्या आसपास राजे-संस्थानिकांचा देश असलेल्या भारतात स्वातंत्र्यानंतर लोकशाहीची मुळे रुजली होती. लोकांना मूलभूत आणि राजकीय अधिकारांची जाणीव झाली होती. काँग्रेसच्या काळातील बेरोजगारी, महागाई आणि भ्रष्टाचाराला जनता कंटाळली होती. याविरोधात विद्यार्थ्यांसह सामान्य जनता रस्त्यावर उतरली होती. त्यातच १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत शासकीय यंत्रणेचा गैरवापर केल्याचा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला होता. इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा, यासाठी देशभरात आंदोलन सुरू झाले होते. जनतेच्या असंतोषाला सामोरे जात विरोधकांच्या मागण्यांचा विधायक पद्धतीने सामना करण्याऐवजी आणि समस्या सोडविण्याऐवजी त्यांनी पदाचा गैरवापर करीत जून १९७५ मध्ये देशात आणिबाणी लागू केली. लोकशाहीवर वरवंटा फिरविण्याचा हा प्रकार होता. याचा परिपाक म्हणजे काँग्रेसचा लोकाधार घटला, घटतच राहिला. काँग्रेसला लागलेली ओहोटी अजूनही थांबलेली नाही. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये काँग्रेसला लोकसभेत मिळालेला बहुमताचा आकडा शेवटचा ठरला. त्यानंतरची घसरण सर्वज्ञात आहे. सतत एवढी निराशाजनक कामगिरी पदरात पडूनही काँग्रेस जनतेची भावना ओळखायला तयार नाही. लोकभावनेचा आदर करायला तयार नाही. ज्या समस्येमुळे देशाचे विभाजन झाले, ती समस्या समजून घेण्याचा आणि तिचे निरसन करण्याचा प्रयत्न या पक्षाने कधीही केला नाही. सातत्याने एका विशिष्ट वर्गाचे लांगूलचालन केल्याचे परिणाम हा पक्ष भोगत आहे. यामधून थोडा देखील धडा घ्यायला काँग्रेस तयार नाही. या पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली गेली पाहिजे, असे वक्तव्य केले. त्यांचेच पुत्र, जे कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये मंत्री आहेत, ते प्रियांक खडगे यांनीही संघावर बंदी आणण्याची मागणी केली. एवढेच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी संघाच्या कार्यक्रमांवर बंदी घालणारा निर्णयही घेतला होता. अर्थात, न्यायालयाने काँग्रेस सरकारला फटकारत हा निर्णय म्हणजे मूलभूत अधिकाराचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. वारंवार चुका करीत असल्याने काँग्रेस अनेक राज्यांत प्रादेशिक राजकारणातून तर जवळपास बाहेर फेकली गेली आहे. आज मोठ्या राज्यांमध्ये काँग्रेसला कुणीही विचारायला तयार नाही. प्रादेशिक पक्षांचे बोट धरून चालण्याची आणि त्यांच्या अटी व शर्थींवर निवडणूक लढविण्याची नामुष्की या पक्षावर आली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या मोठ्या राज्यांमध्ये तर काँग्रेसची अवस्था अतिशय दारुण झाली आहे. प्रादेशिक पक्ष काँग्रेसला बोटावर नाचवत आहेत. या पक्षात स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याची हिंमत उरली नाही. कारण, एकट्याने लढले तर उरलेसुरले अस्तित्व नष्ट होण्याची भीती आहे. प्रादेशिक अथवा राष्ट्रीय पातळीवर सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी ठोस मुद्देही या पक्षाकडे नाहीत. जे मुद्दे हा पक्ष उचलतो, ते बहुतांशी निरर्थक असतात. विशिष्ट वर्गाला खूश ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला दूषणे देणे आणि हिंदुत्वाला विरोध करणे एवढेच काम हा पक्ष आता करीत आहे.

हिंदुत्वाला विरोध करता करता आज मुस्लिम वगळता एकाही समुदायाचा सामाजिक आधार काँग्रेसला उरलेला नाही. बिहारात यादव आणि मुस्लिमांचा पाठिंबा राष्ट्रीय जनता दलाला आहे. या दोन समूहांची एकूण टक्केवारी ३१ आहे. पण, इतर जातींचा पाठिंबा नितीशकुमार यांच्या जदयु आणि भारतीय जनता पक्षाला आहे. काँग्रेसकडे यातले काहीच नाही. सीमांचलमध्ये मुस्लिमांची संख्या धडकी भरविणारी आहे. पण, येथील राजकीय आखाड्यात असदुद्दीन ओवैसी उतरल्याने त्याचा फटका निश्चितच राजद आणि काँग्रेसलाच बसणार आहे. बिहारात काँग्रेसची जी स्थिती आहे, तशीच आता महाराष्ट्रात झाली आहे. लोकसभा असो वा विधानसभा निवडणूक, या पक्षाला आधारच उरलेला नाही. काँग्रेसला १९८५ मध्ये १६१ जागा जिंकत स्वबळावर सत्ता स्थापन करता आली होती. या घटनेला आज ४० वर्षे झाली आहेत. तेव्हापासून काँगेसला एकदाही बहुमत मिळालेले नाही. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तर काँग्रेस पाचव्या क्रमांकावर फेकली गेली. एवढे होऊनही काँग्रेसचे राज्यातील नेते चिंतन करायला तयार नाहीत. सध्या कथित मतचोरीच्या आरोपावरून राज्यातील वातावरण तापलेले आहे. महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाच्या विरोधात रान पेटविले आहे. दोनच दिवसांपूर्वी मुंबईत सत्याचा मोर्चा त्यांनी काढला. या मोर्चातही काँग्रेस सहभागी झाली होती; पण नाईलाजाने! खरंच या पक्षाची स्थिती फारच विचित्र झाली आहे. स्वतंत्र भूमिका घ्यावी की आघाडीत राहावे, हेही ठरविणे काँग्रेसला जड जात आहे. मुंबई महानगरपालिका मुख्यालयाजवळ झालेल्या सभेत सर्वत्र भगवे झेंडे दिसत होते. काँग्रेसचे बाळासाहेब थोरात आणि शरद पवार यांचीही भाषणे झालीत, पण भाव खाऊन गेले ते राज आणि उद्धव ठाकरे.

२०१४ पासून देशात एका नव्या राजकीय पिढीचा उदय झाला आहे. डोळे झाकून काँग्रेसलाच मते देणारी पिढी संपली आहे. जातिपातीचे राजकारण संपत चालले आहे. हिंदुत्वाची लाट आल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. हिंदू धर्मातील सर्वच जाती एकत्र आल्यानेच मोदी सातत्याने तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. याचाच अर्थ आता हिंदू जागा झाला आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्यात सगळे व्यवस्थित असले तरी मतचोरीच्या आरोपांची हवा काढून घेणे गरजेचे आहे. सध्या महाराष्ट्रात मतचोरीचे आरोप होत आहेत. हा मुद्दा पकडून विरोधकांनी रान पेटविले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी केल्याचा नॅरेटिव्ह पसरविला जात आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेस आणि विरोधकांनी संविधान धोक्यात असल्याचा नॅरेटिव्ह जनतेत पसरविला होता. यात काहीही तथ्य नसल्याची जाणीव एव्हाना सर्वांना असली तरी त्याचा रालोआला फटका बसला, हे मान्य करावे लागेल. यावेळी महाविकास आघाडीने कथित मतचोरी आणि मतदारयाद्यांवरून निवडणूक आयोगाला आव्हान दिले आहे. मतदारयाद्यांमध्ये अनेकांची नावे दोनदा-तीनदा असल्याचा दावा करणारे पुरावे असल्याचा दावा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे करीत आहेत. शेवटी सत्य बाहेर येईलच; पण, लोकांच्या मनात शंका राहूच नये. या विषयाकडे आयोगाने लक्ष देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र काही उत्तर प्रदेश अथवा बिहार नाही. येथील मतदार सुजाण आणि जागरूक आहेत. कार्यकारी मंडळाबरोबरच न्यायालये आणि निवडणूक आयोग हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या संवैधानिक संस्थांविषयी जनतेच्या मनात जरा सुद्धा शंका उत्पन्न होणे जोखमीचे आहे. काहीही झाले तरी लोकशाहीचे घटक असलेल्या या संस्था पूर्णपणे विश्वासार्ह असणे गरजेचे आहे. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे १९९६ मधील संसदेतील भाषण अजरामर ठरले. सत्ताकारण होत राहील; हा देश आणि लोकशाही टिकली पाहिजे, हा त्यांच्या भाषणाचा गाभा होता. ''सत्ता का खेल तो चलेगा, सरकारे आएगी, जाएगी, पार्टीयां बनेगी, बिगडेंगी, मगर ये देश रहना चाहिए, इस देश का लोकतंत्र अमर रहना चाहिए'' या शब्दांमधून वाजपेयी यांचे सत्तेवरचे नव्हे तर लोकशाहीवरचे, या देशावरचे प्रचंड प्रेम आणि श्रद्धा असल्याचे दिसून आले होते. सत्ता नसल्याने काँग्रेस सैरभैर आणि हताश झाली आहे. त्यांचे मित्रपक्ष देखील अवसान गमावून बसले आहेत. निवडणूक प्रक्रियेबाबत संशय उत्पन्न करणे हाच जणू त्यांच्या अस्तित्वाचा आधार. तो काढून घ्यायला हवा म्हणजे काँग्रेस आणि कथित मित्रांच्या आरोपांतील हवा कायमची निघून जाईल, विरोधकांच्या बोंबा बंद होतील आणि त्यांना नवा मुद्दा शोधणे भागच पडेल!...

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# नितीश-लालू यांची शेवटची निवडणूक!

बिहारच्या राजकारणातील नितीशकुमार नावाचे नाणे कोणत्या बाजूने पडणार यावर राज्य विधानसभा निवडणुकीचे निकाल काही प्रमाणावर अवलंबून राहतील असे मानले जाते. बिहारचे राजकारण मागील काही दशकांपासून नितीशकुमार व लालूप्रसाद यादव या दोघांभोवती फिरत आहे. ही निवडणुक दोघांसाठीही शेवटची निवडणूक असेल असे सर्वसाधारणपणे मानले जाते. ५१ वर्षांपूर्वी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातून उदयास आलेले नितीशकुमार व लालूप्रसाद यादव कधीकाळी मित्र होते, सहयोगी होते. पण, लालूप्रसाद यादव यांच्या माफिया शैलीने एक दिवस नितीशकुमार यांना भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या उंबरठ्यावर नेऊन उभे केले. जुन्या संसद भवनाच्या सेंट्रल हॉलबाहेर जमलेल्या पत्रकारांना नितीशकुमार यांनी आपण भाजपकडे का गेलो याचे विश्लेषण करताना सांगितलेले मुख्य कारण होते बिहारमधील माफियाराज. नंतर या दोघांचे राजकीय मार्ग वेगवेगळे झाले. लालूप्रसाद यादव काँग्रेसकडे गेले तर नितीशकुमार यांनी भाजपचा रस्ता धरला.

**शेवटची संधी** : २०२५ मध्ये होत असलेली ही विधानसभा निवडणूक लालूप्रसाद व नितीशकुमार दोघांचीही शेवटची निवडणूक आहे. लालूप्रसाद यादव यांचे सक्रिय राजकारण कमी झाले आहे. त्यांच्यावर पुन्हा काही गंभीर खटले दाखल झाले आहेत तर दुसरीकडे नितीशकुमार यांच्या मानसिक स्वास्थ्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आपल्या आयुष्यातील या शेवटच्या लढतीत कोण कुणावर मात करतो यावर राजकीय समीक्षकांचे लक्ष लागले आहे.

नितीशकुमार यांच्या जनता दल युने भाजपसोबत युती केली आहे तर लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने काँग्रेससोबत युती केली आहे. नितीशकुमार यांची विश्वसनीयता ही त्यांच्या पक्षाची सर्वांत जमेची बाजू असल्याचे मानली जात होती. मधल्या काळात नितीशकुमार यांनी ज्या राजकीय कोलांटउड्या मारल्या, त्याने त्यांच्या प्रतिमेला काहीसा तडा गेला आहे.

**लालूला झिडकारले** : लालूप्रसाद यादव यांनी १५ वर्षे सलग बिहारवर एकछत्र राज्य केले. पण नंतर त्यांच्या जंगलराजला कंटाळून जनतेने नितीशकुमार यांना कौल दिला. लालूप्रसाद यांच्या राजवटीत रात्री ७ नंतर बिहार बंद होत असे. विकास नावाचा मुद्दा संपला होता. कायदा सुव्यवस्था संपली होती. अपहरण हा रोजचा खेळ झाला होता. या साऱ्याला कंटाळून जनतेने नितीशकुमार यांना कौल दिला. एक धीरगंभीर नेता अशी त्यांची प्रतिमा होती. त्यानुसार त्यांनी कामही केले. राज्यातील कायदा-सुव्यवस्था स्थिती सुधारली. विकासाच्या कामांना गती देण्याचा प्रयत्न केला. राज्यातील दररोज घडणारे अपहरणनाट्य संपविले.



मात्र हे सारे काही साध्य होऊन काही वर्षांचा काळ लोटला आहे. जनतेला आता आणखी नवे काहीतरी हवे आहे आणि त्यात मुख्य आहे - रोजगार!

**रोजगार-बेरोजगार** : बिहारमध्ये रोजगार नाही आणि यामुळे राज्यातील युवा वर्ग नाराज आहे. बिहारची जनताही आता नितीशकुमार यांच्या नेतृत्वाबाबत काहीशी उदासीन झाली आहे. एकीकडे नितीशकुमार यांची विकासपुरुष ही प्रतिमा आणि दुसरीकडे त्यांचे काहीसे निस्तेज नेतृत्व अशी स्थिती तयार झाली असून बिहारचा मतदार विकासपुरुष नितीशकुमार यांनाच मतदान करतो की त्याला त्यांचा कंटाळा आला असल्याने तो नवा पर्याय निवडतो याचा निवाडा या निवडणुकीत होणार आहे.

**नवे नेतृत्व** : बिहारच्या राजकारणात काही वर्षांपूर्वी लालूप्रसाद यादव यांचे सुपुत्र तेजस्वी यादव यांचा उदय झाला असून, मागील काही महिन्यांत त्यांच्या सभांना जोरदार प्रतिसाद मिळत आहे. मात्र हा प्रतिसाद मतांमध्ये परिवर्तित होईल वा नाही हा मात्र एक अनुत्तरित प्रश्न आहे. अगदी स्पष्ट शब्दात मांडावयाचे झाल्यास, बिहारची जनता लालूप्रसाद व नितीशकुमार दोघांचेही राजकारण संपवित तेजस्वी यादवला एक संधी देईल काय याचे उत्तर ही निवडणूक देणार आहे.

**निर्णायक एम** : बिहारच्या राजकारणात 'एम' घटक नेहमीच निर्णायक राहिलेला आहे. मुस्लिम, मनी पॉवर व मसल पॉवर म्हणजे बाहुबली हे तीन घटक बिहारच्या राजकारणाला प्रभावित करीत असत. यात यावेळी आणखी एका 'एम'ची भर पडली आहे तो म्हणजे महिला घटक. केंद्र सरकारने राबविलेल्या काही योजनांचा मोठा फायदा महिलांना मिळाला आहे. या साऱ्याचा फायदा भाजपला मिळेल काय असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. महिला घटकाने भाजपला साथ दिल्यास, निस्तेज झालेल्या नितीशकुमार यांच्यामुळे होणारे सत्तारूढ आघाडीचे नुकसान भरून निघेल असे राजकीय समीक्षकांना वाटते.

**राहुल गांधी घटक** : बिहारमधील मतदारयाद्यांना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एक मुद्दा बनविले होते. हा सारा विषय सर्वोच्च न्यायालयात गेला होता. प्रारंभी ६५ लाख मतदारांची नावे मतदारयाद्यांमधून काढली गेली होती. आता ४२ लाख मतदारांची नावे काढण्यात आली आहेत. निवडणुकीनंतर ४२ लाख मतदारांचा मुद्दा उपस्थित केला जाईल काय हा एक प्रश्न आताच विचारला जाऊ लागला आहे.

**याचिका नामंजूर** : सर्वोच्च न्यायालयाने मतदारयाद्यांमधील कथित गडबडींची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती नेमावी अशी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावीत याचिकाकर्त्यास निवडणूक आयोगाकडे जाण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने अगदी योग्य असा निर्णय घेतला आहे.

बिहारमध्ये राहुल गांधी यांच्या प्रचारसभांना प्रतिसाद मिळाला असल्याचे मानले जाते. तेजस्वी यादव व राहुल गांधी यांचा संयुक्त प्रचार दौरा विरोधी आघाडीस विजय मिळवून देईल असा विश्वास या आघाडीच्या नेत्यांना वाटत आहे.

**तुल्यबळ लढत** : बिहारच्या लढतीचे सध्याचे चित्र तरी तुल्यबळ असे आहे. नितीशकुमार यांची प्रतिमा ही सत्तारूढ आघाडीसाठी जमेची आणि उणेची बाजू ठरत आहे असे दिसते तर त्याचवेळी महिलांसाठी राबविण्यात आलेल्या योजना सत्तारूढ आघाडीसाठी जमेची बाजू ठरतील. विरोधी आघाडीचा विचार केल्यास तेजस्वी यादव-राहुल गांधी यांची जोडी या आघाडीसाठी जमेची बाजू आहे. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवर दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते किती जोमाने व एकोप्याने काम करतात हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**प्रशांत किशोर** : बिहार विधानसभा निवडणुकांची घोषणा होईपर्यंत प्रशांत किशोर यांच्या पक्षालाही राज्याच्या राजकारणातील महत्त्वाचा घटक मानले जात होते. सरकारमधील भ्रष्टाचाराला त्यांनी मुख्य मुद्दा बनविले होते. मात्र, त्यांनी स्वत: निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला. याचा विपरीत परिणाम त्यांच्या कार्यकर्त्यांवर होत असून हा घटनाक्रम भाजपच्या पथ्यावर पडेल तसे मानले जाते. प्रशांत किशोर यांनी ताकदीने निवडणूक लढविली असती तर त्याचे काही प्रमाणात नुकसान भाजपला झाले असते असे म्हटले जात होते. बिहारमधील निकाल कसे असतील यावर राजकीय समीक्षकांमध्ये वेगवेगळी मते असली तरी एका मुद्यावर मात्र सर्वांचे एकमत आहे. तो म्हणजे ही लढत एकतर्फी नाही, तर तुल्यबळ आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# लग्नाची धामधूम

लग्न म्हटले म्हणजे नुसती लगबग, मग ती कामांची असो, खरेदीची असो, याद्या बनवण्याची असो... संपूर्ण घर कामाला लागतं. अगदी घराच्या रंगरंगोटीपासून सुरुवात असते. घराची रंगरंगोटी झाल्यानंतर धान्याची आणि सामानाची साठवणूक सुरू होते. एकेक सामान आपल्या गरजेनुसार आणि ऐपतीनुसार घरात येतं. लग्नाचे दिवस जवळ येताच दारात मांडव घातला जातो, दिव्यांच्या माळा लागतात, पाहुण्यांची वर्दळ वाढते, खाद्यपदार्थांचा खमंग सुवास दरवळत राहतो. जो-तो धावत असतो. या संपूर्ण कार्यक्रमाचा खऱ्या अर्थाने कोणी आनंद घेत असेल तर ते घरातील लहान मुलं असतात. त्यांच्याकडे फार मोठ्या जबाबदाऱ्या नसतात, छोटी छोटी कामेच दिली जातात. पण, त्यातही ते प्रचंड खुश असतात.

हा झाला घरातील मुलगा किंवा मुलगी यांच्या लग्नाचा प्रसंग. मात्र, आजपासून काही वर्षांआधी घरोघरी जेव्हा तुळशीचं लग्न लागायचं तेव्हाही वर सांगितल्याप्रमाणे नाही तरी त्याच्या ५० टक्के तरी माहौल असायचाच. दिवाळीनंतर लगेचच येणाऱ्या तुळशीच्या लग्नासाठी घरात नव्याने अनारसे, बेसनाचे लाडू बनायचे. आजही अनेक घरी साग्रसंगीत तुळशी विवाह साजरा होतो. कार्तिक द्वादशी तिथीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाह केला जातो. मात्र, आज आपली ही परंपरा काहीशी मागे पडते आहे. तिचे पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे. कारण निसर्ग आणि देव या दोन्हींसोबत मानवाचे जवळचे नाते आहे. तुळशी विवाह या दोन्ही घटकांचा मिलनाचा अद्भुत सोहळा आहे. निसर्ग आणि देवाचे नाते किती अतूट आहे, हे दाखविण्याचे जणू प्रतीक हा सोहळा आहे. तसे आपल्या बहुतांश सणात निसर्ग आणि देव यांचा परस्पर संबंध आहेच. महादेवाला बेलाचे पान वाहणे असो किंवा गणपतीला दूर्वा अर्पण करणे असो, वडाच्या झाडाला सूत गुंडाळणे असो किंवा हरितालिकेला विविध पत्री वाहणे असो, प्रत्येक सणाचा निसर्गाशी कुठे ना कुठे संबंध आहेच. याच परंपरेतील तुळशी विवाहालादेखील निसर्ग आणि देव असे सुरेख अधिष्ठान आहे.

आजकाल देव म्हटले की नवीन पिढी फारशी रुची घेत नाही, असा अनुभव आहे. मात्र, हे पालकांवर अवलंबून आहे की आपण त्या पिढीला यामागील निसर्ग संगोपनाची, लोकांच्या एकत्रीकरणाची महत्ता कशी समजावून सांगतो. तुळशीचे छोटेसे रोप हवेतील प्रदूषण कमी करतं, आपल्या आजूबाजूचे वातावरण शुद्ध करून ऑक्सिजनचे प्रमाण वाढवतं. एवढेच नाही तर असंख्य लहान-मोठ्या आजारांवर तुळशीचा उपयोग अतिशय गुणकारी ठरतो. आयुर्वेदात याचे अपार महत्त्व सांगितले आहे. असे हे छोटेसे रोप किती महत्त्वाचे आहे, याविषयी घरातील नवीन पिढीला माहिती कळायला हवी. आज वाढत्या प्रदूषणावर आपले नियंत्रण नाही मात्र, त्याचे प्रमाण कमी करून वातावरण जास्तीत जास्त शुद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी नक्कीच आहे. त्या दृष्टीने तुळशीचे रोप अतिशय उपयुक्त आहे. अशा या तुळशीचे नवे रोप आपण विवाहासाठी वापरतो. तिचा विवाह विष्णू अवतारातील शाळिग्रामासोबत लावला जातो. हे संपूर्ण विश्व सांभाळण्याचे काम जणू या दाम्पत्याने आपल्या शिरावर घेतले आहे. त्यामुळे त्यांच्या विवाहाचा सोहळा धडाक्यात करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपल्याला मिळते. एरवी घरातील लग्नासाठी करतो तशीच पण, छोटेखानी तयारी या लग्नासाठी असते. उसाचा मांडव, सजवलेले तुळशी वृंदावन, त्यात नवीन तुळशीचे कोवळे रोप, बोर, भाजी, आवळ्याची पुडी, अंतरपाटाचे स्वच्छ, शुभ्र आणि स्वस्तिकाचे शुभचिन्ह असलेले वस्त्र, बेसनाचे शुद्ध तुपातील लाडू तसेच गोड अनारशांचा नैवेद्य असा सर्व थाट असतो. अक्षता वाटल्या जातात, मंगलाष्टके म्हटली जातात. विशेष म्हणजे, या निमित्ताने आपल्या आप्तस्वकीयांचे एकत्रीकरण होऊन आनंदपूर्ण संवादाची देवाणघेवाण होते. या आनंदाचा ठेवा आपण नकळत नवीन पिढीकडे हस्तांतरित करतो आणि तेदेखील पुढील वर्षी आनंदाने या सोहळ्याची तयारी करण्यापासून सहभागी होतात. हेच आहे खऱ्या अर्थाने परंपरेचे पाईक होणे. पुढील तीन दिवस चालणाऱ्या या आनंदोत्सवात आपणही या परंपरेचे वाहक होण्याचा संकल्प करूया.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# विवाहसंस्था; काल, आज आणि उद्या

विवाहसंस्थेचा भारतीय इतिहास अतिशय प्राचीन आहे. भारत हे एक अतिशय प्राचीन राष्ट्र असल्यामुळे सामाजिक सभ्यतेचा सर्वप्रथम उदय याच राष्ट्रात झाला. पूर्वीच्या काळी विवाह हा एक संस्कार होता. हिंदू धर्मामध्ये जे १६ संस्कार सांगितलेले आहेत त्यापैकी हा एक संस्कार आहे. यामध्ये वधूने करावयाचे कार्य आणि वराच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टी निश्चित केलेल्या राहायच्या. विवाह हा गृहस्थाश्रमातील प्रवेश होता. धर्मामध्ये सांगितल्यानुसार, मानवाचे जीवन हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थांवर आधारित असायला पाहिजे. गृहस्थाश्रम हा या पुरुषार्थांवर आधारित होता. यामध्ये अर्थ आणि काम यांची साधना धर्माच्या आधारावर केली जायची. विवाहाचे विविध प्रकार होते ज्यामध्ये ब्रह्म विवाह, दैव विवाह, आर्ष विवाह, प्रजापत्य विवाह, असुर विवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह, पैशाच विवाह असे प्रकार होते. यामध्ये ब्रह्म, दैव, आर्ष आणि प्रजापत्य यांना चांगले मानले गेलेले होते, तर उर्वरित चार प्रकारांना चांगले मानले जात नव्हते.

आपल्या सर्वच देवी-देवतांची नावे जर आपण आठवली तर शंकर म्हटलं की आपल्याला पार्वती आठवते, विष्णू म्हटलं की लक्ष्मी आठवते, इंद्र म्हटलं की शची आठवते. त्यामुळे आपले देव सुद्धा विवाहित होते. जो मार्ग देवांनी दाखविलेला होता, तोच मार्ग ऋषींनी आणि समाजाने सुद्धा अनुसरलेला होता. वशिष्ठ ऋषींचे नाव आठवल्यावर आपल्याला त्यांची पत्नी अरुंधती हिचे नाव आठवते. याज्ञवल्क्य म्हटल्यावर मैत्रेयीचे नाव आठवते. अगस्ती ऋषींचे नाव घेतल्यावर लोपामुद्राचे नाव आठवते. अत्री-अनसूया, जमदग्नी-रेणुका ही नावे आपल्याला माहीत आहेत. आमच्या ऋषिमुनींनी सुद्धा जंगलामध्ये राहून आपले आश्रम स्थापन केले, स्वत: उत्तम गृहस्थ जीवन जगले आणि हजारो विद्यार्थ्यांना लौकिक व पारलौकिक शिक्षण दिले. मोठे मोठे राजे सुद्धा विवाहितच होते. हिंदू धर्मामध्ये घटस्फोट असा प्रकार नव्हता. पती आणि पत्नी दोघेही एकमेकांना पूरक कसे बनू, याचा प्रयत्न करायचे. विवाह हा करार नव्हता; त्यामुळे तो संस्काराचा भाग म्हणून आजन्म चालविला जायचा. दोन वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र आल्यावर सहवासाने प्रेम निर्माण होते, हा थोरामोठ्यांचा अनुभव होता. त्यांच्यामध्ये वादविवाद होणे हे सुद्धा नैसर्गिक मानले जायचे. कुठल्याही वादांत मोठ्यांनी मार्गदर्शन करून सुधारणा केली जायची. संततीच्या भविष्यासाठी पती-पत्नी दोघेही स्वत:मध्ये बदल करण्याचा प्रयत्न करायचे, त्यामुळे मुलांना आई-वडिलांचे प्रेम लाभायचे.



स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये १९५५ साली हिंदू कोड बिल अंमलात आणले गेले. त्यामध्ये हिंदू धर्मीयांमधील बहुपत्नीत्व समाप्त करून एकपत्नीत्व कायदेशीर करण्यात आले. कोणी आनंदाने तर कोणी कुरकुर करीत त्याचे स्वागत केले. परंतु आता विवाह जरी संस्काराचा भाग म्हणून केला जायचा, तरी सर्वांना माहिती झाले की हा एक करार आहे, कायद्याचा भाग आहे. पुढे ही भावना दृढ होत गेली. जमले तर ठीक, नाहीतर घटस्फोट. महिलांमध्ये शिक्षण, हक्क, समानता यासंबंधीची आधुनिक मते प्रसारित होऊ लागली. त्यामुळे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह जन्मास येऊ लागले. सरकार आणि सामाजिक संघटनांनीही यांस प्रोत्साहन दिले. महिला शिक्षण, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडू लागल्या. त्यातून काही स्त्रियांनी आपल्या पसंतीचा जोडीदार निवडला. काही विवाह टिकले, काही संपले. समाजाने ही कल्पना आधी कुजबूज स्वरूपात आणि आता सहज स्वीकारली आहे. विवाहविच्छेद ही एक सर्वसामान्य घटना झाली आहे.

एका सुंदर मुलीच्या घटस्फोटाची गोष्ट प्रसिद्ध आहे. ती आणि तिचा नवरा दोघेही सुंदर व यशस्वी होते. न्यायालयात विचारल्यावर ती म्हणाली, ''मला बंगलोरला ५० लाख पगाराची नोकरी मिळाली आहे; मी याला सोबत यायला सांगितले, पण तो पुण्यातच राहू इच्छितो. त्यामुळे आम्ही घटस्फोट घेत आहोत.'' या घटनेने नवीन पिढीचे दृष्टिकोन स्पष्ट केले. त्यांची नोकरी बदलण्यासाठी नवरा बदलण्याचीही तयारी आहे.

आता लिव्ह-इन रिलेशनशिपची सुरुवात झाली आहे. वर-वधू संशोधनासाठी विविध वेबसाईट्स उपलब्ध आहे. पूर्वी चहा-पोहे खाऊन जे काम व्हायचे ते आता ऑनलाईन होत आहे. पूर्वी जमवलेले विवाह हे बहुतांश मध्यस्थांच्या द्वारा ओळखी पाळखीतून जमविले जायचे, ते आता ऑनलाईन चॅटिंग आणि झूम मीटिंगच्या द्वारे जमविले जात आहेत. मूल नको असलेले जोडपे, म्हणजे डिंक कपल, हा समज समाजात रुजत आहे. दोघेही कमावते असल्याने, मुलं ही करीअरमधील अडथळा वाटू लागली आहेत. लग्न आणि जबाबदाऱ्या या सुद्धा काहींना अडथळा वाटतात. पुढील काळात नोकरी गमावणे हेही विवाहविच्छेदाचे एक कारण ठरू शकते. घर, फ्लॅट विकत घेण्याची जबाबदारी आता दोघांनी उचललेली आहे. त्यामुळे स्वत:ची गरज भागविण्यासाठी विवाह केले जात नाहीत. नवीन पिढीची पालक आणि नातेवाईकांची जबाबदारी घ्यायची इच्छा कमी होत चालली आहे. कदाचित पुढील काळात लोक मैत्रीतून किंवा प्रेमातून राहतील, पण विवाहाच्या बंधनात राहतीलच, असे नाही. ''जर असेच राहू शकतो, तर विवाहाचे बंधन हवे कशाला आणि कायद्याच्या कटकटी नकोच,'' असा सूर उमटताना दिसतो. कदाचित विवाहसंस्थेचा मूळ उद्देश लक्षात घेऊन ते पुन्हा विवाहसंस्थेकडे सुद्धा आकर्षित होऊ शकतात. दोन्ही प्रकारच्या संभावना भविष्याच्या उदरात दडलेल्या आहेत.

गाडीला एक्सलेरेटर असणे आवश्यक आहे, कारण गती लागतेच. पण त्याला गिअर आणि ब्रेकही असावे लागतात; नाहीतर अपघात होऊ शकतो. तसेच नात्यांनाही नियंत्रणाची, संयमाची गरज आहे. आमच्या देवतांनी, ऋषिमुनींनी, महापुरुषांनी ही व्यवस्था फार प्राचीन काळापासून उभी केलेली आहे. विवाह हा संस्कार आहे, करार नाही हे लक्षात घेतले तरच विवाहसंस्था टिकू शकते. नोकरी करणे ही तडजोड आहे, तसेच संसार करणेही तडजोड आहे. एखाद्याचे दोष पाहिले, तर शंभर दोष दिसतात; गुण पाहतो म्हटले तर गुणही दिसतील. पण जसे वारंवार नोकरी बदलल्याने बायोडाटा खराब होतो, तसेच वारंवार संबंध तुटल्याने जीवनही विस्कळीत होते. मानवी नातेसंबंध समर्पण, त्याग आणि तडजोडीवर आधारित आहेत. हे ध्यानात घेतल्यास विवाहसंस्था अजून काही काळ स्थिर राहील आणि समाजाला त्याचे फायदे मिळतील. ''घरोघर ज्ञानेश्वर जन्मावा, घरोघर शिवाजी जन्मावा'' अशी इच्छा बाळगणाऱ्या लोकांनी विवाहसंस्थेला बळकटी देण्यासाठी काम करणे गरजेचे आहे. अन्यथा वृद्धाश्रम हा वृद्धांसाठी एकमेव पर्याय उरेल आणि भारत सरकारला अमेरिकेसारखे वृद्धाश्रम नियोजन करावे लागेल. समाजातील सुजाण लोकांनी समाजाचे मार्गदर्शन करणे आणि विवाह संस्थेला बळ देणे गरजेचे आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आयडियाची कल्पना!

महाविकास आघाडीतर्फे १ नोव्हेंबरला मुंबईत सत्याचा मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्चात उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासह शरद पवार, बाळासाहेब थोरात, सुप्रिया सुळे हेही सहभागी झाले होते. मतदारयाद्या दुरुस्त झाल्याच पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे. (अशीच मागणी महायुतीच्या नेत्यांनीही केली आहे.) तेथील सभेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी दुबार मतदार दिसले की आधी त्यांना तिथेच बडवायचे आणि मग पोलिसांकडे सोपवायचे अशी आक्रमक भूमिका घेतली. अलिकडे थोड्याच वर्षांपूर्वी शरद पवार यांनी नवी मुंबई येथे माथाडी कामगारांच्या सभेत बोलताना, एका दिवसात दोन वेळा मतदान कसे करायचे, याबाबत एक आयडियाची कल्पना जाहीरपणे सांगितली होती: सकाळी सातारा जिल्ह्यात मतदान करायचे आणि बोटाची शाई पुसून लगोलग नवी मुंबईत येऊन दुबार मतदान करायचे! प्रचंड बहुमत प्राप्त करण्यामागील नार्कोसत्यच त्यांनी सांगितले होते! अशा अतिविशिष्ट प्रकारातील दुबार मतदार आढळल्यास ठाकरे बंधू त्यांचे काय करणार?

**अविनाश वाघ**/पुणे

## वाचक पत्रे

### प्रदूषणाने झालेले मृत्यू म्हणजे सार्वजनिक आरोग्य संकट

देशाची राजधानी दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर असल्याचा एक अहवाल मध्यंतरी आला होता. आता दिल्लीची विषारी हवा लोकांचा जीव घेत असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. तेथील सुमारे १५ टक्के रहिवासी प्रदूषणामुळे मरत आहेत. एका अभ्यासातून उघड झालेला हा अहवाल धक्कादायक आहे. हे आकडे २०२३ मध्ये अपेक्षित मृत्यूंवर आधारित आहेत. इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स ॲण्ड इव्हाल्युएशनने १ नोव्हेंबर रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २०२३ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी १७ हजार १८८ रहिवाशांचा मृत्यू प्रदूषणामुळे झाला. याचाच अर्थ राजधानीत प्रत्येक सात पैकी एक मृत्यू हा प्रदूषणामुळे होतो. जर वर्षाला प्रदूषणामुळे १५ टक्के मृत्यू एकट्या दिल्लीत होत असतील तर देशात किती लोकांचा मृत्यू प्रदूषणामुळे होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी. उच्च रक्तदाब आणि मधुमेहापेक्षाही प्रदूषणाने अधिक मृत्यू होतो याला सार्वजनिक आरोग्य संकट म्हटले पाहिजे. वर्षाला १५ टक्के मृत्यू प्रदूषणाने होतात हा अहवाल धोक्याचा इशारा देणारा आहे. यावर वेळीच उपाय केले नाही तर ही आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळेच वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांसाठी सम-विषमसारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करून ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल आणि प्रदूषणामुळे होणारे मृत्यूही कमी करता येईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-३१

सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५

### विजयाचे पद पुढे टाकिले

विजयाचे पद पुढे टाकिले
मनांमनांतुनि करुनि जागरण
दुडुम् दुडुम् दुंदुभी घुमविले ॥धृ.॥

कालौघाला स्पर्श कशाचा
कमलदळाला जसा जलाचा ।
क्षणभर भाव न उदासतेचा
चंचल चित्तहि अचल बनविले ॥१॥

इतिहासाच्या संस्कारानी
विजयकथा त्या पुन्हा स्मरोनी ।
संघर्षाला सिद्ध होउनी
पहिले पाउल ठाम रोविले ॥२॥

प्रतीक भगवे या सर्वांचे
हिमशिखरावर डुलवायाचे ।
अखंड भारत निनाद साचे
हृदयाहृदयांतून गर्जले ॥३॥

व्हावी सेवा मातृभूमिची
मनी आस तर समर्पणाची ।
जीवनपूजा ध्वजराजाची
गुरुपूजेचे गान गाइले ॥४॥

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पान १ वरुन...

व समिती सदस्य तसेच समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, पंढरपूर येथे आषाढी व कार्तिकी वारीमध्ये लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. भाविकांना दर्शन रांगेत चांगल्या सुविधा मिळण्याबरोबरच कमी वेळेत दर्शन होण्यासाठी दर्शन मंडप काम गतीने होणे गरजेचे आहे यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी. श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद केलेले असून वारकऱ्यांना लवकर दर्शन मिळत आहे. कारण वारकरी हाच व्हीआयपी असल्याचे त्यांनी सांगून वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने चांगले नियोजन केल्याचेही त्यांनी सांगितले. सांगून राज्यातील सर्व भाविकांना कार्तिकी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या तसेच मानाच्या वारकऱ्यांचे अभिनंदन केले व या यात्रा कालावधीत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार व स्थानिक प्रशासन यांनी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

### नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी ठोस कार्यक्रम

आपल्या राज्याने सर्व क्षेत्रात उत्कृष्ट काम करून प्रथम क्रमांकावर राहावे, विविध कल्याणकारी योजनाची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या विकासाची पताका सर्वत्र फडकावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याप्रमाणेच चंद्रभागा नदीसह सर्व नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी सौ.लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी रामराव वालेगावकर व त्यांच्या पत्नी सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावर्षी प्रथमच मानसी आनंद माळी व आर्य समाधान थोरात या दोन शालेय विद्यार्थ्यांची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आलेली होते. यावेळी उपमुख्यमंत्री व सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने तयार केलेल्या दैनंदिनी २०२६ चे देखील प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले तर आभार कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मानले.

# जिल्ह्यातील सर्व बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड

**२ ते ३ दिवसांत सर्वांना मिळणार आर्थिक मदत**

**आरडीसी अभिजित पाटील यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून बाधित शेतकऱ्यांच्या याद्या तत्काळ अपलोड करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या असल्याने सर्वच तालुक्यातील आमची महसूल यंत्रणा याद्या अपलोड करण्याच्या कामाला लागली होती; या कर्मचाऱ्यांची ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या आणि या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आहे. यातील सर्वच रक्कम मंजूर झाली असून, यातील जवळपास ७० ते ८० टक्के लोकांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यात आले असून, उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावरही येत्या २ ते ३ दिवसात पैसे पडतील, अशी माहिती आरडीसी अभिजित पाटील यांनी आज (दि. ०२) दिली.




मागील आठवड्यातील गुरूवार-शुक्रवारपर्यंत ४४० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले होते. शनिवार, रविवारीही यामध्ये भरीव वाढ झाली आहे. एकंदरीत, आजतागायत जवळपास ८० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे पडले असून, उर्वरित बाधित शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे मिळणार आहेत. शासनाने महापुराच्या संकटात नुकसान भरपाई देण्याचा शब्द दिला होता. इतकेच नाहीतर घरांच्या बाधित कुटुंबांना दिवाळीपूर्वी पैसे मिळाले तर सर्वच पूरग्रस्तांना दिवाळीसाठी कीट वाटप केले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळू लागल्याने महापुराच्या संकटातून खचलेल्या शेतकऱ्यांना यातून नक्कीच बळ मिळणार आहे.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुराने बाधित शेतकरी एकूण संख्या ७ लाख ६४ हजार १७३ इतके आहेत. यांचे बाधित क्षेत्र ६ लाख ०४ हजार ६४१.४३ हेक्टर इतके असून, या सर्वांचा एकूण अपेक्षित निधी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ इतका असून, याचा फायनल अहवाल शासनाकडे नुकताच पाठविला आहे. त्यानुसार पूर्ण रक्कम मंजुरीचा जीआरही आला आहे. यानुसार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्ह्यात ६ लाख ९० हजार ७३६ इतके पीएम किसान सन्मान योजनेत शेतकरी समाविष्ट आहेत; यातील ६ लाख ५३ हजार १०७ शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक केलेला आहे. यामुळे याद्या जसजशा अपलोड होत आहेत; त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत.

हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. असाही निर्वाळा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही गैरसमज करून घेवू नये, सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांचा ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या ८ ते १० दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्ट केले.

### 'ॲग्रीस्टॅक'साठी जिल्हाभरात कॅम्पचे आयोजन

जिल्ह्यातील अजून १० ते १२ टक्के लोकांचे ॲग्रीस्टॅक झाले नसल्याने त्यांच्या खात्यावर ही नुकसान भरपाईची रक्कम मिळणार नाही. त्याही शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे यासाठी गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक करून घेतले जाणार आहेत. तर आमचे अधिकारी, कर्मचारी मोठमोठ्या गावात जावून प्रत्येक गावातील २० ते २५ माणसांशी चर्चा करून शासनाकडून येणारी मदत मिळते की नाही? याचीही चौकशी करून त्यांच्या अडचणी सोडविणार आहेत.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर**

# कृषिपूरक औजारे खरेदीसाठी प्रतीक्षेतील लाभार्थ्यांना संधी

**लाभार्थी शेतकऱ्यांनी फिरवली पाठ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद कृषी विभागाच्या डीबीटी योजनेतील पन्नास टक्केच लाभार्थ्यांनी कृषिपूरक साहित्य खरेदी केले आहेत. शेतकऱ्यांनी त्याकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील शेतकऱ्यांना संधी मिळणार आहे.

कृषी विभागाने विविध प्रकारच्या तेरा कृषिपूरक औजारांसाठी ऑगस्ट महिन्यांत लॉटरी काढली होती. त्यावेळी २,४५९ शेतकऱ्यांना शेतीपूरक औजारांची लॉटरी लागली. त्यातील १,२५९ शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी केले. त्यामुळे कृषिपूरक औजारे खरेदीचा कल कमी झाल्याचे दिसत आहे. कृषी विभागाकडील डीबीटी योजनेसाठी २१ हजारापेक्षा जास्त अर्ज विविध तालुक्यातून आले होते. त्यातील २,४५९ लाभार्थ्यांना शेतीपूरक औजारे लॉटरी पद्धतीने लागली होती. त्यातील १,२५९ लाभार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत शेतीपूरक औजारे खरेदी केली आहेत.

### ५० टक्के शेतकऱ्यांचीच साहित्य खरेदी

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने २० ऑगस्ट २०२५ रोजी लॉटरी पद्धतीने कृषीपूरक विविध तेरा औजारांची लॉटरी काढली होती. ती साहित्य खरेदी करण्यासाठी तीनवेळा मुदतवाढ दिली. मात्र, त्यानंतरही फक्त ५० टक्केच शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी केले आहेत. त्यामुळे उर्वरित साहित्य खरेदीसाठी प्रतीक्षेतील लाभार्थ्यांना खरेदीची संधी देण्याचा निर्णय घेतले आहे. तशा सूचना प्रत्येक तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे जवळपास एक हजार प्रतीक्षेतील लाभार्थ्यांना विविध कृषी पूरक साहित्य खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

**-हरीदास हावळे, जिल्हा कृषी विकास अधिकारी, जि.प. सोलापूर**



**ठेवीदारांना कर्मचाऱ्यांचा मदतीचा हात..**

**सोलापूर : समर्थ बँक कर्मचारी ठेवीदारांना अर्ज भरण्यास मदत करताना कर्मचारी. शनिवारी सकाळी टिपलेले छायाचित्र.**

## महत्वाचे...

### भाजपा हा सर्वांना बरोबर घेऊन जाणारा पक्ष : राजन पाटील-अनगरकर

**मोहोळ, दि. २ नोव्हेंबर-**

भाजपा हा सर्वांना बरोबर घेऊन जाणारा पक्ष आहे. केंद्रात मोदींचे आणि राज्यात देवा भाऊचे सरकार सर्वांच्या हितासाठी प्रयत्नशील आहे. अल्पसंख्यांकाने भाजपाला घाबरण्याची अजिबात गरज नाही. उलट या डबल इंजिन सरकारचा फायदा करून घेऊन आपल्या शहराचा विकास साधावा आणि दरडोई उत्पन्न वाढवा यासाठी भाजपाच्या पाठीशी उभे रहा असे आवाहन भारतीय जनता पार्टीत नुकतेच प्रवेश केलेले माजी आमदार राजन पाटील (अनगरकर)यांनी केले. मोहोळ नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोहोळ शहरात इच्छुक उमेदवार व सर्व कार्यकर्ते यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजनप्रसंगी ते बोलत होते .यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्हा (पूर्व)चे अध्यक्ष शशिकांत चव्हाण, मोहोळ उत्तर मंडल अध्यक्ष सतीश काळे, मोहोळ दक्षिण मंडलअध्यक्ष रमेश माने,राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष आणि ज्यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला ते प्रकाश चवरे उपस्थित होते.

### डॉ. संपदा मुंडे आत्महत्याप्रकरणी आज मार्ड संघटनेचा एकदिवशीय संप

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्य डॉ. संपदा मुंढे यांच्या आत्महत्येवर सेंट्रल मार्डने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या घटनेला मानसिक छळ आणि व्यवस्थेचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचे सेंट्रल मार्डने म्हटले आहे. या प्रकरणी राज्यातील डॉक्टर समुदायाच्यावतीने सेंट्रल मार्डने या घृणास्पद कृत्याचा तीव्र निषेध करत महाराष्ट्र सरकारकडे तत्काळ आणि कठोर कारवाईची मागणी केली असून, सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सोलापूर येथेही महाराष्ट्र असो. रेसि. डॉक्टर्स संघटनेच्या वतीने एक दिवशीय संप पुकारला आहे. या संघटनेने काढलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर मुंडे आत्महत्या प्रकरण हे संस्थात्मक अनास्थेचे आणि प्रशासकीय उदासीनतेचे प्रतीक असल्याचे सांगत आत्महत्येप्रकरणी मध्यवर्ती मार्डने तत्काळ कारवाईची मागणी केली आहे. वैद्यकीय क्षेत्रातून निषेधाचा सूर उमटत आहे. मार्ड संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये संबंधीत दोन्ही पोलिसांचे चौकशी होईपर्यंत तत्काळ निलंबन करावे, या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि कालमर्यादेत चौकशी करावी, तक्रारी करूनही दखल न घेणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे, तणावाखालील आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी राज्यव्यापी तक्रार निवारण प्रणाली तयार करावी आदींचा समावेश आहे.

### कुत्रा आडवा आल्याने रिक्षा पलटी होऊन चालक जखमी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

कुत्रा आडवा आल्याने रिक्षा पलटी होऊन तरूण चालक जखमी झाला. सुमित सुनिल गायकवाड (वय २३, रा. कुमठा नाका, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआकराच्या सुमारास सुमित गायकवाड हा रिक्षा चालवित ७० फुट रोड ते कुमठा नाका असा जात होता. त्यावेळी गजानन मेडीकलच्या समोर रस्त्यावर अचानक कुत्रा आडवा आल्याने रिक्षा पलटी झाली. यामध्ये सुमित गायकवाड हा जखमी झाल्यानो त्यास अक्षय गायकवाड यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गहू बियाण्यांद्वारे विक्रमी उत्पादन

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

गहू लागवडीत श्रीराम फार्म सॉल्युशन्सने विकसित केलेल्या श्रीराम सुपर ५-एसआर-०५ आणि श्रीराम सुपर १-एसआर-१४ या गहू बियाण्यांनी उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. या सुधारित जाती उच्च उत्पादन, रोगप्रतिकारक क्षमता आणि विविध हवामान परिस्थितींमध्ये जुळवून घेण्याच्या गुणधर्मांसाठी प्रसिध्द झाल्या आहेत. विशेष म्हणजे, बदलत्या हवामान आणि नव्या आव्हानांमध्ये ही या जाती उत्तम परिणाम देतात. त्यामुळे भारतातील विविध भागांतील शेतकऱ्यांची ही दोन्ही जाती पहिली पसंती बनल्या आहेत.



# खासदार संजय राऊत यांच्या आरोग्यासाठी रूपाभवानी मंदिरात आरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

शिवसेना (ठाकरे गट) चे नेते व राज्यसभेचे खासदार संजय राऊत हे लवकर बरे व्हावेत तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभावे, यासाठी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सोलापूर शहरातील रूपाभवानी मंदिरात विशेष आरती करण्यात आली. आरतीनंतर शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली.

या वेळी बोलताना सुरेश जगताप यांनी सांगितले की, ''खासदार संजय राऊत हे लवकरच पूर्णपणे बरे होऊन पुन्हा जोमाने राजकारणात सक्रिय होतील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाला महिला आघाडीच्या कार्यकर्त्या तसेच स्थानिक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून संजय राऊत यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली.

यावेळी शिवसेना शहरसंघटक सुरेश जगताप, विद्यार्थी सेनेचे लहू गायकवाड, शहर समन्वयक निरंजन बोदुल, महिला आघाडी शहर संघटक स्वाती रूपनर, शहर उपसंघटक मीनाक्षी गवळी, उपशहर प्रमुख दत्ता खलाटे, सोमनाथ शिंदे, दीपक दळवी, विभाग प्रमुख आबा सावंत, महेश गवळी, अण्णा गवळी, रिक्षा सेना शहर संघटक बाळासाहेब पवार, शाखाप्रमुख राहुल परदेशी, मारुती खानापुरे, लालसिंग राठोड, गणेश शिंदे, विराट रूपनर आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी ठरविणार परीक्षा केंद्रे

## दक्षता समितीकडून दहावी बारावी परीक्षा केंद्रांचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

दहावी व बारावी परीक्षादरम्यान विद्यार्थी व शिक्षकांची असुविधांमुळे गैरसोय होत असते. तसेच सुरक्षाअभावी कॉफीपुरवठाही होते. म्हणून अशा परीक्षा केंद्रांवर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या अहवालाचे अभ्यास करून जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी परीक्षा बंद करायचे की सुरू ठेवायचे, हा निर्णय घेणर आहेत.

जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी प्रत्येक केंद्राला भेटी देणार आहेत. त्यांचा अहवाल आल्यावरच केंद्र ठेवायचे की रद्द करायचे हे ठरवले जाणार आहे. परीक्षा केंद्रात सीसीटीव्हीसह इतर भौतिक सुविधा व सुरक्षा सुविधा उपलब्ध असल्याचे तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा केंद्र टिकविण्यासाठी जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे अहवाल महत्वाचे आहेत.

या परीक्षेसंदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांच्यासह अन्य अधिकारी व केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी आढावा घेतला. दहावी-बारावी परीक्षा होत असलेल्या प्रत्येक केंद्रातील भौतिक सुविधांबाबत आवश्यक माहिती वेबसाइटवर भरणे बंधनकारक आहे. भौतिक सुविधांबाबतची माहिती भरल्यानंतर त्या सुविधा उपलब्ध आहेत की नाही? याबाबत शिक्षण विभागाकडून तपासणी करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रावरील वर्गखोल्यांच्या खिडक्यांना जाळी मारणे बंधनकारक असणार आहे. याशिवाय सीसीटीव्ही, पाणी, स्वच्छतागृह, संरक्षण भिंत यांसह अन्य विविध भौतिक सुविधा नसल्यास केंद्राची मान्यता रद्द करण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे.

या परीक्षेपूर्वी तयारीचा आढावा व केंद्राची तपासणी करण्यासाठी पुणे बोर्डाचे पथक सोलापुरात येणार आहे. गटशिक्षण अधिकारी व त्यांच्या पथकाकडून आलेले अहवाल शिक्षणाधिकारी बोर्डाला देणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे. केंद्रसंचालक म्हणून विद्यमान प्राचार्य काम पाहणार आहेत.

### परीक्षा सुरळीत फार पाडण्याचा प्रयत्न

पुणे बोर्डाच्या वतीने दहावी- बारावी परीक्षेसंदर्भात आढावा व तयारीच्या अनुषंगाने सूचना करण्यात आले आहेत. केंद्रावर कोण कोणत्या सुविधा असाव्यात ? काय काय काळजी घ्यावी ? यासह अन्य विविध विषयावर चर्चा झाली. त्यांनी दिलेल्या सर्व सुचनांचे पालन करून परीक्षा सुरळीत होतील यासाठी आम्ही प्रयत्न करू.

**-सचिन जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद , सोलापूर**

# आरटीओच्या दुर्लक्षामुळे मंद्रूपकरांचे जीव वेठीस

## ओव्हरलोड वाहनांमुळे महात्मा बसवेश्वर चौक ठरतोय धोकादायक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

मंद्रूपमधून ओव्हरलोड वाहनांची दिवसंदिवस वर्दळ वाढत असून मुख्य बाजारपेठ असणाऱ्या महात्मा बसवेश्वर चौकात ओव्हरलोड वाहनांमुळे मंद्रूपकरांचे जीव टांगणीला लागले आहे. याकडे पोलीस व आरटीओ प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मंद्रूपच्या नागरीकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

सोलापूर विजयपूर महामार्गावर आरटीओ व टोळ नाका कार्यालय आहेत. या दोन्ही कार्यालयांचे कर चुकविण्यासाठी ओव्हरलोड वाहने मंद्रूपमार्गे कुरघोट, माळकवठे व टाकळीमार्गे जात आहेत. याबाबत अनेक सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांनी आरटीओ कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. मात्र वाहनांची वर्दळ कमी होण्याऐवजी वाढत आहे. शिवाय जड वाहने मागे पुढे करताना अपघात होण्याची शक्यता नाकारता नाही. कर चुकवून वाहने महामार्गावर घेऊन जाण्यासाठी मंद्रूपमधील दहा ते पंधरा तरूण काम करीत असल्याचे सांगण्यात येते.



मंद्रूप हे सीना भीमा खोऱ्यातील चाळीस गावांचे मध्यवर्ती केंद्र व बाजारपेठ आहे. या परीसरात नेहमी वाहनचालकांची व नागरीकांची मोठी गर्दी असते. शिवाय या परीसरातच मळसिद्ध मंदिर असून रविवारी भक्तांची मोठी गर्दी दिसून येते. तसेच शुक्रवारी आठवडा बाजार असल्याने व्यापारी, शेतकरी व ग्राहकांची वर्दळ असते. त्यामुळे जड वाहनांमुळे परीसरातील वाहनचालकांसह अबालवृद्ध व लहान मुलांचे जीव टांगणीला लागल्याचे दिसून येते.

मंद्रूप पोलीस ठाणेच्या प्रवेशद्वारा समोरून ओव्हरलोड वाहने जात असताना त्यांच्यावर कारवाई होताना दिसून येत नाही. शिवाय आरटीओ अधिकारीही 'अर्थपूर्ण' संबंधामुळे मुग गिळून गप्प बसत असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

### पोलीस व आरटीओ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष



आरटीओ कार्यालय व टोळ नाका कर चुकवून ओव्हरलोड वाहने बिनदास्त मंद्रूपमधून जात आहेत. यामुळे मंद्रूपमधील नागरीकांचे जीव धोक्यात आले आहे. शिवाय मंद्रूप टाकळी नवीन डांबरी रस्ताही खराब झाला आहे. याकडे पोलीस व आरटीओ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ओव्हरलोड वाहने बंद करावीत. **-प्रदीप ख्याडे , प्रगतशील शेतकरी, मंद्रूप**

### आरटीओ अधिकाऱ्यांना अधिकार

मंद्रूपमधून ओव्हरलोड वाहनांसंदर्भात तक्रार आली असून वाहतूक पोलीसांकडून कारवाई करण्यात येईल. यापूर्वी ओव्हरलोड वाहने आरटीओंकडे कारवाईसाठी पाठविण्यात आली आहेत. त्या वाहनांवर कारवाई करण्याचा अधिकार आरटीओ अधिकाऱ्यांना आहे. **- राजकुमार डांगे, पोलीस उपनिरीक्षक, मंद्रूप पोलीस ठाणे**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे



### 'आयएमएस'च्या अंशिका सोलनकरची राज्य मॉडर्न पेंटाथलॉन स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

इंडियन मॉडेल स्कुल स्टेट बोर्डच्या आंशिका सोलणकर हिने जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहिल्यानगर येथे झालेल्या पुणे विभागीय मॉडर्न पेंटाथलॉन स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात चौथा क्रमांक मिळविला. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक अक्षय माने व प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थापक अध्यक्ष श्री ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

### उन्नती हुडाचा उपांत्य फेरीत पराभव

**सारब्रुकेन :** उदयोन्मुख बॅडमिंटनपटू उन्नती हुडाचा महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत अव्वल मानांकित पुत्री कुसुमा वारदानीविरुद्ध सरळ गेममध्ये पराभव झालास, याच बरोबर येथे ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या बक्षिसाच्या हायलो ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या मोहिमेवर पूर्णविराम लागला. रोहतकची १८ वर्षीय उन्नती या आठवड्यात प्रभावी होती पण आज ३५ मिनिटांच्या सामन्यात तिला ७-२१, १३-२१ असा पराभव पत्करावा लागला. गत महिन्याच्या सुरुवातीला गुवाहाटी येथे झालेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत उन्नती भारतीय संघाचा भाग होती व तिने आपले पहिले पदक - कांस्य - जिंकले.

### रेणुका सिंग ठाकूरच्या कुटुंबीयांची प्रार्थना

**शिमला :** भारतीय महिला क्रिकेट संघाची वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूरचे कुटुंबीय रविवारी नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात संघाच्या विजयासाठी घरी टीव्ही संचासमोर बसून ईश्वराकडे प्रार्थना करत होते. रेणुका हिमाचल प्रदेशच्या रोहरू येथील पारसा गावची रहिवासी आहे. ती भारतीय संघाचा भाग आहे आणि चालू स्पर्धेत काही महत्त्वाच्या बळी घेतल्या आहेत. राज्याच्या सिंचन आणि सार्वजनिक आरोग्य विभागात काम करणारे तिचे वडील केहर सिंग ठाकूर यांचे ती केवळ तीन वर्षांची असताना निधन झाले आणि त्यानंतर तिची आई सुनीता ठाकूर यांनी तिला वाढवले. आम्ही देवदेवतांना प्रार्थना केली आहे की भारताने आज जिंकले पाहिजे. मला खूप अभिमान आहे की माझी मुलगी, एका लहान गावातून आली आहे, ती देशाला गौरव मिळवून देत आहे, असे १५-१६ सदस्यांच्या कुटुंबीयांसह सामना पाहत असलेल्या सुनीता ठाकूर यांनी सांगितले. रेणुकाला नेहमीच क्रिकेटची आवड होती आणि लहानपणापासूनच मुलांसोबत हा खेळ खेळायची. लहानपणी ती कापडाचे चेंडू बनवायची आणि रस्त्याच्या कडेला लाकडी बॅटने खेळायची. माझे मेहुणे भूपिंदर ठाकूर यांनी रेणुकाची प्रतिभा पाहिली आणि म्हणाले की या मुलीमध्ये क्षमता आहे आणि त्यांच्या पाठिंब्यामुळेच रेणुकाला पुढे जाण्याची संधी मिळाली, , अशी आठवणही त्यांनी सांगितली.

### जय शाह, तेंडुलकर, रोहितने घेतला अंतिम सामन्याचा आनंद

**नवी मुंबई :** रविवारी नवी मुंबई येथे झालेल्या महिला विश्वचषकाच्या ऐतिहासिक अंतिम सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना पाहण्यासाठी डी.वाय. पाटील स्टेडियममधील स्टॅण्डमध्ये क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकर आणि रोहित शर्मा, आयसीसी अध्यक्ष जय शाह आणि अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. भारतीय महिला संघाचा मायदेशात विश्वचषक अंतिम सामना खेळण्याचा ऐतिहासिक प्रसंग पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये रांगेत उभे होते, त्याचप्रमाणे क्रिकेट स्टार आणि सेलिब्रिटी देखील सामन्याचा आनंद घेण्यासाठी आणि भारतीय संघाला पाठिंबा देण्यासाठी उपस्थित होते. भारताचा तिसऱ्यांदा अंतिम सामन्यात सहभागी होण्यासाठी आणि यजमान संघाचा उत्साह वाढवण्यासाठी दुपारच्या पावसातही मैदानात उतरलेल्या चाहत्यांनी स्टेडियम खचाखच भरले होते. ■

# भारताचा ऑस्ट्रेलियावर ५ गड्यांनी विजय

**मालिकेत १-१ ने बरोबरीवर**

**तीन बळी टिपणारा अर्शदीप सिंग सामनावीर**

**डेव्हिड, स्टोयनिसचे अर्धशतक व्यर्थ**



तीन बळी टिपणारा अर्शदीप सिंग सामनावीर



वॉशिंग्टन सुंदरची विजयी खेळी

◆ **होबार्ट, २ नोव्हेंबर**

रविवारी बेलेरिव्ह ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात अर्शदीप सिंगची प्रभावी गोलंदाजी आणि वॉशिंग्टन सुंदरच्या दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने ऑस्ट्रेलियावर ९ चेंडू शिल्लक ठेवित ५ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-१ ने बरोबरी साधली. आता मालिकेतील चौथा टी-२० सामना ६ नोव्हेंबर रोजी करारा येथे होणार आहे.

भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमारने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित भारतीय गोलंदाजांनी विशेषतः अर्शदीप सिंगने ऑस्ट्रेलियाला डावाच्या प्रारंभीच दोन जबरदस्त हादरे दिले व त्यांच्या फलंदाजीतील हवाच काढून घेतली.

टिम डेव्हिड व मार्कस स्टोयनिसने तेवढी अर्धशतकी खेळी करत ऑस्ट्रेलियाला भारताविरुद्ध ६ बाद १८६ अशी स्पर्धात्मक धावसंख्या उभारून दिली. भारतीय फलंदाजांनी छोट्या-छोट्या भागीदारी करत १८.३ षटकांत ५ गडी गमावित १८८ धावा काढून आपला विजय साकार केला.

ऑस्ट्रेलियाच्या डावाच्या प्रारंभीच अर्शदीप सिंगने ट्रॅव्हिस हेड (६) व जोश इंग्लिसला (१) तंबूत परत पाठविले. ऑस्ट्रेलियाने २.३ षटकांत १४ धावांत हे दोन महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले, परंतु त्यानंतर टिम डेव्हिडने कर्णधार मिचेल मार्शच्या साथीने संघाला ७३ धावांवर पोहोचवले, याचवेळी मार्शला (११) वरुण चक्रवर्तीने तिलक वर्माकडून झेलबाद केले, नंतर वरुणने मिचेल ओवनचा त्रिफळा उडविला. टिम डेव्हिड व मार्क स्टोयनिसने तेवढी खंबीरपणे फलंदाजी करत संघाला शतकी उंबरठा ओलांडून दिला. डेव्हिडच्या ३८ चेंडूंत ८ चौकार व ५ षट्कारांसह ७४ धावांच्या स्फोटक खेळीनंतर, स्टोयनिसने ३९ चेंडूंत क्रीजवर राहून ८ चौकार व दोन षट्कार मारून संघाची गती कायम ठेवली. अर्शदीप सिंगने स्टोयनिसला रोखले. भारताकडून पुनरागमन करणाऱ्या अर्शदीप सिंगने ३ बळी, वरुण चक्रवर्तीने २ बळी, तर शिवम दुबेने १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा व शुभमन गिल या सलामी जोडीने ३३ धावांची भागीदारी केली. अभिषेकने १६ चेंडूंत २५ धावांची भर घातली. गिलने १२ चेंडूंत १५ धावा केल्या. कर्णधार सूर्यकुमार यादवने २४ धावांचे, तिलक वर्माने २९ धावांचे योगदान दिले, तर अक्षर पटेलने १७ धावांची भर घातली. वॉशिंग्टन सुंदर व जितेश शर्माने नाबपाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. सुंदरने २३ चेंडूंत ३ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ४९ धावांची, तर जितेश शर्माने १३ चेंडूंत ३ चौकारांसह नाबाद ३२ धावांची खेळी केली.

ऑसक्ट्रेलियाकडून नॅथन एलिसने ३ बळी टिपले, तर झेव्हियर बार्टलेट व मार्कस स्टोयनिसने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले.

◂ *(वृत्तसंस्था)*

# केन विल्यम्स टी-२० क्रिकेटमधून निवृत्त

◆ **ऑकलंड, २ नोव्हेंबर**



जादुई फलंदाज आणि न्यूझीलंड संघाचा माजी कर्णधार केन विल्यम्सने रविवारी वेस्ट इंडीजविरुद्ध पाच सामन्यांच्या मालिकेच्या सुरुवातीच्या काही दिवसांपूर्वी आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीतून निवृत्ती जाहीर केली.

न्यूझीलंडसाठी ९३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणाऱ्या विल्यम्सला अलीकडेच २०२६ च्या हंगामासाठी आयपीएल फ्रॅन्चायझी लखनौ सुपर जायण्ट्ससाठी धोरणात्मक सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले.

या घोषणेनंतर, बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या मालिकेसाठी १४ सदस्यीय टी-२० आंतरराष्ट्रीय संघात ३५ वर्षीय अव्वल फळीतील फलंदाजाचा समावेश करण्यात आला नाही.

२५७५ टी-२० धावा करणारा, परंतु कधीही शतक न ठोकणारा विल्यम्स कॅरेबियन संघाविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आगामी एकदिवसीय मालिकेलाही मुकणार आहे. तो न्यूझीलंडचा दुसरा सर्वाधिक पुरुष टी-२० धावा करणारा फलंदाज म्हणून निवृत्त होत आहे, यात १८ अर्धशतके आणि ९५ च्या सर्वोच्च खेळाची समावेश आहे.

सर्व फॉरमॅटमध्ये १९,००० पेक्षा जास्त धावा करणाऱ्या या क्रिकेटपटूने २०११ मध्ये टी मध्ये पदार्पण केले आणि ७५ वेळा संघाचे नेतृत्व केले, ज्यामध्ये २०१६ आणि २०२२ मध्ये दोन टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीत आणि २०२१ मध्ये अंतिम फेरीत संघाचे नेतृत्व केले. त्याने कर्णधार मिशेल सॅण्टनरचे आगामी मालिकेसाठी अभिनंदन केले.

माझे थेट लक्ष वेस्ट इंडिजविरुद्धच्या २ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या तयारीवर आहे. मला या संघाची खूप काळजी आहे, असे तो म्हणाला. न्यूझीलंडचे प्रशिक्षक वॉल्टर यांनी विल्यम्सच्या नेतृत्वगुणांचे कौतुक केले. विल्यम्स जगभरात फ्रॅन्चायझी क्रिकेट खेळत राहण्याची अपेक्षा आहे. ◂ *(वृत्तसंस्था)*

# झ्वेरेव्हला हरवून सिनर पॅरिस मास्टर्सच्या अंतिम फेरीत

◆ **पॅरिस, २ नोव्हेंबर**

जॅनिक सिनरने एका तासापेक्षा थोड्या जास्त वेळात अॅलेक्झांडर झ्वेरेव्हला ६-०, ६-१ असे पराभूत करून पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले व प्रथम विश्वमानांकनपदाच्या जवळ पोहोचला.

इटलीचा चार वेळा ग्रँड स्लॅम विजेता जर नवव्या मानांकित फेलिक्स ऑगर-अलियासिम विरुद्धच्या अंतिम सामन्यात विजय मिळवला तर तो सहा वेळा प्रमुख विजेता कार्लोस अल्काराझची प्रथम विश्वमानांकनपदाची जागा घेईल.

ऑगर-अलियासिमने यापूर्वी ला डेफेन्स अरेना येथे झालेल्या उपांत्य फेरीत अलेक्झांडर बुब्लिकचा ७-६ (३), ६-४ असा पराभव केला.

सिनरने गत आठवड्याच्या शेवटी व्हिएन्ना फायनलमध्ये झ्वेरेव्हवर विजय मिळवून आपला इनडोअर विजयी प्रवास २५ सामन्यांपर्यंत वाढवला.

झ्वेरेव्हने शुक्रवारी उपांत्यपूर्व सामन्यात डॅनिल मेदवेदेवला तीन सेटमध्ये हरवून दोन मॅच पॉइंट्स वाचवले होते आणि रशियन खेळाडूविरुद्ध पाच सामन्यांची पराभवाची मालिका संपुष्टात आणली होती. सिनर वर्षातील त्याचे पाचवे आणि कारकिर्दीतील २३ वे जेतेपद मिळवण्यासाठी प्रयत्नशील असेल.

◂ *(वृत्तसंस्था)*

# इगा स्वियातेकचा मॅडिसन कीजवर विजय

**डब्ल्यूटीए फायनल्स टेनिस**

◆ **रियाध, २ नोव्हेंबर**



ग्रॅण्ड स्लॅम विजेत्यांच्या संघर्षात पोलंडच्या इगा स्वियातेकने रियाध येथे सुरु असलेल्या डब्ल्यूटीए फायनल्स टेनिस स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मॅडिसन कीजचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

जगातील अव्वल आठ खेळाडूंसाठीच्या हंगामाच्या अखेरच्या टेनिस स्पर्धेत विम्बल्डन विजेतीने केवळ एका तासापेक्षा जास्त वेळेत ऑस्ट्रेलियन ओपन विजेत्या कीजचा ६-१, ६-२ असा पराभव केला.

मी सुरुवातीपासून शेवटपर्यंत लयीमध्ये होती व मला खरोखर ती तशीच कायम ठेवायची होती, असे २०२३ च्या डब्ल्यूटीए फायनल्सची विजेती इगा स्वियातेक म्हणाली.

अमेरिकन ओपनमध्ये पहिल्या फेरीतून बाहेर पडल्यानंतर ६८ दिवसांत कीजचा हा पहिलाच सामना होता. सेरेना विल्यम्स ग्रुपमध्ये खेळताना, कीजला पुढे जाण्यासाठी अमांडा अनिसिमोव्हा व एलेना रायबाकिनाचा पराभव करावा लागू शकतो. रायबाकिनाने अनिसिमोव्हाला ६-३. ६-१ असे हरवले.

प्रत्येक चार खेळाडूंच्या गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचेल. स्टेफनी ग्राफ गटात आर्यना सबालेन्का, गतविजेती कोको गॉफ, जेसिका पेगुला आणि जास्मिन पाओलिनी आहेत. ◂ *(वृत्तसंस्था)*

# न्यू इंग्लिश स्कूल वेळापूरला दुहेरी मुकुट



### शालेय जिल्हा खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर**

शालेय जिल्हा खो-खो स्पर्धेत १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात न्यू इंग्लिश स्कूल वेळापूरने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, दैनिक तरुणभारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे. माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव मोहन रजपूत, पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, असोसिएशनचे सदस्य प्रिया पवार कुंभकोणी, सोनाली केत, सुरेश खुर्द भोसले, शरद व्हनकडे व अजित शिंदे आदी उपस्थित होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१९ वर्षांखाली मुले :** न्यू इंग्लिश स्कूल वेळापूर, लोकसेवा विद्यामंदीर मंद्रूप, न्यू इंग्लिश स्कूल भाळवणी.

**मुली :** न्यू इंग्लिश स्कूल वेळापूर, शिवणे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ग्रामीण विद्याविकास विद्यालय चपळगाव.




**सोलापूर : शालेय राज्य धनुर्विद्या स्पर्धेत नमन साखरे याने ३ सुवर्ण व १ ब्राँझ पदक व नयन साखरे याने १ सुवर्ण पदक प्राप्त केल्याबद्दल त्यांचा आणि प्रशिक्षक दीपक चिकणे यांचा सत्कार मुख्य जिल्हा क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वास गायकवाड.**





# सोलापूरच्या गणेश कचरेला ज्यूदो स्पर्धेत सुवर्ण

**वेटलिप्टींगमध्ये पृथ्वीराज गायकवाड; पावरलिप्टींमध्ये अथर्व मंठाळकर, संदीप हाके, आदित्य गुरव हेही सुवर्णचे मानकरी**

### डी बाटु तंत्र शिक्षण विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे अंतर्गत राज्यस्तरीय आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेत येथील गणेश कचरेने ज्यूदो स्पर्धेत तर पृथ्वीराज गायकवाड वेटलिप्टींगमध्ये सुवर्ण पदक पटकाविले. पावरलिप्टींग स्पर्धेत अथर्व मंठाळकर, संदीप हाके व आदित्य गुरवने यांनीही सुवर्ण पदकांची कमाई केली आहे.

येथील ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात या स्पर्धेचे उद्घाटन एशियन मेडलिस्ट जुडो कुस्ती आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक एपीआय अजित पाटील, यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य बी. के. सोनगे, एपीआय खंडागळे साहेब, डी बाटु विद्यापीठाचे क्रीडा समन्वयक प्रा. बालाजी फुलचवाड, उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन, डॉ विनायक पत्की, रजिस्टर एस एस शेळके, सिनेट सदस्य प्रा सचिन गायकवाड, निवड समिती सदस्य प्रा शिवशरण कोरे, प्रा संतोष गवळी, प्रा. ऋचा श्रीराम आदी उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण व फार्मसी महाविद्यालयाचे २०० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धा पार पाडण्यासाठी पंच म्हणून शुभम जगताप, तनवीर, आकाश माशाळकर, श्रुती पगारे, विनायक काळे तसेच, आयटीसीएलचे आर आर पाटील,वामन पवार, इक्बाल शेख, स्पोर्ट्स सेक्रेटरी प्रतिक राय, प्रवीण गुंजाळ, गणेश कचरे, जाहिद खान, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे, आदी परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा ऋचा श्रीराम यांनी केले. प्रा जामदार यांनी आभार मानले.

**क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक विकासास गती : एपीआय पाटील**

एपीआय श्री पाटील म्हणाले, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना उच्चतंत्र शिक्षणाबरोबर क्रीडा स्पर्धांमुळे मानसिक व शारीरिक क्षमतेमध्ये विकास करता येतो सध्याच्या काळात महाविद्यालयातील तरुणांनी मोबाईल मध्ये अतिरिक्त वेळ न घालवता विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपली क्षमता सिद्ध करावी तसेच राष्ट्राला सक्षम करण्यासाठी पुढे यावे आज आम्हाला जी संधी मिळाली आहे ती क्रीडा क्षेत्रातील योगदानामुळेच आहे. खेळाडूंसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर सुविधा तसेच उच्च पदावर नियुक्त्या करण्याचा निर्णय घेतला असून त्या संधीचा आपणही लाभ घ्यावा.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजित पवार

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ वरिष्ठ उपाध्यक्ष

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि. २ नोव्हेंबर-**



महायुती सरकारमधील दोन घटक पक्षाच्या नेत्यातील दाव्यामुळे गेल्या काही दिवसापासून चर्चेत आलेल्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनच्या निवडणुकीतील सस्पेन्स आता संपला आहे. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार सलग चौथ्यांदा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. बाकी सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य निवडीचे अधिकार श्री. पवार यांना देण्यात आले. असोसिएशनच्या ३१ सदस्य संघटनांपैकी २२ जणांनी अजित पवारांना पाठिंबा दिल्याने त्यांचे पारडे जड होते. त्यामुळे मोहोळ यांनी शेवटच्या क्षणी अध्यक्षपदासाठीचा अर्ज मागे घेतला. त्याबदल्यात मोहोळ यांच्या समर्थकांना काही पदे दिली जातील, असे सांगण्यात आले. पुण्यातील जैन बोर्डिंग ट्रस्टच्या भूखंड विक्री व्यवहारामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या मोहोळ यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या निवडणुकीत अर्ज भरल्याने महायुतीत चढाओढ चर्चेत आली होती. त्यामुळे वाद टाळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यात चर्चा करण्यात आली. या चर्चेअंती मोहोळ यांच्या गटालाही काही पदे देण्याचे ठरले. त्यानंतर मोहोळ यांनी अध्यक्षपदासाठीचा अर्ज मागे घेतला. या निवडणुकीतून अजितदादा अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर ते क्रीडा पायाभूत सुविधा, खेळाडू कल्याण आणि पारदर्शकतेसाठी पुढील दोन वर्षे काम करणार आहेत.



**अजितदादांवर विश्वास**

राजकारण आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रात अजित पवार यांचा दीर्घ अनुभव आणि बेरजेचे राजकारण व यामुळे सर्व पक्ष आणि हितसंबंधी संस्थांनी त्यांच्यावर पुन्हा एकत्रित विश्वास दाखवला. राज्यातील क्रीडा आस्थापनांचे सशक्तीकरण, खेळाडू कल्याण आणि पारदर्शी व्यवस्थापन त्यांच्या जमेच्या बाजू राहिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### वेळापूर पोलीस ठाण्यात ऊसतोड मुकादम, टोळी मालक व ट्रॅक्टर चालक यांची बैठक

**वेळापूर, दि. २ नोव्हेंबर-**

वेळापूर पोलीस ठाणे हद्दीतील ऊसतोड मुकादम, टोळी मालक तसेच ट्रॅक्टर मालक-चालक यांची संयुक्त बैठक वेळापूर पोलीस स्टेशन येथे घेण्यात आली. या बैठकीदरम्यान ऊसतोड टोळ्यांमध्ये काम करणाऱ्या बाहेरील जिल्हा व परराज्यातील कामगारांची संपूर्ण माहिती - ओळखपत्र व छायाचित्रांसह यादीच्या स्वरूपात पोलीस स्टेशनमध्ये जमा करणे आवश्यक असल्याचे संबंधितांना अवगत करण्यात आले. तसेच हद्दीतील सर्व पोलीस पाटील यांची स्वतंत्र बैठक घेऊन त्यांच्या गावी असणाऱ्या टोळी मालक, मुकादम आणि ऊसतोड कामगारांवर लक्ष ठेवणे, त्यांच्या हालचालींची माहिती संकलित करून सादर करणे बंधनकारक असल्याचे सूचित करण्यात आले. गावाच्या हद्दीत घरफोडी, चोरीसारख्या घटना घडू नयेत यासाठी दक्षता घेण्याचेही निर्देश देण्यात आले. यावेळी प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी टोळी मालकांना स्पष्ट सूचना दिल्या की ऊसतोडीच्या कामात अठरा वर्षांखालील कोणताही मुलगा किंवा मुलगी कामावर ठेवू नये. अशा प्रकारची अल्पवयीन मुले कामात आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच ऊसतोड कामगारांवर लक्ष ठेवणे, ते कामाच्या ठिकाणावरून पळून जाणार नाहीत याची दक्षता घेणे, आणि सर्व कामकाज पारदर्शकपणे करण्याच्या सूचना प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी दिल्या.

### पिडीता अत्याचारप्रकरणी तीन आरोपींना २० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा

**वेळापूर, दि. २ नोव्हेंबर-**

वेळापूर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ३५५/२०२१ भा.दं.वि. कलम ३७६, ३७६(अ), ३५४, ५०६, ३४ तसेच ॲट्रॉसिटी ॲक्ट कलम ३(१)(थ), ३(२)(त), ३(२)(ाि) व पोलीस कायदा कलम ४, १२, २३, २७ अंतर्गत दाखल प्रकरणात तीन आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत २० वर्षांची सक्तमजुरी व दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दोषी ठरलेले आरोपी १) युवराज प्रकाश गोडसे, रा. उघडेवाडी, ता. माळशिरस, २) रणजीत दत्तात्रय कोळेकर, रा. उघडेवाडी, ता. माळशिरस, आणि ३) रोहन दत्तात्रय भोसले, रा. खंडाळी, ता. माळशिरस, जि. सोलापूर. ही घटना घडल्यानंतर पीडिता आणि तिच्या आईच्या जबाबांवरून तपास पूर्ण करण्यात आला. माळशिरस येथील विशेष न्यायालयात झालेल्या सुनावणी दरम्यान एकूण २३ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात पीडितेच्या ओळख परेडीत आरोपी क्रमांक ३ रोहन भोसले याची ओळख पटल्याने त्यांचा दोष सिद्ध झाला. या खटल्यात विशेष न्यायाधीश ताम्हाणेकर यांनी निर्णय देताना तीनही आरोपींना २० वर्षांची सक्तमजुरी आणि दंड अशी शिक्षा ठोठावली. या प्रकरणाचा तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे यांनी केला असून त्यांना तपासात सपोफौ गणेश निंबाळकर यांनी सहाय्य केले. न्यायालयीन कामकाजात सरकारी वकील मेंढेगिरी, ढवळे व संग्राम पाटील यांनी सरकारी बाजूने काम पाहिले. या कारवाईसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके अकलूज उपविभागीय अधिकारी व वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी मार्गदर्शन लाभले. न्यायालयीन कामकाज पोशि दत्तात्रय काटे यांनी पाहिले.

### ऑस्ट्रेलियानंतर आता मलेशियात बार्शीचे महावीर कदम 'फुल्ल आयरनमॅन'

**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**




बार्शीचे महावीर कदम यांनी पुन्हा एकदा आपल्या चिकाटीचा आणि सहनशक्तीचा परिचय देत जगातील सर्वात कठीण मानली जाणारी आयरनमॅन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. १ नोव्हेंबर २०२५ रोजी मलेशियातील निसर्गरम्य लंगकावी बेटावर ही आंतरराष्ट्रीय आयरनमॅन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महावीर कदम यांनी तब्बल २२६ किलोमीटर अंतर पूर्ण करत 'फुल आयरनमॅन' ही क्रीडापदवी मिळवली. स्पर्धेअंतर्गत त्यांनी ३.८ किलोमीटर समुद्रात पोहणे, १८० किलोमीटर डोंगराळ आणि निसर्गरम्य मार्गावर सायकलिंग, ४२.२ किलोमीटर दमदार रनिंग असे तीन टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण केले. या सर्व प्रवासासाठी त्यांनी एकूण १६ तास २८ मिनिटांचा कालावधी घेतला. लंगकावीचे उष्ण आणि दमट हवामान, डोंगराळ रस्ते आणि दीर्घ अंतर या सर्व आव्हानांवर मात करत त्यांनी दाखवलेली जिद्द आणि तयारी कौतुकास्पद आहे. ही स्पर्धा पूर्ण करणे म्हणजे केवळ शारीरिक ताकदीचं नव्हे, तर मानसिक धैर्य आणि चिकाटीचंही प्रतीक आहे. महावीर कदम यांनी यापूर्वी ऑस्ट्रेलियातील आयरनमॅन स्पर्धाही यशस्वीरीत्या पूर्ण केली होती. त्यामुळे आता त्यांनी दोन देशांतील 'आयरनमॅन ' पदवी आपल्या नावावर केली आहे.

## निधन वृत्त...

### डॉ. श्याम सुंगारे



**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

वसंतदादा मेडिकल आयुर्वेदिक कॉलेज सांगलीचे माजी प्राचार्य डॉक्टर श्याम शिवराज सुंगारे यांचे दिनांक १ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने कोल्हापूर येथे दुःखद निधन झाले आहे. दैनिक तरुण भारतचे प्रकाशक व मिरची व्यापारी दिलीप शिवमूर्ती दुलंगे यांचे ते भाऊजी होते.

### बबनराव सपाटे



**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

निराळे वस्ती येथील ज्येष्ठ हॉटेल व्यावसायिक बबनराव गणपत सपाटे (वय ७७) यांचे रविवारी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवा नेते ज्ञानेश्वर सपाटे यांचे पिताश्री तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांचे बंधू होत.

# विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर झालेल्या दिंडीतल्या वारकऱ्याला टिपरची धडक

**वारकऱ्याचा जागीच मृत्यू : अज्ञात टिपरचालकाविरूद्ध गुन्हा दाखल**

तभा वृतसेवा
मंगळवेढा दि.२ नोव्हेंबर

कर्नाटक राज्यातून विठ्ठलाचा धावा घेत पंढरपूरकडे निघालेल्या एका ५६ वर्षीय वारकऱ्याला भरधाव वेगात आलेल्या टिपरने मंगळवेढा- मरवडे मार्गावर जोराची धडक दिल्याने जागीच मृत्यू झाला. तर अन्य एक वारकरी जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली असून याप्रकरणी अज्ञात टिपर चालकाविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी यातील जखमी फिर्यादी प्रकाश शिरसथळी (वय ४५) हे व मयत ईश्वर शिवाप्पा पाणीगट्टी (वय ५६ रा.धारवाड राज्य कर्नाटक) हे दोघे दि.३० रोजी सायं.६.१५ वाजता मंगळवेढा ते मरवडे मार्गावरील पवार यांच्या वस्तीवर नाष्टा करून दिंडी मुक्कामाच्या ठिकाणी पायी चालत



जात असताना मंगळवेढयाकडून येणारा टिपर क्र.एम.एच.४४ ए.डी.४४११ याने भरधाव वेगात येवून दोघांना जोराची धडक दिल्याने यातील ईश्वर पाणीगट्टी हा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाला तर प्रकाश शिरसथळी हे जखमी झाले असल्याचे दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. या घटनेस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात टिपरचालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघात करून टिपरचालक फरार झाला आहे. अधिक तपास पोलिस करीत आहेत. दरम्यान कर्नाटक राज्यातून विठ्ठलाच्या भेटीसाठी अतुर झालेले वारकरी मुखी विठ्ठल विठ्ठल नामाचा गजर करत जात असतानाच ही दूर्दैवी घटना घडल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कार्तिक वारीमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे दिंडया येत असून वाहन चालक मात्र बेफिकीरपणे वाहने चालवत असल्याचा या घटनेवरून प्रकार उघड झाला आहे. त्या वाहनचालकाविरूद्ध सर्वत्र संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत.

**पाण्याचा टँकर पळविला**

पाठखळ येथे घरासमोर लावलेला ९० हजार रुपये किंमतीचा लोखंडी पाण्याचा टँकर चोरुन नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी तानाजी भोसले (रा. पाठखळ) यांच्या घरासमोर २९ रोजी रात्री ११ वाजता लाल व पांढऱ्या रंगाचा दोन चाकी लोखंडी पाण्याचा टँकर लावला होता. सकाळी ६च्या दरम्यान लावलेल्या ठिकाणी टँकर दिसून आला नाही. फिर्यादीच्या संमतीवाचून लबाडीने स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### ॐ नमः शिवाय।।



ओम स्वामी मन्मथ।ओम स्वामी मन्मथ।
शिवनाम सुंदर नाम स्वामी मन्मथ।।धृ।।
जय जय स्वामी मन्मथ
शिव अवतारी तू स्वामी मन्मथ।
धाम कपिलधारी ओम स्वामी मन्मथ।।१।।
ओम स्वामी मन्मथ
माय-बाप बंधुसखा स्वामी मन्मथ।
सद्गुरू माझा पाठीराखा ओम स्वामी मन्मथ।।२।।
ओम स्वामी मन्मथ
मोर नाग वाघ पाहे स्वामी मन्मथ।
गंगा शिरी वाहे ओम स्वामी मन्मथ।।३।।
ओम स्वामी मन्मथ
योगदंड त्रिशुळाधारी स्वामी मन्मथ।
भक्त वत्सल करुणाकरी ओम स्वामी मन्मथ।।४।।
ओम स्वामी मन्मथ
शिवयोगी संत शिरोमणी मन्मथ।
गुरुराज माऊली ओम स्वामी मन्मथ ।।५।।
ओम स्वामी मन्मथ
मन्मथ आलासे भुलोका।
आता कुणी भिऊ नका स्वामी वचन सांगते
श्री स्वामी मन्मथ ।।६।।
ओम स्वामी मन्मथ जय जय स्वामी मन्मथ।

**भक्तीरचना (गीतकार)**
**- श्री मन्मथ. प्र.तुगांवकर,**
**९९२२८९११४८**



# एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ नोव्हेंबर-**

केगावमधील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरील शिक्षण, निसर्ग आणि इतिहास यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. यावेळी विद्यार्थ्यांनी ॲडव्हेंचर पार्कला भेट दिली. तिथे त्यांनी विविध मनोरंजक खेळ, सांघिक साहसी कृती आणि इतर उपक्रमांचाही आनंद घेतला.

वन विभागाच्या भेटीत त्यांनी विविध वनस्पती आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व जाणून घेतले. यानंतर दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी अक्कलकोट येथील श्रीमंत फत्तेसिंह महाराज संग्रहालय आणि शिवपुरी मंदिराला भेट दिली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा, संस्कृती आणि स्थानिक वारसा स्थळांचे मौल्यवान ज्ञान मिळाले. सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सक्रीय सहभाग घेतल्यामुळे ही सहल त्यांच्यासाठी प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरली. तसेच शाळेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. शाळा व्यवस्थापन, शिक्षक आणि पालकांच्या सहकार्याने ही शैक्षणिक सहल यशस्वी झाल्याबद्दल मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी आभार मानले.

# वाहतूक पोलिसाला मारहाण, दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**

तालुक्यातील लक्ष्याचीवाडी शिवारात बार्शी-परंडा मार्गावर वाहतूक नियमन करताना एका संतप्त दुचाकीस्वाराने पोलीस कर्मचाऱ्याला लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करुन जखमी केले. शासकीय कामात अडथळा आणण्याचा हा प्रकार शनिवारी सकाळी ११.४५ वाजता घडला. जखमी पोलीस हवालदार जयंत शिंदे (वय ३७) यांच्यावर बार्शीतील स्थानिक रुग्णालयात उपचार सुरु असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनेचा तपास तालुका पोलीस ठाण्यातील हवालदार बोबडे करत आहेत.

पोलीस हवालदार जयंत शिंदे यांच्या फिर्यादीनुसार, ते आणि त्यांचे सहकारी सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत वाहतूक तपासणीच्या ड्युटीवर होते. बार्शीकडून परंड्याकडे जाणाऱ्या एका बुलेट मोटारसायकलस्वाराला हाताच्या



इशाऱ्याने थांबण्यास सांगितले. गाडी थांबताच, आरोपी शंकर चांगदेव वाघ (रा. उपळाई ठोंगे, ता. बार्शी) याने संतापात प्रश्न विचारत सुरु केले, पोलिसांना गाडी अडवण्याचा अधिकार कोणी दिला? तू कोण मला गाडी अडविणार? तू मला ही बुलेट दिली आहेस का? यानंतर त्याने अपशब्दांचा भडिमार सुरु केला.

शिंदे आणि सहकारी पोलीस स्टाफने आरोपीला शांत राहण्यास, त्याची अडचण काय आहे ते सांगण्यास सांगितले. मात्र, वाघने पुन्हा शिवीगाळ केली आणि मोटारसायकलवरुन उतरुन जवळ पडलेल्या लाकडी दांडक्याने शिंदे यांच्या डोक्यात जोरदार मारली. मारहाणीनंतर त्याने शिंदे यांना गच्चीला धरुन ढकलले आणि तुम्हाला काय करायचं ते करा, मी तुम्हाला बघून घेतो, अशी धमकी देत घटनास्थळावरुन पळून गेला.

या घटनेमुळे बार्शी तालुका पोलीस ठाण्यात खळबळ उडाली असून, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला, अश्लील भाषा आणि इतर कलमांखाली वाघ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला असून, लवकरच त्याला ताब्यात घेण्याची शक्यता आहे. या प्रकाराने वाहतूक पोलिसांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिक नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी अशा हिंसक वर्तनाला कठोरपणे आळा घालण्याचा इशारा दिला आहे.

# बेरोजगार तरुणांनी स्वत:चा व्यवसाय सुरु करावा

**महादेव कोळी यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २ नोव्हेंबर-**

लोकमंगल बँक कडून राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे महाराष्ट्र शासनाचा विविध आर्थिक विकास महामंडळ कडून देण्यात येणाऱ्या कर्जास बारा टक्के व्याज परतावा देण्याची योजना सुरू केल्या आहेत. तालुक्यातील बेरोजगार तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता या संधीच्या लाभ घेऊन स्वतःचे व्यवसाय सुरू करावे, असे आवाहन लोकमंगल बँक मॅनेजर महादेव कोळी यांनी केले आहे.

लोकमंगल बँक सोलापूर शाखा अक्कलकोट वतीने महाराष्ट्र शासनाचा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ,जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय

वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित उपकंपनी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) अंतर्गत, कर्जास बारा टक्के व्याज परतावा देण्याची योजना सुरू केल्या आहेत.ए ए आय पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण व्यवसाय, सर्व प्रकारच्या अन्न प्रक्रिया व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध असून प्रधानमंत्री फुड प्रोसेसिंग योजने अंतर्गत ३५ टक्के पर्यंत सबसीडी आहे.

व्यवसाय विस्तार, वाढीसाठी कर्ज, नवीन व्यवसाय उभारणीसाठी कर्ज, कमीत कमी कागदपत्रे वर त्वरीत कर्ज मंजुरी देण्यात येत आहे. पात्रता प्रमाणपत्र व्यवसायाचे सर्व नोंदणीपत्र उत्पन्नाचे पुरावे,आर्थिक विकास महामंडळाचे, सक्षम जामीनदार तारण देणाऱ्या मिळकतीची कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट, आधार कार्ड, पॅन कार्ड, लाईट बील इत्यादी आवश्यक कागदपत्रे लागणार आहे.नवीन व्यवसाय असल्यास पुढील ५ वर्षाचे प्रोजेक्शन, चालू बँक खात्याचा १ वर्षाचा खाते उतारा, जुना व्यवसाय असल्यास मागील ३ वर्षाचे आर्थिक ताळेबंद पत्रक लोकमंगल बँक यांच्या नियम व अटीनुसार कर्ज देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क रामचंद्र शिवपूजे -९८२३६११८९९, पुरुषोत्तम शिंदे - ९८९००४७४७१,सागर शिंदें - ९६७३६५७५७३,परमेश्वर जाधव - ८९८३४५२१३१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



# जवळाच्या देसाई विद्यालयास दुहेरी मुकुट

**शालेय जिल्हा कबड्डी स्पर्धा : पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ नोव्हेंबर -**

शालेय जिल्हा कबड्डी स्पर्धेत कै. सौ. वत्सलादेवी देसाई विद्यालय व कै.अण्णासाहेब घुले-सरकार कनिष्ठ महाविद्यालय, जवळा (ता.सांगोला) या शैक्षणिक संस्थेच्या १७ वर्षे मुले व मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

विजयी दोन्ही संघास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक विजय चडचणकर, अशोक पाटील, विजय लांडगे तसेच मार्गदर्शक कोच पंकज गव्हाणे, सचिन चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे, उपमुख्याध्यापक प्रशांत गोरे, संस्था सचिव सुभाष लऊळकर, कार्यालयीन सचिव मोहन कांबळे, संस्था उपाध्यक्ष मनाजीराव घुले सरकार, संस्थाध्यक्ष माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी अभिनंदन करीत विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**सांगोला तालुक्याचा गौरव वाढवला**

आमच्या संघाने मेहनतीने आणि संघभावनेने केवळ विजय मिळवला नाही तर संस्थेचा आणि सांगोला तालुक्याचा गौरव वाढवला आहे. खेळ ही केवळ स्पर्धा नसून जीवनातील शिस्त, चिकाटी आणि संघर्ष शिकवणारे माध्यम आहे. यांची प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनीही पुढे यावे, असे मत संस्थेचे अध्यक्ष दीपक आबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केले.

# अडचणीला धावून जाणारा, मदत करणारा मित्र; डॉ. शाम सुंगारे



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे आयुर्वेद विद्या शाखेचे माझी अधिष्ठाता, वसंतदादा आयुर्वेद महाविद्यालय सांगलीचे माजी प्राचार्य डॉक्टर शाम सुंगारे. यांचे प्रदीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

प्राचार्य डॉ. शाम शिवराज सुंगारे. हे कोल्हापुरात राहत असत परंतु १९८३ पासून त्यांनी सांगलीच्या वसंतदादा आयुर्वेद महाविद्यालयात रसशास्त्र या विषयात दर्शक म्हणून काम सुरू केले. पुढे ते त्याच महाविद्यालयात विभाग प्रमुख आणि प्राचार्य म्हणून निवृत्त झाले एक अत्यंत विद्यार्थी प्रिय शिक्षक त्यापेक्षाही अध्यापकांच्यामध्ये त्यांच्या अडीअडचणीला धावून जाणारा, मदत करणारा मित्र म्हणून ते आयुर्वेद फॅकल्टीमध्ये सुपरिचित होते. अनेक आयुर्वेद महाविद्यालयांना त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे, त्याचप्रमाणे कायदेशीर बाबींमध्ये सातत्याने मदत केली होती अकोल्याच्या आयुर्वेद महाविद्यालयामधून त्यांनी १९८३/८४ साली बीएएमएस पदवी घेतली होती त्यानंतर लगेचच ते अध्यापनाच्या क्षेत्रात रुजू झाले. पुणे येथील टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून त्यांनी एमडी पदवी संपादन केली होती. सन २००० मध्ये शिक्षक मतदार प्रभागातून ते महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन या शासनाच्या व परिषदेवर सदस्य म्हणून निवडून आले होते ,त्यांनी काउन्सिलच्या कार्यकारी समितीवर सदस्य म्हणूनही काम केले होते. शिवाजी विद्यापीठाच्या आयुर्वेद विद्या शाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून आणि नंतर शिवाजी विद्यापीठाची आयुर्वेद विद्या शाखा आरोग्य विज्ञान विद्यापीठाला संलग्नित होईपर्यंत, होईपर्यंत ते आयुर्वेद अधिष्ठाता म्हणून काम पाहत होते पुढे आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या स्वतंत्र विद्यापीठाची निर्मिती झाल्यानंतर तेथे त्यांनी आयुर्वेद विद्या शाखेचे अधिष्ठाता म्हणूनही काम पाहिले आयुर्वेद विद्या शाखेचे कायदे कानून नियम हे त्यांना अवगत असल्याने त्यांच्या मार्गदर्शनासाठी महाराष्ट्रातून अध्यापक, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक सातत्याने त्यांच्या संपर्कात येत असत त्यांनीही कुणाला विणमुख न पाठवता दिवस असो वा रात्र असो आयुर्वेद विद्या शाखेच्या भल्यासाठी सतत मदत आणि मार्गदर्शन केलेले आहे त्यांचा मित्रपरिवार मोठा असून संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेला आहे त्यांच्या निधनाने त्यांच्या सर्व कुटुंबीयांना आणि मित्रमंडळींना मोठा धक्का बसला आहे त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीपासूनच मी त्यांचा एक जवळचा हितचिंतक व मित्र म्हणून परिचित होतो पुढे सन २००० साली महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन या संस्थेवर एकत्र काम करताना आमचे स्नेहबंध घट्ट झाले आणि आजवर टिकले, त्यांच्या जाण्याने आमच्या पाटील कुटुंबात आणि नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनच्या राज्यभरातील सभासदांच्या कुटुंबात तसेच व्यक्तिशः माझे मोठे नुकसान झाले आहे, ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.

**- डॉ. सुनिल बी. पाटील**

## महत्वाचे...



### सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे बार असोसिएशनच्या वतीने स्वागत

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**

सोलापूर विमानतळावर रविवारी सकाळी दिल्लीला जात असताना सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई थोड्या वेळासाठी थांबले. यावेळी त्यांचे सोलापूर बार असोसिएशन, न्यायव्यवस्था आणि प्रशासनाच्या उच्च अधिकाऱ्यांनी सन्मानपूर्वक स्वागत करून पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष रियाज शेख, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य मिलिंद थोबडे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज कुमार शर्मा, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सत्र न्यायाधीश योगेश राणे, सिविल जज सीनियर डिव्हिजन ओमप्रकाश पाटील, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक मुकुंद ढोबळे आदी उपस्थित होते. केवळ पाच मिनिटांच्या या थांब्यादरम्यान सरन्यायाधीश न्यायमूर्ती गवई यांनी सोलापूरबद्दल आपुलकी व्यक्त केली आणि भविष्यात सोलापूरला भेट देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी या भेटीला ऐतिहासिक क्षण म्हटले आणि सर्वांची भेट झाल्यामुळे आनंद व्यक्त केला. सोलापूर शहरासाठी एक विशेष आणि अभिमानाचा प्रसंग ठरला. त्यांच्या या स्वागताबद्दल सर्वांनी सरन्यायाधीशांचे आभार मानले.



### संतांच्या प्रलंबित स्मारकांबाबत तातडीने कार्यवाही करा : अनिल सावंत

**मंगळवेढा, दि.२ नोव्हेंबर -**

मंगळवेढा ही संतांची पवित्र भूमी असून येथे संत बसवेश्वर महाराज, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत दामाजीपंत, श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट), संत मोहिनीबुवा, संत टिकाचार्य महाराज, संत गोविंदबुवा आणि संत सिताराम महाराज यांसारख्या अनेक संतांचा पदस्पर्श मंगळवेढ्याला लाभला आहे. संत बसवेश्वर महाराज व संत चोखामेळा महाराज यांच्यासह इतर संतांच्या प्रलंबित स्मारकांबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते व भैरवनाथ उद्योग समूहाचे चेअरमन अनिल सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. संतांची नगरी म्हणून ओळख असलेल्या मंगळवेढा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री. सावंत यांनी कार्तिकी एकादशीच्या पूर्वसंध्येला पंढरपूर येथील सावंत निवास येथे झालेल्या भेटीत विविध मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री शिंदे यांना सादर केले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, प्रथमेश पाटील, संतोष रंदवे, माणिक गुंगे, सिताराम भगरे हे उपस्थित होते.

या संतभूमीत त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा तसेच या भूमीचा तिर्थक्षेत्र म्हणून विकास न झाल्याने संत परंपरेला न्याय मिळालेला नसल्याने स्थानिकांना रोजगाराच्या संधीही कमी उपलब्ध आहेत. यावरही उपाययोजना करण्यात याव्यात तसेच मंगळवेढा शहराच्या हद्द वाढीबाबत जिल्हा प्रशासनाकडून मंगळवेढा नगरपरिषदेच्या प्रस्ताव दिनांक ०५ मे २०२१ रोजी नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला असला तरी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. सध्याच्या मर्यादित हद्दीमुळे शहरातील विकासकामांना अडथळा निर्माण होत असून, नव्याने स्थापन झालेल्या संत दामाजीनगर आणि संत चोखामेळानगर ग्रामपंचायती पूर्णपणे नगरपरिषदेच्या नागरी सुविधांवर अवलंबून आहेत. त्यामुळे या दोन्ही ग्रामपंचायतींसह मंगळवेढा ग्रामीण भाग नगरपरिषदेच्या हद्दीत समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली.

# प्रदेश अन् स्थानिक नेत्यांच्या चर्चेनंतरच मनपा निवडणुकीची रणनिती आखणार!

▶▶ **भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर**

▶▶ **महापालिका काबीज करण्याचा केला निर्धार**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पार्टी हा अत्यंत शिस्तबध्द पक्ष असून, आमचे प्रदेशचे पदाधिकारी अन् स्थानिक आमदार, माजी आमदार व इतर जेष्ठ नेत्यांशी चर्चा, संवाद साधूनच सोलापूर महानगरपालिका निवडणुकीची रणनिती आखणार आणि मनपा काबीज करणार असल्याचा निर्धार भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी खास दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि.२) व्यक्त केला.

सोलापूर भाजपात मोठ्या प्रमाणात इतर पक्षातील पदाधिकारी, नेत्यांचे इनकमिंग झाल्याने भाजपातील जुन्या काही पदाधिकाऱ्यांत नाराजी व्यक्त होत आहे. यामुळे





महापालिकेच्या निवडणुकांची रणनिती कशी राहील? अंतर्गत मतभेद कमी कसे करणार? इच्छुकांच्या भाऊगर्दीत आपण सर्वांना कसा न्याय देणार? या प्रश्नांबाबत बोलताना शहराध्यक्षा तडवळकर म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टीतील वरिष्ठ आणि स्थानिक नेत्यांची विकासकामे करण्याची पध्दत, केंद्र आणि राज्य सरकारची जनहिताची कामे करण्याची कार्यपध्दती पाहूनच इतर पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची गेल्या काही महिन्यात भाजपात मोठी इनकमिंग झाली आहे, सुरू आहे. या सर्वांना प्रवेश दिल्याने अनेकांच्या राजकीय प्रवाहातील कामाचे स्वरूप पाहून आणि भाजपातील पक्षनिष्ठ असलेल्या जुन्या नेत्यांनाही संधी देण्यासाठी जुन्या अन् नवीन पदाधिकाऱ्यांची सांगड घालून उमेदवारी देण्यात येणार आहे.

#### इच्छुकांच्या भाऊगर्दीत निष्ठावंतांवर अन्याय होणार नाही

सध्या शहर भाजपाकडून महापालिकेच्या लढाईची तयारी सुरू केली आहे. लवकरच नगरसेवकांचे प्रभागनिहाय आरक्षण होईल आणि यानंतर कोणाला उमेदवारी द्यायची? याचीही चाचपणी पक्षश्रेष्ठींनी आतापासूनच चालू केली आहे. या निवडणुकीच्या धर्तीवरच प्रभागनिहाय विविध कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत. पूर्वी मनपातील केलेली कामे, जनतेच्या अपेक्षा या धर्तीवर आगामी विकासकामांचा वचननामाही तयार होत आहे. या निवडणुकीत इच्छुकांची भाऊगर्दी होणार असून, या गर्दीत उमेदवारी देताना मात्र भाजपाच्या स्थानिक नेत्यांच्या नाकीनऊ येणार? यात शंकाच नाही. तरीही भाजपा शहराध्यक्ष म्हणतात की, इच्छुकांच्या भाऊगर्दीत निष्ठावंतांवर कसलाही अन्याय होणार नाही. पाहू या...आता कोणा-कोणाला उमेदवारी मिळणार...महायुती होणार का? का भाजपा एकटा लढणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे येणारा काळच देणार आहे.

#### मित्रपक्षाबरोबर युतीचा प्रयत्न करणार

मित्रपक्षाबरोबर युती राहणार की गत निवडणुकीप्रमाणे एकला चलो रे? यावर शहराध्यक्ष तडवळकर यांनी स्पष्ट केले की, मनपाच्या गेल्या निवडणुकीत आम्ही मित्रपक्षाशी युती न करता लढलो होतो. तरीही गतवेळी आमचे ४९ उमेदवार निवडून आले होते; २ महापौर झाले. या निवडणुकीत आम्ही आमचे मित्र पक्ष शिंदेसेना (शिवसेना) आणि राष्ट्रवादीच्या अजितदादा गटातील स्थानिक पदाधिकाऱ्यांबरोबर युतीची चर्चा करणार आहोत. युती झाली तर महापालिकेत जागा मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत आणि सत्ताही येणार आहे. जर जागा वाटपावरून युती तुटली तरीही भाजपाकडून स्वतंत्रपणे लढण्याची आमची तयारी आहे. आम्ही एकटे लढलो तरी ६० च्या पुढेच जागा मिळविण्याचे ध्येय ठेवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभेला मित्रपक्षाने चांगली मदत केल्याने प्रथम प्राधान्य आम्ही महायुती करण्यालाच देणार असल्याचा पुनरूच्चारही शहराध्यक्ष तडवळकर यांनी यावेळी केला.

#### योग्य अन् पात्र पदाधिकाऱ्यांनाच उमेदवारी

नगरसेवकांची उमेदवारी देताना पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे आणि स्थानिक जेष्ठ नेत्यांशी चर्चा, बैठकाही पार पडणार आहेत. या सर्वांच्या विचारमंथनातून आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आदेशान्वयेच स्थानिक उमेदवारीची लिस्ट फायनल होणार आहे. यामुळे योग्य आणि पात्र पदाधिकाऱ्यांनाच भाजपाकडून मनपा निवडणूक लढविण्याची संधी मिळणार आहे. उमेदवारी देताना कोणावरही अन्याय होणार नाही; अशी आमची सर्वांची भूमिका राहणार आहे.

#### पालकमंत्री आणि स्थानिक आमदारांच्या मर्जीवर युतीचा निर्णय

प्रदेश श्रेष्ठींनी महापालिका निवडणुकांबाबत काय सुचना केल्या आहेत? यावर शहराध्यक्ष तडवळकर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले आहे की, युती करायची का एकटे लढायचे हे तुमच्या तुम्ही ठरवा, स्थानिक आमदार, जेष्ठ नेते आणि तुमच्या कार्यकारिणीतील पदाधिकारी यांची मते अजमावून हा निर्णय घ्यावा. यामुळे हा निर्णय पालकमंत्री आणि स्थानिक आमदारांच्या मर्जीवर राहणार आहे.



#### ख्रिस्ती बांधवांचा सौल डे

**सोलापूर :** शहरात दोन नोव्हेंबर दिवस ख्रिस्ती बांधवांनी सौल डे(श्राद्ध दिवस) पाळला. पहिली ख्रिस्ती चर्च स्मशानभूमीत ख्रिस्त बांधव जमले होते. त्याप्रसंगाचे रविवारी टिपलेले छायाचित्र.



#### श्री संत नामदेव महाराज जन्मोत्सव सोहळा

**सोलापूर :** श्री संत नामदेव जनाबाई प्रतिष्ठानतर्फे श्री संत नामदेव महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त रविवारी पहाटे सहा वाजता श्रीराम मंदिर बाळीवेस येथे पाळण्याचा व गुलालाचा कार्यक्रम झाला.

## विचार करणारी नवी पिढी घडवली पाहिजे : आवटे

▶▶ **दत्ता गायकवाड लिखित चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन**

▶▶ **गावागावातील बाबासाहेब असे पुस्तक निघावेत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ नोव्हेंबर -**

विविध प्रश्न सोडविण्यासाठी सक्सेस पासवर्ड म्हणजे जयभीम आहे. विचार करणारी नवी पिढी घडवली पाहिजे. त्यासाठी ग्रंथ वाचणे गरजेचे आहे. लेखक दत्ता गायवाड यांचे चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तकातून बाबासाहेबांचा सोलापूरशी असलेला संबंध, इतिहास जगापुढे आला आहे. त्याचप्रमाणे बाबासाहेबांनी ज्या-ज्या गावात भेटी दिल्या, त्या ''प्रत्येक गावागावातील बाबासाहेब'' असे पुस्तक प्रकाशित व्हावे, असे प्रतिपादन संपादक



संजय आवटे यांनी सोलापुरात केले.

ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड लिखित 'चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात थाटात झाले. या पुस्तकाचे प्रकाशन संपादक संजय आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. एम. आर. कांबळे होते. विचारमंचावर लेखक दत्ता गायकवाड, अंबाजोगाई येथील प्रांताधिकारी दीपक वजाळे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव, निमंत्रक सुधीर चंदनशिवे आणि सुर्यमणी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

आपण म्हणतो नवी पिढी त्यांना काही कळत नाही. पण, आपण त्यांना त्यांच्या पद्धतीने सांगत नाही. तुम्हाला बाबासाहेब नव्या पिढीला सांगायचे असतील तर त्यांच्या शैलीत सांगावे लागेल. चळवळीचे नेहमी दस्तऐवजीकरण करायला हवे. याचे महत्व इंग्रजांनी जाणले, म्हणू त्यांनी जगभर राज्य केले, असे प्रतिपादन आवटे यांनी केले.

प्रांताधिकारी दीपक वजाळे म्हणाले, महाकाश्यप यांच्या कार्याचा वारसा दत्ता गायकवाड यांनी या पुस्तक रूपाने चालवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्वाचे आहेत. ते सर्वांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. प्रास्ताविक सुधीर चंदनशिवे यांनी केले. अध्यक्षीय मनोगत प्रा. एम. आर. कांबळे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. सुजित हावळे यांनी आभार मानले.

## त्या निराधार वृद्धेच्या मदतीला मंगळवेढा पोलिस आले धावून

### एका वृद्ध बहिणीस रेल्वेत सोडून तिघा भावानी केले होते पलायन

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ नोव्हेंबर -**

भारतीय संस्कृतीत बहिण भावाच्या नात्याला एक वेगळे व अतुट स्थान असून नुकतेच दिवाळीचा भाऊबीजेचा सण मोठया उत्साहात सर्वत्र साजरा करण्यात आला. मात्र मंगळवेढयाच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या एका ६५ वर्षीय वृद्ध बहिणीला उपचार करावयास नेतो असा बहाणा करून चक्क पंढरपूर कुर्डूवाडी मार्गे जाणाऱ्या रेल्वेत बसवून कुर्डूवाडी येथून तिघा भावानी पळ काढून त्या वृद्ध बहिणीला सोडून दिल्याची घटना घडली असून मात्र या वृद्ध महिलेच्या मदतीला मंगळवेढा पोलिस धावून आल्याने तिला मायेचा आधार मिळाला आहे.

हुन्नूर परिसरातील ऐका महिलेचे लग्न झाल्यानंतर सहा महिन्यात पतीने सोडून दिले. ती आपल्या माहेरी भावाकडे राहात होती. तिला मुलबाळ नसल्यामुळे ती एकटीच होती. ती वृद्ध महिला पडल्याने तिचा पाय घोटयाजवळ फ्रॅक्चर झाला होता. परिणामी तिला चालता येत नसल्यामुळे दुसऱ्याचा आधार घ्यावा लागत असे. मागील दोन दिवसापुर्वी तिच्या सख्ख्या तीन भावानी तिला आयुर्वेदिक उपचारासाठी कुर्डूवाडी येथे घेवून जातो असे सांगून पंढरपूर येथून जाणाऱ्या रेल्वेत चौघेजण



बसून कुर्डूवाडीकडे निघाले. कुर्डूवाडी स्टेशन येताच त्या बहिणीला तेथे सोडून त्या तिघा भावानी गुपचुप पळ काढला. ही वृद्ध महिला रेल्वेत बसून होती. तिच्या ही घटना लक्षात आली नसल्याने ती रेल्वेत बसून राहिली. सोलापूर आल्यानंतर तिचे भाऊ दिसत नसल्याने तिने रेल्वेच्या दरवाजाजवळ उभे राहून दरवाजाचा आधार घेत खाली उतरली तेवढयात रेल्वे पोलिस तेथे उभा असल्याने त्यांनी हे दृश्य पाहून तिच्या जवळ जावून विचारपूस केली तेंव्हा त्या आजीने सर्व घटना कथन केली. रेल्वे पोलिसानी सदर वृद्धेस रिक्षात बसवून सोलापूर बसस्थानकावर पाठवले. रिक्षा चालकानी त्या वृद्धेची हालत पाहून त्याने मोफत सेवा दिली. सोलापूर -पंढरपूर या बसने येवून ती रात्री ९ वाजता मंगळवेढा पोलिस स्टेशनमध्ये पोहचली. तिला चालता येत नसल्यामुळे पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस हवालदार वंदना आहिरे (घोडके) यांनी तिच्या मदतीला धावून ठाणे अंमलदार जवळ नेले व त्या वृद्धेने सर्व कर्मकहाणी ठाणे अंमलदारला सांगितले. रात्री महिला पोलिस हवालदार हिने आपल्या घरातील भोजन देवून तिला कुटुंबाचा आधार दिला व रात्री तिने पालिस स्टेशनमध्ये मुक्काम केला. तसेच दुसऱ्या दिवशी सकाळी पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हुलजंती बीटचे पोलिस हवालदार कोष्टी यांनी तिच्या कुटुंबियाशी संपर्क साधून तिला सुखरूप त्यांच्या ताब्यात दिल्यानंतर तिचा जीव भांडयात पडला. एकीकडे बहिण भाऊ चे नाते हे अप्रतिम असते. असे सांगितले जात असतानाच व्हाटसप फेसबुकच्या जमान्यात संकटसमयी बहिणीला भावाला सांभाळणे मुश्किल बनत असल्याचे विदारक चित्र या घटनेवरून स्पष्ट झाले आहे. दरम्यान त्या वृद्ध महिलेने जीवनाची कहाणी कथन करताना प्रसारमाध्यमाजवळ अक्षरशः अश्रू वाहिले.

## ब्रह्मोत्सव धार्मिक कार्यक्रमात अश्व वाहन ८१ कलषाभिषेक व गरुड वाहन पालखी सेवा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ नोव्हेंबर-**

श्री वेंकटेश्वर देवस्थानमध्ये श्री वेंकटेश्वर भगवान यांचा ब्रह्मोत्सव सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी ही धार्मिक कार्यक्रम मोठ्या धार्मिक वातावरणात संपन्न होत आहे.

धार्मिक विधीत रविवारी सकाळी अश्व वाहन ८१ कलषाभिषेक पुरोहित्यांचे मंत्रोच्चारात संपन्न झाले. तर संध्याकाळी गरुड वाहन पालखी सेवा धार्मिक कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. तत्पूर्वी ब्रह्म मुहूर्तावर ५.३० वाजता मुळमुर्ती अभिषेक , सकाळी ९.३० ते १२.०० होमहवन, पूर्णाहुती करण्यात आली. यावेळी मंदिरात गोविंदा हरी गोविंदा श्री व्यंकट रमणा गोविंदा... हा जयघोष दुमदुमला. श्रीदेवी भुदेवी समेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यउत्सव मंदिरापासून मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साही आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

दरम्यान, विश्वकल्याणासाठी भगवंताचा हा धार्मिक सोहळा दरवर्षी साजरा केला जातो. दिवाळीनंतर दक्षिणात्य परंपरेनुसार सुरू झालेला ब्रह्मोत्सव भाविकांसाठी एक विशेष पर्वणी देणारा काळ ठरला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वेतन पथकाला मिळाले दोन कर्मचारी; शिक्षकांची रखडलेली कामे मार्गी लागणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून दिले असून येत्या सोमवारपासून नियुक्त कर्मचारी पदभार स्वीकारतील, अशी माहिती शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी माहिती दिली. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात जवळपास ३५० शाळा व ३ हजारांहून अधिक शिक्षक कार्यरत असताना या कार्यालयाला पूर्णवेळ अधीक्षक व पुरेसे कर्मचारीही नव्हते. गेल्या दीड वर्षापासून केवळ एकाच महिला कर्मचाऱ्यावर या कार्यालयाचे कामकाज चालत होते.

परिणामी शिक्षकांची अनेक कामे खोळंबली होती. त्यामुळे प्राथमिक शाळा संयुक्त कृती समितीचे नेते सुनील चव्हाण यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता.

शिक्षण उपसंचालक डॉ. मोरे यांनी वेतन पथकाला तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची कार्यवाही केली आहे. आता दोन कर्मचारी मिळणार असल्याने रखडलेली शिक्षकांची कामे मार्गी लागतील. यामुळे शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

चोरट्याने शहरातून दोन दुचाकीची चोरी केली. नेहरू हणमंत पवार (वय ६०, रा. नंदुर, ता. मंगळवेढा) यांनी त्यांची एमएच १३ डीएफ १८४८ क्रमांकाची दुचाकी ही २० ऑक्टोबर रोजी अंबेश्वरी भाजनालय येथे रात्री हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत. तर ओंकार हेमंत घोडके (वय ३२, रा. सोमवार पेठ, सोलापूर) यांनी त्यांची एमएच २५ एआर ३७६८ क्रमांकाची दुचाकी ही ११ जून रोजी मंगळवार बाजार येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक फौजदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीवरील वृध्दास धडक; टेम्पो चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

दुचाकीवरील वृध्दास धडक देणाऱ्या टेम्पोचालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विठ्ठल ईरप्पा लोला (वय ७०, रा. प्रियदर्शनी जुना विडी घरकुल, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन आयशर टेम्पो क्र. एमएच १२ आर ४४५० च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० ऑक्टोबर रोजी विठ्ठल लोला हे सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्यांच्या एमएच १३ ईटी ५३०४ या इलेक्ट्रिक बाईकवरून नात नेहा हिस घेऊन घराकडे जात होते. त्यावेळी मार्केट यार्ड चौक येथे आयशर टेम्पो क्र. एमएच १२ आर ४४५० च्या चालकाने टेम्पो निष्काळजीपणे चालवून लोला यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये विठ्ठल यांच्या नातीच्या हाताला, पायाला, कमरेला, बरगडीस व सर्वांगास मार लागून बरगडीचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. म्हणून याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घोडके पुढील तपास करीत आहेत.

### भांडण सोडविण्यास आलेल्या तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

तुंगत (ता. पंढरपूर) येथे भांडण सोडविण्यास आलेल्या तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. गणेश आण्णासाहेब भोसले (वय २७, रा. तुगंत) असे जखमीचे नाव आहे. २ नोव्हेंबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास राहत्या घराजवळ तक्रार चालू असताना तक्रार सोडविण्यासाठी गेला असता तु का मध्ये पडतो असे म्हणून सौरभ कदम, ओंकार मेटे व इतर एकाने लोखंडी पाईप व लाथाबुक्क्याने गणेश यास मारहाण करून जखमी केले. त्यामुळे गणेश यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शिरापूर येथे कोयत्याने मारहाण केल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

शिरापूर (ता. मोहोळ) येथे कोयत्याने माराहाण केल्याने तरूण जखमी झाला. संजय विनायक लेंगरे (वय २५, रा. शिरापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी शिरापूर शिवारात अज्ञात कारणाने राजेश गिरी, पृथ्वीराज गिरी व तीन जणांनी मिळून संजय यास कोयत्याने व लाथाबुक्कयाने जबर मारहाण केली. त्यामुळे संजय यास जखमी अवस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चेष्टामस्करीत मित्राने चावा घेतल्याने युवक जखमी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

चेष्टामस्करीत मित्राने चावा घेतल्याने युवक जखमी झाला. सौदागर अमर इरफान (वय १९, रा. नविन विडी घरकुल, सोलापूर) असे जखमी युवकाचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी राहत्या घराजवळ सौदागर इरफान हा मित्रासमवेत थांबला होता. त्यावेळी चेष्टामस्करीत त्याचा मित्र आयान याने सौदागर याच्या उजव्या हाताचा चावा घेतला. त्यामुळे सौदागर याच्या हातास जखम झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज समाधी मंदिराचे उद्‌घाटन व भक्तनिवासाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ नोव्हेंबर-**

वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीत येणारा वारकरी हा आमचा प्रथम व्हीआयपी आहे. संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्धाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री तथा आमदार तानाजी सावंत, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, संस्था प्रमुख दादा महाराज मोरे माऊली, स्वामी अमृता आश्रम महाराज, चकोर महास्वामी बाविस्कर, हभप अक्षय भोसले महाराज, सरपंच जयलक्ष्मी माने उपस्थित होते.

शासनाने मंदिरांच्या जतन व संवर्धनासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आषाढी दिंडी अनुदान, विमा योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. हे राज्य संतांची, वीरांची, शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले तसेच श्री. संत मोरे परिवाराच्या वारकरी परंपरेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, हे सरकार शेतकरी आणि वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात असलेल्या जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून जाण्याची आमची भूमिका आहे. प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री संत मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्धाटन तर भक्तनिवास क्र.१चे लोकार्पण रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले.

## वहिनीच्या मृत्यूप्रकरणी दीराविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

अचानक ब्रेक दाबल्याने दुचाकीवर पाठीमागे बसलेली वहिनी खाली पडून गंभीर जखमी होऊन मरण पावली. याप्रकरणी दुचाकी चालविणाऱ्या दीराविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभांगी सुनिल मल्लाव (वय २३, रा. तिऱ्हे, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या वहिनीचे नाव आहे. याबाबत सुनिल जीवन मल्लाव (वय ३५, रा. तिऱ्हे) यांच्या फिर्यादीवरुना सागर जीवन मल्लाव (वय ३०, रा. तिऱ्हे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२४ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास सागर हा त्याची वहिनी शुभांगी यांना घेऊन दुचाकी क्र. एमएच १३ ईआर ५०७३ वरून मंगळवेढा रोडने जात होता. त्यावेळी समृध्दी हॉटेलजवळील आनंद नगर येथे दुचाकीसमोर मांजर आडवे आल्याने सागर याने दुचाकीचा अचानक ब्रेक मारला. त्यावेळी दुचाकीवर पाठीमागे बसलेली सागरची वहिनी शुभांगी या खाली




पडून त्या गंभीर जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असताना उपचारादरम्यान शुभांगी यांचा मृत्यू झाला.

दुचाकी हयगयीने चालवून शुभांगी यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

## गाडीचा कट लागल्याच्या मारहाणीत तरूणाचे दात पडून जीभ कट झाल्याने जखमी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

गाडीचा कट लागल्याने तरूणास मारहाण करण्यात आली. सोनू नारायण राऊत (वय २८, रा. कुरूल, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे.

२ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास सोनू राऊत हा दुचाकीवरून मोहोळ ते कुरूल जात असताना मोहोळजवळील छावा ढाबाजवळ गाडीचा कट लागल्याने अज्ञात व्यक्तीने सोनू यास लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली. त्यामध्ये सोनूचे दोन ती दत पडल्याने व जीभ कट झाल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## जादा गोळ्या खाऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

जादा गोळ्या खाऊन तरूणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. गिरीष संजय क्षिरसागर (वय २०, रा. रामलाल चौक, रेल्वे लाईन, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री सध्या राहात असलेल्या निराळे वस्ती येथील घरात अज्ञात कारणाने गिरीष क्षिरसागर याने कोणत्यातरी ४०-५० गोळ्या एकदम खाल्याने त्यास त्रास होऊ लागला. त्यामुळे क्षिरसागर यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## पिवळा कलर प्राशन करून युवतीचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर -**

शहरातील जुना विडी घरकुल परिसरात राहणाऱ्या युवतीने अंगणात सडा मारण्याचा विषारी पिवळा कलर प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला.

श्रीलेखा अंबादास कुरापाटी (वय १६, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या युवतीचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री राहत्या घरी अज्ञात कारणाने श्रीलेखा हिने सडा मारण्याचा पिवळा कलर प्राशन केला. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्याने वडील अंबादास यांनी श्रीलेखा हिस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## कळसारोहणनिमित्त औरादमध्ये बुधवारपासून विविध धार्मिक कार्यक्रम

▶▶ **श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य व काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य यांची उपस्थिती**

▶▶ **जलकुंभ व अड्डपालखी मिरवणूक, कळसारोहण कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**





दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद येथील श्री महादेव मंदिर कळसारोहण कार्यक्रमानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार पाच नोव्हेंबर ते सोमवार १० नोव्हेंबरदरम्यान कार्यक्रम होणार असून दररोज मंदिर परिसरात सायंकाळी ६ ते ७ यावेळेत लक्ष दीपोत्सव होईल. तसेच पाच ते नऊ नोव्हेंबर या कालावधीत सायंकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत जिंतूर येथील ष.ब्र. अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी शिवपुराणावर आधारित प्रवचन होईल. नऊ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता अय्याचार्य व लिंग दीक्षा कार्यक्रम असून सकाळी दहा वाजता नंदी व नवगृह प्राणप्रतिष्ठापना होईल.

सोमवार दहा नोव्हेंबरला सकाळी नऊ वाजता श्री जागृत गणेश मंदिरापासून ५०१ सुवासिनींसह जलकुंभ मिरवणूक, श्रीशैल पीठाचे डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवचार्य व काशी पीठाचे डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य यांची अड्डपालखी मिरवणूक सोहळा व जगद्गुरूंच्या उपस्थितीत कळसारोहण होईल. त्यानंतर धर्मसभा होऊन महाप्रसाद वाटप कार्यक्रम होईल. या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

## हरिनामाचा गजर करत भाविक विठूराया चरणी नतमस्तक

### कार्तिकी एकादशी निमित्त शहरातील चौपाड आणि जुन्या श्री विठ्ठल मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ नोव्हेंबर-**

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र श्री विठुरायाच्या पंढरपूरात भाविकांचा मेळा जमला असताना, सावत्र उत्साहाचे आनंदाचे आनंद धार्मिकतेचे वातावरण दिसून येत आहे. आषाढीनंतर येणारी कार्तिकी अर्थात प्रबोधिनी एकादशी दुसरी महत्वाची एकादशी यात्रा आहे. सोलापूर शहर जिल्ह्यात या एकादशीचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. याच कार्तिक एकादशी निमित्त सोलापूर शहरातील विविध विठ्ठल मंदिरात देखील भाविकांची सकाळपासूनच श्रींच्या दर्शनासाठी मांदियाळी होती. शहरातील चौपाड तसेच जुन्या विठ्ठल मंदिरात आबालवृद्ध भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले.



दरम्यान, शहरातील चौपाड आणि जुने विठ्ठल मंदिरात पहाटेपासून भक्तीमय वातावरण होते. पहाटे पाच वाजता धार्मिक विधी सुरुवात झाली. श्रींच्या मूळमूर्तीस महाभिषेक, काकड आरती आणि महापूजा करण्यात आली. यानंतर सावळ्या विठुरायाला आणि रुक्मिणी मातेला भरजरी वस्त्रांसह आभूषणे अलंकार परिधान करण्यात आले. त्यामुळे श्रींची सुवर्णजडीत अलंकृत केलेली लोभसमूर्ती भाविकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली. यावेळी मंदिर परिसरात नवचैतन्याचे आणि प्रसन्नतेचे वातावरण होते. आकर्षक आणि सुवासिक फुलांनी तसेच तुळशीमाळांनी मंदिर आणि श्रींचा गर्भ गाभारा सजवण्यात आला होता. यावेळी सर्वत्र तुळशीमाळाचा सुगंध दरवळत होता. आकर्षक विद्युत रोषणाईने सारा मंदिर परिसर प्रकाशमान झालेला दिसून आला.

#### सावळ्या विठुराया आणि माता रुक्मिणीच्या दर्शनास आसुसलेले वैष्णव

कार्तिकी एकादशी निमित्त सोलापूर शहरातील चौपाड तसेच जुन्या विठ्ठल मंदिर सकाळपासूनच मांदियाळी होती. भाविकांनी आपल्या हातामध्ये तुळशीपत्र आणि नैवेद्य घेऊन आलेल्या सुवासिनी महिला श्रींच्या या गाभाऱ्यात मनोभावे पूजन केले. तर काहींनी फळ व पुष्प अर्पण करत श्रींचे दर्शन घेतले.

#### मंदिरात धार्मिक कार्यक्रम संपन्न

आज आषाढी एकादशीनिमित्त मंदिरात पहाटेपासून धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. पहाटे पाच वाजता श्रींच्या मूळ मूर्तीचे महाभिषेक घालण्यात आला. त्यानंतर काकडा आरती, महापूजा, होम हवन, दुपारी चार ते सहा भजन त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आले. त्यानंतर रात्री साडेदहा वाजता महाआरती करण्यात आली.

**- हर्षवर्धन कुलकर्णी, चौपाड विठ्ठल मंदिर पुजारी**

## कार्तिकी एकादशीचा उत्सव; शुभराय मठातून भाविकांनी ओढला श्रींचा रथ

### वठुनामाने दुमदूमला परिसर ; कार्तिकी एकादशीनिमित्त जमला वैष्णवांचा मेळा !

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठू माऊलीच्या कार्तिकी (प्रबोधिनी) एकादशी निमित श्रीशुभराय महाराज मठातून सवाद्य रथोत्सव मिरवणूक काढण्यात आली. भगवा पताकासह डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन महिलांनी बँडच्या तालावर विठूनामाचा गजर केला. रविवारी दुपारी ठीक साडेबारा वाजण्याच्या सुमारास श्रींचा लाकडी रथ श्री शुभराय मठातून मिरवणूकीसाठी बाहेर काढण्यात आला. मुखी हरिनामाचा गजर करत अनेक भाविकांनी दोरखंडाद्वारे रथ ओढत मिरवणूक मार्गस्थ केली.



**सोलापूर : कार्तिक एकादशीनिमित्त श्री शुभराय मठातून भाविकांनी ओढला श्रींचा रथ तर यावेळी महिलांनी धरला फुगडीचा फेर धरला.**

दरम्यान, १७८५ पासून निघालेल्या रथयात्रेचे हे यंदाचे २४० वे वर्ष आहे. ही रथयात्रा वारकरी पंथांचीची बिजे सोलापूरात रोवण्यासाठी श्री शुभराय महाराजांनी १७८५ रोजी आषाढी एकादशीला आलेल्या विठुरायासाठी सवाद्य रथयात्रा सुरु केली. त्यासाठी गुरुदिन कलवार यांनी शुभरायांच्या मार्गदर्शनाखाली तीन मजली दुमडता येणारा रथ तयार करुन दिला. दशमीला देवाचे नवरात्र संपले. सायंकाळी रथाच्या मानकऱ्यांनी रथाची बांधणी करून प्रसाद घेतला. नेहमीप्रमाणे सकाळी पावणे सहा ते सात या वेळात काकडा झाला.

या काकड्यातूनच भगवंत त्यांच्या योगनिद्रेतून उठले. साडे सात वाजता पौरोहित्य करणारे श्री पांडुरंग उपाध्ये यांनी अकरा गुरुजींच्या सहकार्याने विठुराया आणि भगवान श्रीकृष्णाचा पौमानाचा अभिषेक केला. यावेळी अनेकांनी भगवंतास अभिषेक घातला. साडे दहा वाजता भगिनींनी भजन केले. दुपारी १२ वाजता महाआरती होऊन रथयात्रा सुरु झाली. विठुरायाच्या गजरात महिला झिम्मा फुगडी खेळत, उंच उंच झेंडे उडवत, ही रथयात्रा सर्वांना दर्शन देत, सायंकाळी मठात आली. पुन्हा महाआरती होऊन, आलेल्या सर्वांना प्रसाद म्हणून उपवासाचा फराळ देण्यात आला. या रथयात्रेचे नेतृत्व श्रीमती शुभांगी बुवा यांनी केले. रथाची संपूर्ण जबाबदारी रथाचे मानकरी यंदे, गवळी, गुमाते, चव्हाण, छत्रबंद, काटकर, होणकलस, नवगिरे, संजय दास इत्यादींनी आणि त्यांच्यासोबत त्यांच्या परिवारातील लहान मुलांनी समर्थपणे पेलली. तसेच फुलांची सजावट रियाज शेख यांचे कुटुंब आणि माईक व स्पीकरची व्यवस्था अबुल शेख या मुस्लिम बांधवांनी केली.

भगवंताची महाआरती अमृता व श्री ऋतूराज बुवा यांनी केली. रथयात्रेमध्ये पालखीची जबाबदारी नेहमीप्रमाणे भावे बंधू आणि खिलारे बंधूंनी पेलली. या रथयात्रेत शोभना सुहास परिचारक, मठात रोज काम करणारे सर्व पुजारी, पाखर संकुलच्या यशोदामाता, संयोगिता काकडे, मंजुषा बारकूल आणि त्यांच्या सख्या, उद्योगवर्धिनीच्या गितांजली चौहान, प्रवीण देशमुख, ध्रुव कांबळे सहभागी झाले.

रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची गर्दी जमली होती. भक्तांनी हा भगवंताचा रथ ओढला. या मिरवणुकीत बँड, ढोलताशा, अभंग गायन यांनी सर्वत्र उत्साह निर्माण केल्याचे दृश्य पहावयास मिळाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२५५

**सत्वरजतमबाधा ।**
**नव्हे हरिभक्तांसि कदा ।।**

मानव जन्मत: किंवा निसर्गत: सारखाच असला तरीही तो त्याच्या स्वभावामुळे एकमेकांपेक्षा भिन्न असल्याचे त्याच्या वर्तनावरुन दिसून येते. सात्वीक, राजसी आणि तामसी अशी मानवा-मानवात भिन्नता दिसून येते. या तीन गुणांपैकी जो गुण मानवात प्रबल आहे, त्या स्वभावाचा माणूस असतो. या तिन्हींपैकी सात्विक गुण अत्यंत चांगला असला तरीही राजसी आणि तामसी वृत्तीचेच जास्त लोक पहायला मिळतात. कधी-कधी अचानकपणे एका वृत्तीचा माणूस दुसऱ्या वृत्तीमध्ये प्रवेश केलेलाही पहायला मिळतो. अर्थात मानवाकडे एखादा गुण प्रबळ असेल तर तो आयुष्यभर आपली प्रबळता टिकवून ठेवेलच असे नाही. प्रसंगानुरुप किंवा चांगल्या-वाईटाच्या सहवासामुळे आहे तो गुण निघून जाण्याची व नविन गुण आत्मसात होण्याची क्रीया घडू शकते. समाजात असे काही लोक आहेत की, ज्यांच्याकडे सात्विकता आपले स्थान एवढे पक्के करुन बसलेली असते की, त्या सात्विकतेला रज आणि तम कांहीच करु शकत नाहीत. सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पाहून सदसदविवेकवृत्ती जोपासणाऱ्यांना रज आणि तम यांपैकी कशाचीही बाधा होत नाही. या तिन्ही गुणांपैकी कोणताही गुण, अवगुण भक्तांच्या स्थितप्रज्ञतेला धक्का पोहचू शकत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**सत्वरजतमबाधा । नव्हे हरिभक्तांसि कदा ।।**
**देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ।।**

रज आणि तम हे भक्तांना बाधक ठरणार नाहीत,हे आपणाला पटू शकते. पण सत्व बाधक होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे आपणाला वाटू शकते. कारण सत्व गुण वाढावा असाच सज्जनांचा प्रयत्न असतो. महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे भक्तांना सत्व बाधक ठरत नाही. कारण ते सात्वीकतेचा अभिमान बाळगत नाहीत. चांगल्या आणि मोठ्या लोकांना जेव्हा चांगुलपणाचा,मोठेपणाचा अभिमान चढतो, तेव्हा त्यांच्याकडील सात्विकता कमी होऊ लागते. ज्याच्याकडे गर्व, अभिमान ,मीपणा, अहंकार आहे, त्याच्याकडे खऱ्या अर्थाने सात्विकता रहात नाही. आपण इतरांपेक्षा कांहीतरी वेगळे आहोत, अशी भावना ख-या भक्तांच्या मनाला स्पर्श करीत नाही. त्याचबरोबर वाईट घटनांचा, गोष्टींचा ,स्वार्थ, मीपणाचा ते विचारच करीत नसल्याने त्यांच्याकडे रज किंवा तम प्रवेश करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. चांगले लोक जेव्हा स्वत:ला आपण चांगले, मोठे म्हणून घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांच्याकडील चांगुलपणाला, मोठेपणाला कळत न कळत सुरुंग लागत असतो. चांगला, वाईट यापैकी कोणताही गुण बाधू नये याची ख-या भक्तांनी त्यांच्या मनाला समज दिलेली असते. ज्याचे मनच त्याच्या ताब्यात आहे, त्याला स्वप्नातही नको त्या गोष्टीची बाधा होत नाही. सत्व, रज, तम यांच्यापासून दूर राहणारा किंवा त्यांच्या बाधेवर पूर्वीच बंधन घालून बसलेला भक्त देवापेक्षा वेगळाही रहात नाही. असे भक्त हेच चालते-बोलते भगवंत असतात. विशेष म्हणजे हे भक्त सर्व जीवमात्रात भगवंताला पाहतात. वाईटातही तोच भगवंत आणि सज्जनातही तोच भगवंत असे हे भक्त म्हणतात. सर्वत्र समानता पाहणाऱ्या भक्तांची समाजाला खूप गरज असल्याने आपणाला क्रमांक अशा भक्तात येण्यासाठी आपण प्रयत्नशील असायला हवे.


**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - सोमप्रदोष, |
| दि. ३ नोव्हेंबर २०२५ | वैकुंठ चतुर्दशीचा उपवास, |
| विक्रम संवत् २०८२ | शिवपूजन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी (२६.०५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- उ. भाद्रपदा (१५.०५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (१९.३९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (१५.४०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

## वाचकपत्र



### आपले नाव मतदार यादीत तपासा

सध्या निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. यामध्ये सत्येत असलेले व विरोधक नेते मंडळी एक दुसऱ्यावर आरोप करत आहेत. मतदार यादी चुकीची आहे. या गोष्टीपासून पक्षाला राजकारणात एकमेकांना जरी फायदा, नुकसान होत असले तरी आपले कर्तव्य आहे की स्वत:चे नाव मतदार यादीत आहे का नाही, घरातील व्यक्ती स्थलांतरित आहे का व नवीन मतदार नोंद झाली आहे का, या सर्व गोष्टी नागरिकांनीच बघणे खूप गरजेचे आहे. आपल्या संविधानाने आपल्याला मतदानाचे हक्क दिलेले आहे. हे पवित्र दान आपण स्वत:साठी वापरायचे आहे. देशाचे राजकारण आपल्या हाती आहे व सत्तेत कोण आले पाहिजे हे ठरवायचे ही अधिकार आपल्या एका मतामुळे सिद्ध होणार आहे. त्यामुळे आपण येत्या नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषद च्या निवडणुकीमध्ये आपले मतदार यादीत नाव आहे का हे प्रथम पाहणे खूप गरजेचे आहे. मगच मतदानाचे हक्क बजावता येईल. असे वाटते.

**- फैय्याज शेख,** अध्यक्ष, सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच,

# गुलाबी थंडीतही रोजच पाऊस; पेरण्या लांबणीवर

## यंदा ज्वारीपेक्षा गहू, मका, ऊसक्षेत्र वाढणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील सर्वच मंडलातील खरिपाची पिके अतिवृष्टी, महापुरामुळे वाहून गेली आहेत. अनेक गावात शासनाकडून मिळणारी नुकसानीची म दतही मिळाली नसल्यामुळे शेतकरीवर्ग प्रचंड अडचणीत आला आहे. तरीही हे संकट बाजूला सारून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी हंगामातील पेरणीचा श्रीगणेशा केला आहे.

दरम्यान, थंडीच्या महिन्यातही रोजच पाऊस पडत असल्याने जमिनीच्या वापस्याअभावी आजतागायत जिल्ह्यात अवघी १५ टक्केपर्यंतच पेरणी झाली असून, नोव्हेंबरमध्ये पाऊस थांबला तरच पेरणीचे हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. इतकेच नाहीतर ज्वारी पेरणीस विलंब झाल्याने यंदा गहू, हरभरा, ऊस आणि मका पेरणीचा टक्का वाढण्याची शक्यता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. २) व्यक्त केली.

दरवर्षी जिल्ह्यात सरासरी तीन ते साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील पिकांची पेरणी होत असते. यंदा हे क्षेत्र वाढण्याची शक्यता कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यात पुन्हा परतीचा पाऊस सुरु झाला असून, अजूनही काही भागात पाऊस पडत आहे. या महिन्यात तशी तर कडाक्याची थंडी पडत असते; मात्र यंदा अजूनही पाऊस पडू लागल्याने आणि आभाळ येत असल्याने थंडीची चाहुलही तशी लागेना झाली आहे. सतत पाऊसधारा कोसळत असल्यामुळे वापस्याअभावी पेरणी लांबत आहे. इतकेच नाहीतर काही ठिकाणी जास्त पाऊस झाल्याने दुबार पेरणीचे संकटही शेतकऱ्यांवर आले आहे. रब्बी हंगामात गहू, ज्वारी, मका ही महत्वाची पिके आहेत. खरीप पेरणी वाया गेल्याने रब्बी क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता जास्त आहे.

गतवर्षी रब्बी हंगामात विविध पिकांची पेरणी सरासरी ३.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली होती. यंदा मात्र या क्षेत्रात मोठी वाढ होणार आहे. मात्र आता पाऊस थांबण्याची गरज आहे. अतिवृष्टी, महापुरामुळे शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अजूनही जिल्ह्यातील शेतशिवारामध्ये पाणी साठले आहे. रब्बी पेरणी जरी सुरु झाली असली तरी देखील परतीचा पाऊस अजूनही बरसत आहे. यंदा गहू, हरभरा आणि ऊस पिकांत मोठी वाढ होणार आहे.

# पदवीधर व शिक्षकांनी नावनोंदणी करावे

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ नोव्हेंबर-**

पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाले असून त्यासाठी मतदार नावनोंदणी सुरू आहे. त्यामुळे पदवीधर व शिक्षक असणाऱ्या उमेदवारांनी पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी ऑनलाईन नावनोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी व नोडल अधिकारी स्मिता पाटील यांनी केले आहे.




पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक होणार असून त्यासाठी मतदार नावनोंदणी करण्यासाठी ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर मुदत देण्यात आली आहे. मतदार नाव नोंदणीसाठी ऑफलाईन व ऑनलाईन नावनोंदणी करण्यात येत आहे.

गुरूवार ६ नोव्हेंबर मतदार नाव नोंदणीसाठी अंतिम मुदत आहे. पदवीधर व शिक्षकांनी आधार कार्ड, मतदान कार्ड, पदवी प्रमाणपत्र व नावत बदल असल्यास गॅझेट व विवाह नोंदणी प्रमाणपत्र व सहीचा नमुना घेऊन अधिकाधिक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करून मतदानाचे हक्क बजवावे, असे आवाहन नोडल अधिकारी पाटील यांनी केले आहे.

# समर्थ ज्वेलर्सवर कोयता बंदुकीचा धाक दाखवून दरोड्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

शहरातील विजापूर रोडवरील आरटीओ ऑफिस जवळ असलेल्या गणेश नगर-तील श्री समर्थ ज्वेलर्स या दुकानावर तीन दरोडेखोरांनी कोयता आणि नकली पिस्तुलाच्या सहाय्याने दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला यावेळी दुकान मालकाच्या प्रसंगावधानामुळे दरोडेखोरांच्या दरोड्याचा प्रयत्न फसला असून केवळ काचा फोडून दहा हजाराचे नुकसान झाले आहे या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून दरोडेखोरांचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.



याबाबत श्री समर्थ ज्वेलर्सचे मालक दीपक दिगंबर वेदपाठक (वय ६३, रा. फ्लॅट नं. ३०२, साईश्रध्दा अपार्टमेंट, चौडेश्वरी मंदिर जवळ, जाई जुई नगरजवळ, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी सायंकाळी ७:४५ च्या सुमारास गणेश नगर येथील श्री समर्थ ज्वेलर्स या दुकानात दुकान मालक दीपक वेदपाठक तसेच एक महिला कर्मचारी व एक पुरुष कर्मचारी असे तिघेजण दुकानात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या तीन दरोडेखोरांपैकी दोन दरोडेखोर हे काळ्या रंगाच्या सॅग बॅग्स सह दुकानात आले व एक जण दुचाकी वरच बसून राहिला. दुकानात आलेल्या दोन दरोडे खोरांपैकी एकाने कोयत्याचा तर दुसऱ्याने नकली पिस्तुलाचा धाक वेदपाठक व त्यांच्या दोन्ही कर्मचाऱ्यांना दाखवून दुकानातील सोन्याचे दागिने मागितले. दागिने न देता वेदपाठक यांनी आरडा ओरड करण्यास सुरुवात केली. त्यावेळी एकाने कोयत्याने दुकानातील काउंटरच्या काचा फोडल्या आणि दमदाटी करण्यास सुरुवात केली. दरम्यान मालकांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केल्याने दोघे दरोडेखोरांनी दुकानातून बाहेर पडून दुचाकी वरील बसलेल्या आपल्या साथीदारांच्या सहाय्याने दुचाकीवरून पळ काढला.

या घटनेची माहिती दुकान मालक वेदपाठक यांनी तात्काळ विजापूर नाका पोलिसांना कळविल्यानंतर विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादा गायकवाड व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. यावेळी दरोडेखोर आले त्यांनी दमदाटी केली व पळून गेले ही सर्व घटना दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरा मधून कैद झाली असून याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरोडेखोरांच्या शोधासाठी विजापूर नाका पोलीस ठाण्याचे चार पोलीस पथक तसेच शहर गुन्हे शाखेची तीन पोलीस पथके कामाला लागली असून पोलिसांकडून या गुन्ह्याचा कसोशीने शोध सुरू आहे. सहायक पोलिस निरीक्षक गाकयवाड पुढील तपास करीत आहेत.

# पोलीस अधिकारी शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांना गृहमंत्री दक्षता पदक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

महिला पोलिस अधिकारी शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. एका शिक्षण संस्थेतील २२ मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाला वाचा फोडणाऱ्या या महिला पोलिस अधिकाऱ्याचा गौरव होत आहे.



महाराष्ट्रात विविध ठिकाणी कार्यरत असताना उल्लेखनीय कामगिरी केल्याप्रकरणी घडाडीच्या पोलीस अधिकारी, पोलीस उपायुक्त शर्मिष्ठा घारगे वालावलकर यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. यामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. शर्मिष्ठा घारगे वालवलकर यांच्या आतापर्यंतच्या कारकीर्दीत सांगलीतील कामगिरी उल्लेखनीय ठरली. आश्रमशाळेत विद्यार्थिनींवर अत्याचार झाल्याचे निनावी पत्र मिळाल्यावर त्यांनी उपनिरीक्षक पल्लवी चव्हाण यांच्या मदतीने तपास सुरू केला होता.

**२२ मुलींवर अत्याचार प्रकरणाचा भांडाफोड**

सांगली येथे पोलीस उपाधीक्षक पदावर कार्यरत असताना त्यांना एका शिक्षण संस्थेत २२ मुलींवर अत्याचार झाल्याचं निनावी पत्र मिळालं होतं. या प्रकरणाचा कसून तपास करत आरोपीला चार वेळा जन्मठेपेची शिक्षा लागेपर्यंत त्यांनी पाठपुरावा केला.

**केंद्रीय गृहमंत्रालयाकडून पदकं जाहीर**

देशभरात सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या खात्यात कार्यरत असलेल्या व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना केंद्रीय गृहमंत्रालयाने नुकतेच पदक जाहीर केली आहेत. महाराष्ट्रातील पाच अधिकाऱ्यांना हे पदक जाहीर झाले आहे.

**२००६ सालच्या एमपीएससी अधिकारी**

छत्रपती संभाजीनगर शहरातील पोलीस उपायुक्त शर्मिष्ठा घारगे वालवलकर यांनाही केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. त्या २००६ सालच्या एमपीएससी उत्तीर्ण विद्यार्थिनी आहेत. २०१० पासून त्या पोलिस दलात विविध विभागांमध्ये कार्यरत आहेत.

**किरण बेदींकडून प्रेरणा -**

भारतातील पहिल्या महिला आयपीएस किरण बेदी यांच्याबद्दल वाचल्यानंतर शर्मिष्ठा यांनी बालपणीच पोलीस सेवेत येण्याचं स्वप्न पाहिलं. जेव्हा त्यांच्या शाळेत प्रमुख पाहुण्या म्हणून सांगलीच्या तत्कालीन पोलीस ऑफिसर रश्मी शुक्ला आल्या होत्या, तेव्हा त्यांच्या स्वप्नांनी आकार घेण्यास सुरवात केली.

**आरोपीला चार वेळा जन्मठेप होण्याबाबत पाठपुरावा**

त्या आश्रम शाळेचा संस्थापक अध्यक्ष अरविंद पवार याच्याविरुद्ध भक्कम पुरावे सादर करत २२ मुलींच्या अत्याचार प्रकरणाचा भांडाफोड केला होता. शर्मिष्ठा वालवलकर या एवढ्यावरच थांबल्या नाहीत तर आरोपीला चार वेळा जन्मठेप होण्याबाबत पाठपुरावाही केला.



# संभाजी ब्रिगेडने दिली वृद्धांना आपुलकीचे उब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर -**

संभाजी ब्रिगेड च्या वतीने अक्कलकोट रोड येथील आधार वृद्धाश्रमात जाऊन तेथील सर्व वृद्धांना हिवाळ्यातील थंडी पासून बचावासाठी उबदार ब्लँकेट चे वाटप करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, महिला जिल्हाध्यक्ष मीनल दास, वकील आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश कदम, जिल्हा संपर्कप्रमुख शत्रुघ्न माने, महिला आघाडी शहराध्यक्ष मनीषा कोळी, शहर उपाध्यक्ष दिलीप भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, शहर व जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, सतीश वाबरे, जयश्री जाधव व पदाधिकारी उपस्थित होते.

# ‘आयुष्यमान’कडे मनपा अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष?







**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

जिल्ह्यात एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तथा महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ०१ एप्रिल २०२५ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत २४ हजार १६९ रुग्णांच्या २३ हजार ७६३ शस्त्रक्रिया / उपचार यावर रुग्णालयांना ५५ कोटी २१ लाख ६९ हजार ९९० रुपयांचा निधी वितरित करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात या योजनेअंतर्गत शासकीय व खाजगी अशी एकूण ११४ रुग्णालये अंगीकृत असून, या योजनेकडे महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचा संताप आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी नुकताच पत्रकार परिषदेत व्यक्त केला मात्र या महत्वाकांक्षी योजनेसाठी सोलापूर महापालिका अधिकारी-कर्मचारी का दुर्लक्ष करताय? असा सवाल सोलापूरच्या जाणकार नागरिकांतूनही आता उपस्थित होत आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तथा महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा आढावा बैठकीत डॉ. शेटे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. दीपक वाघमारे, डॉ. मोहन शेगर, यांच्यासह आयुष्मान भारत योजनेच्या मान्यताप्राप्त सर्व खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. ते यावेळी म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार राज्यात आयुष्मान भारत ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सोलापूर महापालिका प्रशासनाची व योजनेच्या जिल्हा समन्वयकांची कामगिरी असमाधानकारक आहे. त्यामुळे मनपा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, जिल्हा समन्वयक यांची बदली करण्यात आली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही हे अधिकारी सोलापूर शहरातील नागरिकांसाठी का काम करीत नाहीत. अध्यक्ष डॉ. शेटे यांची ही सोलापूर जिल्ह्यात तिसरी भेट आहे. तिन्ही वेळेस मनपाचे या योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याची त्यांची खंत आहे.

जिल्ह्यात या योजनेचे ४० लाख ९१ हजार ९९६ लाभार्थी असून, १३ लाख ९२ हजार ९६५ लाभार्थ्यांचे कार्ड जनरेट झालेले आहेत. उर्वरित कार्ड लवकरच काढले जातील, असे त्यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात जास्तीत जास्त आरोग्य मित्र उपलब्ध असले पाहिजेत व या सर्व आरोग्य मित्रांनी रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना या योजनेची सविस्तर माहिती दिली पाहिजे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. महापालिका, नगरपालिका क्षेत्रात या योजनेचे काम असमाधानकारक असल्याने या संस्थांच्या अधिकाऱ्यांसमवेत निवडणुकापूर्वी पुन्हा स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी संकेत दिले. एकंदरीत, आयुष्मान भारत योजना सोलापुरात चांगली राबविण्यात यावी, सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, अशी त्यांची अपेक्षा आहे. यामुळे शहर आणि जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांनी डॉ. शेटे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याची गरज आहे. जोवर हे अधिकारी आणि शासनाने नियुक्त केलेले आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. शेटे यांच्यात समन्वय निर्माण होत नाही; तोवर ही योजना गतीने राबणार नाही? असा सवालही जाणकार नागरिकांत निर्माण होत आहे. याचबरोबर सोलापूरच्या स्थानिक नागरिकांनीही ही योजना समजून घेवून ऑनलाईन प्रक्रियेतून आपले कार्ड काढण्याची गरज आहे. आता घरबसल्याही ही प्रक्रिया आपण पूर्ण करू शकतो आणि आपल्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांचे कव्हर मिळवू शकतो. एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यास प्रती कुटुंब प्रतिवर्षी पाच लाख रुपयांचे आरोग्य संरक्षण दिले जाते. जिल्ह्यातील सर्व प्रकारचे रेशन कार्डधारक हे या योजनेचे लाभार्थी आहेत ज्या व्यक्तींकडे रेशन कार्ड नसेल व दहा वर्षांपासून महाराष्ट्र राज्यामध्ये वास्तव्य असेल ती व्यक्ती रहिवासी प्रमाणपत्राद्वारे देखील योजनेचा लाभ घेऊ शकते. यामुळे ही योजना योग्य पध्दतीने चालण्यासाठी स्थानिक नागरिकांचाही तितकाच प्रतिसाद मिळणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत रुग्णांना उत्कृष्ट पद्धतीचे उपचार मिळाले पाहिजेत तसेच रुग्णालयांचेही नुकसान होणार नाही या दृष्टीने दक्षता घेतली जात असल्याचेही डॉ. शेटे यांचे म्हणणे आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी शहरी भागामध्ये अर्बन फॉरेस्ट करणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; कार्तिकीची, वारी पंढरीच्या दारी या उपक्रमाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ नोव्हेंबर-**

वातावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढल्याने वातावरणात अनेक अनिष्ट बदल होत आहेत. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती सह प्रदूषणीय आपत्ती मध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून त्यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन अत्यंत म हत्त्वाचे आहे. नगर विकास विभागाच्या मार्फत राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती मध्ये अर्बन फॉरेस्ट हा उपक्रम राबवण्यात येणार असून यात नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पंढरपूर येथील शासकीय विश्राम गृहाच्या परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण विभाग व महाराष्ट्र सांस्कृतिक कला मंच ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी आयोजित 'कार्तिकीची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी उपमुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, गृह (शहरे), महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार समाधान आवताडे, आमदार तानाजी सावंत, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार शहाजी बापू पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सचिव एम. देवेंद्र सिंह उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री शिंदे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी प्रदूषण मंडळाच्या माध्यमातून पर्यावरण पूरक असलेल्या बांबू लागवडीचा उपक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आल्याचे सांगून पर्यावरण संवर्धनासाठी संपूर्ण राज्यभरात जनजागृती मोहीम राबवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते कार्तिकीची वारी, पंढरीच्या दारी या पर्यावरण शिक्षण उपक्रमाचा समारोप झाला.

प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव एम.डी. सिंह यांनी प्रस्ताविक केले तर आभार संजय भुस्कुटे यांनी मानले.




**राज्याच्या सर्वांगीण विकासाचे वारकरी व्हावे**

पर्यावरण संवर्धनासाठी नैसर्गिक शेतीकडे वळले पाहिजे याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी असेही आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. पर्यावरण पूरक विकासासाठी सर्वांनी सहभाग घ्यावा तसेच प्रत्येकाने राज्याच्या सर्वांगीण विकासाचे वारकरी व्हावे असेही आवाहन त्यांनी केले.

**लहानमुलांना वृक्ष संवर्धनाबाबत जागृत केले पाहिजे**

पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून लहान मुलांमध्ये पर्यावरण जागृती करण्यासाठी त्यांना शालेय जीवनापासूनच वृक्ष संवर्धनाचे महत्त्व याबाबत जागृत केले पाहिजे. पर्यावरणाचा सम तोल राखण्यासाठी जनजागृती शिवाय दुसरा पर्याय नाही. तसेच आषाढी व कार्तिकी वारी पुरते पर्यावरण जागृतीचा संदेश देण्याशिवाय संपूर्ण वर्षभर सातत्याने असे उपक्रम राज्यभरात घेण्यासाठी प्रदूषण मंडळ व पर्यावरण विभागाने नियोजन करावे, यासाठी आवश्यक सर्व प्रकारचे सहाय्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे शेतकऱ्यावर संकट**

राज्यातील शेतकऱ्यावर अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे मोठे संकट आलेले आहे, शासन सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकरी कर्जमाफीसाठी शासनाने समिती गठीत केलेली आहे. या संकटाच्या काळात जी तातडीची मदत करावयाची होती ते शासन शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करत असल्याचेही माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

**संस्कृती कला मंचच्या वतीने पर्यावरणाचा संदेश**

प्रारंभी संस्कृती कला मंचच्या वतीने किर्तन, भारुड, गोंधळ व पोवाडा या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कीर्तनकार प्रकाश खांडगे, मानसी बडवे, शैलजा खांडगे, योगेश चिकटगावकर, शाहीर प्रवीण जाधव यांचा सन्मान उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी उपमुख्यमंत्री तसेच सर्व मान्यवरांनी टाळ मृदंगाच्या गजरात पावली केली.

**रायगड किल्यापासून गडकिल्यांची स्वच्छता मोहीम**

राज्यातील सर्व गडकिल्ले ही खूप मोठी संपत्ती असून हे गड किल्ले स्वच्छ करण्याची मोहीम लवकरच रायगड किल्ल्यापासून करावी. प्रदूषण मंडळाने पर्यावरण समतोल तसेच जनजागृतीसाठी अद्यावत तंत्रज्ञान चा वापर करावा. सध्याचे कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत कुशल पद्धतीने करावा.

## महत्वाचे...



### सोपल इंग्लिश स्कूल शाळेला जिल्हास्तरीय उपक्रमशील पुरस्कार

**पांगरी, दि. २ नोव्हेंबर-**

शैक्षणिक कार्यास सोबत इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या बार्शी तालुक्यातील स्वर्गीय शोभाताई सोपल इंग्लिश स्कूल पांगरी या शाळेत जिल्हास्तरीय उपक्रम शील शाळा पुरस्कार ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेने देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी अंजली मराडे, व्याख्याते विशाल गरड, पी.आय. बालाजी कुकडे, अजित कुंकूलोळ, राहुल वाणी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्लास्टिक मुक्त शाळा, वृक्षारोपण, नैसर्गिक राखी प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, महिला दिन, सम ाजात कर्तुत्वान महिलांचा सन्मान, पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचे सत्कार इत्यादी कामाची दखल घेऊन सन्मानित केले आहे. संस्थापक व मार्गदर्शक विनायक गरड, मुख्याध्यापिका कुमारी सविता चांदणे व शाळेतील सर्व स्टाफ यांना शाल ट्रॉफी व प्रशासकीय पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या संस्थेला २०२३ ला आदर्श शाळा पुरस्कार मिळाला आहे.




### बार्शीत लोकमंगल परिवाराचा दिवाळी फराळ व स्नेहसंवाद सोहळा

**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**

लोकमंगल परिवाराच्यावतीने आयोजित केलेला दिवाळी फराळ व स्नेहसंवाद कार्यक्रम बार्शी येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात खातेदारांचा सन्मान केला. तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि स्वावलंबनासाठी लोकमंगल वित्तीय संस्थेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न होत असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. शासनाच्या विविध वैयक्तिक लाभ योजनांच्या माध्यमातून उद्योजक निर्माण करण्याचे कार्य लोकमंगल संस्थेकडून प्रभावीपणे राबवले जात आहे. समाजातील प्रत्येक घटक आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हा लोकमंगल समूहाचा ध्यास असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यासोबतच महिलांसाठी सुरु असलेल्या विविध योजना व उपक्रमांमुळे महिलांचा विश्वास समूहावर अधिक दृढ झाला असून, महाराष्ट्र शासनाच्या 'आई पर्यटन योजने' चा लाभ घेऊन महिला स्वावलंबी व्हाव्यात, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक युवराज कादे, पतसंस्था संचालक समाधान पाटील, जॉन चोप्रा, डॉ. भरत गायकवाड, सज्जन देशमुख उपस्थित होते.



### म्हसोबा मंदिराला महेश बिराजदारकडून ५१ हजारांची देणगी

**वळसंग, दि. २ नोव्हेंबर-**

रामपूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री म्हसोबा मंदिराचे बांधकाम सुरू करण्यात आले असून या पुण्य कार्यकर्ता युवा नेते महेश बिराजदार यांच्याकडून ५१ हजाराची देणे देण्यात आली. ही देणगी मंदिराच्या बांधकामासाठी वापरण्यात येणार असून गावकऱ्यांमध्ये याबाबत समाधान आणि आनंद व्यक्त केला जात आहे. देणगी देताना सिध्दप्पा मडीवाळ, भीमाशंकर कोरे, अमोगसिद्ध घोडके, बनसिद्ध गायकवाड, सूर्यकांत गायकवाड, विठ्ठल माळी, मल्लप्पा सुतार, रामचंद्र माळी, बाबू तिवारी, मल्लप्पा बगले, विकास गायकवाड, नागनाथ माळी, प्रशांत बनसोडे, सागर रामपुरे, गेनसिद्ध घोडके, महादेव रजपूत, युवराज सोनटक्के, कल्लप्पा परीट, महादेव परीट, नागनाथ तेली, मल्लिनाथ पटणे, नागेश तिवारी, शंकर शिवशट्टी, प्रभू माळी, सदाशिव कोरे, रामा कोरे, शशिकांत कोरे, महादेव गायकवाड, अशोक सुरवसे, म्हाळाप्पा सोनटक्के, शावरसिद्ध घोडके,प्रणव तिवारी, गौरीशंकर शिवशट्टी, सागर रेड्डी, प्रशांत रेड्डी, चिदानंद शिर्पनहळ्ळी उपस्थित होते.

### काशीनाथ भतगुणकी यांना शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

**श्रीक्षेत्र कपिलधार येथे बुधवारी वितरण**



ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक काशीनाथ भतगुणकी यांना शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ठ सेवाधारी संस्था पुरस्कार जाहीर झाला आहे. श्रीक्षेत्र कपिलधार येथे हा पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी हे पुरस्कार नुकतेच जाहीर केले आहेत. शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने श्री क्षेत्र कपिलधार तालुका जिल्हा बीड येथे होणाऱ्या मन्मथ माऊली शासकीय महापूजा व राष्ट्रीय वार्षिक मेळावा दर वर्षी आयोजित केला जातो.बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता या मेळाव्यात राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रातील वीरशैव लिंगायत समाजातील मान्यवरांचा शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

# सद्‌गुरु कारखान्याचा मोळी पूजन उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २ नोव्हेंबर-**

सोलापूर सांगली सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवर सद्गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या प्रेरणेने (राजेवाडी) श्री श्री श्रीनगर ता. आटपाडी या ठिकाणी गेली तेरा वर्ष शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांची जीवनमान उंचावण्यासाठी सुरू असलेल्या सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याच्या चौदाव्या गळीत हंगामाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमतः कारखान्याचे चेअरमन एन. शेषागिरी रावसर, व्हॉइस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील यांच्या हस्ते चंडी होमाचा विधीपूर्वक करण्यात आला.

कारखान्याचे कृषी विभागाचे श्री व सौ सुनील चव्हाण यांच्या हस्ते श्री सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्री संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज हभप बापूसाहेब देहूकर (मळोली) यांचे चेअरमन एन.शेषागिरी राव, व्हॉईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर उदय जाधव, कारखान्याचे सीएफओ रोहित नारा, संचालक मोहन बागल, उषा मारकड, श्रावण वाकसे, राजेवाडी विकास संस्थेचे चेअरमन रवींद्र शिरकांडे,, शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईकनवरे ( पंढरपूर), वस्ताद महादेव ठवरे, ज्योतीराम आवताडे, शाम तात्या मदने यांच्या उपस्थितीम ध्ये फटाक्यांच्या आतषबाजीत व तोफांच्या सलामीत व जय गुरुदेव या जयघोषामध्ये १४ व्या गळीत हंगामाचा मोळी पूजनाचा कार्यक्रम पार पडला. चेअरमन एन. शेषागिरी रावसर यांच्या अध्यक्षतेखाली म ान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून सद्गुरु श्री. श्री. रविशंकर जी तथा गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रसम ाला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर उदय जाधव यांनी केले. त्यानंतर जेष्ठ सभासद शामतात्या मदने, ज्योतीराम अवताडे, गणेश अवताडे तसेच शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईकनवरे यांनीही आपल्या सद्गुरु कारखान्याच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक करून केले. सदर प्रसंगी जयश्री वाकसे, काझी तसेच प्रसिद्ध बागायतदार संग्राम दुपडे, हिंगणी येथील काका माने, जनरल मॅनेजर सत्यनारायण रेड्डी, डीजीएम भगवान पाटील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सचिन खटके, दत्ता क्षीरसागर यांच्या टीमने परिश्रम घेतले. तर कारखान्याचे संस्थापक संचालक श्रावण वाकसे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन केन मॅनेजर सुनील सावंत व रघुनाथ देवकर यांनी केले.

# शाहीर अमर शेख साहित्य पुरस्काराचे शनिवारी वितरण

**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शी यांचेवतीने दरवर्षीप्रमाणे दिला जाणारा शाहीर अमर शेख साहित्य पुरस्काराचे वितरण शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी मातृ मंदिर ढगे मळा बार्शी येथे सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक श्री. राजेंद्र मिरगणे (माजी सहअध्यक्ष, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ कॅबिनेट मंत्री दर्जा) हे आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये हभप डॉ. जयवंत महाराज बोधले, उद्योजक संतोषकाका ठोंबरे, अध्यक्ष मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी, उद्योजक, विनयभाई संघवी आणि भारतीय आझाद कामगार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्राचार्य चंद्रहंस गंभीर उपस्थित राहणार आहेत. यावर्षी दुसऱ्या क्रमांकाचा गद्य विभागातील पुरस्कार विभागून दिला गेल्यामुळे एकूण पाच साहित्यिकांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. गद्य विभागाकरिता प्रथम पुरस्कार दौशाड डॉ. नंदकुमार राऊत, मुंबई यांचे आत्मकथनास मिळाला आहे. तर द्वितीय पुरस्कार मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास लेखक, डॉ. प्रवीण मुस्तूद व डी.पी. होता म्हणून नितीन शिंदे पुणे यांचे कादंबरी मिळाला आहे. पद्य विभागाकरिता गरुड भरारी कवी माधव पवार सोलापूर यांचे व शब्दांबर प्रा. जे. टी. जाधव यांचे काव्यसंग्रहास हे पुरस्कार मिळालेले आहेत. या साहित्य सोहळ्या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष पां. न. निपाणीकर, कार्याध्यक्ष डॉ. रविराज फुरडे, प्रमुख कार्यवाह प्रकाश गव्हाणे, उपाध्यक्षा, प्रा. प्रमिला देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. बी.आर. देशमुख आणि सहकार्याध्यक्ष प्रकाश महामुनी यांनी केले आहे.

# वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी देवदर्शन सहल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवणे हीच खरी सेवा या भावनेतून आस्था रोटी बँकतर्फे एक हृदयस्पर्शी आणि भक्तिमय उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत सोलापूर परिसरातील वृद्धाश्रमांतील आजी-आजोबांना तुळजापूर, अक्कलकोट, पंढरपूर आणि गाणगापूर या पवित्र स्थळांचे दर्शन घडविण्यात आले.

या उपक्रमाचे मार्गदर्शन आस्था रोटी बँकेचे संस्थापक विजयकुमार छंचुरे यांनी केले. त्यांच्या प्रेरणेतून बँकेचे कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि वृद्धांसाठी संपूर्ण सहलीचे नियोजन, वाहतूक, भोजन व निवास यांची उत्तम व्यवस्था केली. प्रवासादरम्यान फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी गरम चहा, नाश्ता, मध्यान्ह भोजन आणि पाण्याची सोय केली. यावेळी आस्था रोटी बँकेचे सदस्य छाया गंगणे, संगीता छंचुरे, विद्या सिंघम, विनोद भोसले, निसर्गा कुरकुट, समृद्धी छंचुरे, वासल्या आश्रमचे व्यवस्थापिका राधा शेटे, मंगलदृष्टी निराधार आश्रमचे व्यवस्थापिका रजनी भाटिया व आस्था रोटी बँकेचे विजय छंचुरे यांचे योगदान लाभलेले आहे.

# आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना गोधन दान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर -**

अतिवृष्टी आणि पुरामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांच्या संसारावर संकट कोसळलं. या संकटाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड येथील हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट यांच्या वतीने मराठवाड्यासाठी एक हात गोधन दानाचा या उपक्रमाचा शुभारंभ भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १०० गाईंचे गोदान पूजन रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.या उपक्रमामुळे किमान १०० शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलेल. यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की, देण्याची दानत ही फार कमी लोकांकडे असते आणि ही दानत असेल तर सर्व काही शक्य असते, हे उपक्रमाने आज दाखवून दिले आहे.

# अक्कलकोटमध्ये बोगस जातीच्या दाखल्यांचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ नोव्हेंबर-**

अक्कलकोट शहर व तालुक्यातील राजकीय नेत्यांकडे बनावट ,बोगस जातींचे दाखले मोठ्या प्रमाणात आहेत . मूळ लाभार्थी जातींच्या राजकीय हक्कावर अन्याय होत आहे. राजकीय नेत्यांच्या जातींच्या दाखल्यांची जात पडताळणी होणे अंत्यंत गरजेचे आहे. अनेक जात चोरांनी खोट्या जातीच्या दाखल्याचा वापर करून लाभ उठवला आहे. जात चोर राजकीय नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अक्कलकोट तालुक्यात जाता चोर पुढाऱ्यांनी कळस गाठला आहे. जात चोरून राजकीय लाभ उठवुन ती पचविण्यासाठी सर्व प्रकारच्या अडचणी पार करून उथळ माथ्याने फिरणारे महाभाग कमी नाहीत यामुळे अशाची संख्या दिवसागणिक वाढत आहे याम ुळे मुळ खऱ्या जातीच्या जनतेवर मोठा अन्याय होत असल्याची तक्रार व्यक्त केली जात आहे.

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले आहे. ओबीसी, एससी, सर्वसाधारण, एसटी प्रवर्गासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. या आरक्षणावर डोळा ठेवत अनेक राजकीय नेत्यांनी बोगस जातीचे प्रमाणपत्राद्वारे निवडणुकीत उतरण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. अक्कलकोट तालुक्यात अनेक राजकीय नेत्यांकडे तसेच प्रतिष्ठीत लोकांकडे बोगस जातींचे प्रमाणपत्र आढळले आहे. बोगस जातीचे प्रम ाणपत्र देणारी सोनेरी टोळी अक्कलकोट तालुक्यात कार्यरत आहे. बोगस जातीच्या दाखल्याप्रकरणी अनेक नेत्यांचीं चौकशी झाली आहे .अक्कलकोट तालुक्यात एससी , ओबीसी समाजाचे जातीचे दाखले हे सर्वसाधारण गटातील राजकीय नेत्यांकडे आहेत. बोगस जातीचे दाखले काढून मूळ लाभार्थी जातींवर अन्याय करण्याचा प्रयत्न राजकीय नेत्यांकडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायत पासून ते पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्या राजकीय नेत्यांकडे बोगस जातीचे दाखले असल्याची चर्चा रंगत आहे. काही राजकीय नेत्यांनी कर्नाटकातील राजकीय आरक्षणाचा संदर्भ देत बोगस जातींचे दाखले काढले आहेत.

अक्कलकोट शहर तालुक्यातील बोगस जातीच्या दाखल्यामुळे मूळ लाभार्थी जातींवर अन्याय होत आहे. राजकीय नेत्यांच्या जातीच्या दाखल्यांची चौकशी होणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या सर्वच उमेदवारांच्या जातीच्या दाखल्यांची जात प्रमाणपत्रांची पडताळणी होणे आवश्यक आहे. बोगस जातीचे दाखले आढळल्यास आजीवन कुठल्याही निवडणुकीस बंदी घालावी, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. बोगस जातींचे दाखले असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री वटवृक्ष मंदीराचा धार्मिक पर्यटन म्हणून उदय : आ. दरेकर

**अक्कलकोट, दि.२ नोव्हेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व स्वामींच्या वास्तव्यामुळे तिर्थक्षेत्र अक्कलकोटचा व वटवृक्ष मंदीराचा धार्मिक पर्यटन स्थान म्हणून उदय होत असल्याचे मनोगत भाजपचे नेते व आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास सहकुटूंब भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले नंतर बोलत होते. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी आमदार प्रवीण दरेकर व कुटूंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, मा.नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, प्रदीप पाटील, ननू कोरबू, नावीद डांगे इत्यादी भाजपचे पदाधिकारींसह दर्शन घाटगे, श्रीशैल गवंडी, सचिन हन्नूरे, विपूल जाधव उपस्थित होते.





**महत्त्वाचे**



**सोलापूर : मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेले पोलीस आयुक्त एम. राजकुमार, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे भोसले, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आदी.**

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरून पडून दोघे जखमी

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरून पडून दोघे जखमी झाले. मदन अरूण भोसले (वय २३, रा. कोयना नगर, देगाव रोड, सोलापूर) आणि अमर बबलू कदम (वय १९, रा. लाड वस्ती, बाळे स्टेशन, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. मदन भोसले व अमर कदम हे दोघे २ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमार दुचाकीवरून बाळे स्टेशन येथून सोलापूरकडे येत होते. त्यावेळी देगाव गावात अचानक दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरून दोघेही पडून डोक्यास मार लागून जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### सरपंच लक्ष्मी पुजारी यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**अक्कलकोट, दि. २ नोव्हेंबर-**

स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार सोहळा अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृहात उत्साहात पार पडला. या सोहळ्यात राज्यातील विविध जिल्हे व तालुक्यांमधील ४५ सरपंचांना गावपातळीवर उत्कृष्ट व यशस्वी कार्य केल्याबद्दल गौरविण्यात आले. त्यात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील गुरववाडी हे एकमेव गाव ठरले असून, त्या गावच्या महिला सरपंच लक्ष्मी माळप्पा पुजारी यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच या बहुमानाने सन्मानित करण्यात आले. सन्मान सोहळ्याला स्वराज्य सरपंच सेवा संघाचे अध्यक्ष रोहित पवार, सचिव बाबासाहेब पावसे, संस्थापक अध्यक्ष व समाजसेवक यादवराव पावशे, जिल्हा संपर्कप्रमुख अमोलजी शेवाळे उपस्थित होते. यावेळी लक्ष्मी माळप्पा पुजारी व गावचे विकासरत्न माळप्पा पुजारी यांचा सपत्नीक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. गुरववाडी गावातून सिद्धाराम पुजारी (गुड्डूद), श्रीमंत सावळी, महानंदा पुजारी व शिलवंती निंबाळ(मैंदर्गी) हे देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### फसवणूकप्रकरणी राजे अकॅडमीच्या संचालकाला सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर

**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

मंगळवेढा येथील रहिवासी व राजे सैनिक ॲकॅडमीचे संचालक सतीश मधुकर महामुनी (वय-३९ वर्षे रा. मंगळवेढा) एकास नोकरी लावतो म्हणून पैसे घेतल्या प्रकरणीच्या गुन्ह्यात, त्यांना जामिनावर मुक्तता करण्याचा आदेश पंढरपूर येथील सत्र न्यायालयाने पारित केला. संचालक सतीश महामुनी हे मागील बरेच वर्षापासून ते त्यांची ॲकॅडमी चालवतात. त्यामध्ये ते विद्यार्थीना नोकरी करिता भरती पूर्व प्रशिक्षण देण्याचे काम करतात. दिनांक २३/01/२०२३ रोजी तक्रारदार इकबाल इनामदार यांनी रुपये २५000/- भरून प्रवेश घेतला होता. परंतु त्यांना वनखात्यात भरतीसाठी सात लाखांची मागणी करण्यात आली. त्याप्रमाणे त्यांनी काही रक्कम जमा केली परंतु त्यानंतर दुसऱ्या व्यक्तीस सांगून राज्य- झारखंड, रांची येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवून स्वतः आठ लाख दहा हजार व युसुफ पाटील यांचे मार्फत पाच लाख असे १३ लाख १० हजार एवढी रक्कम घेऊन फिर्यादीस नोकरी नदिल्याच्या कारणावरून मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. त्यामध्ये सतीश महामुनी यांना दिनांक १९/0८/२०२५ रोजी अटक झाली होती. त्यांनी मंगळवेढा न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. त्यांचा जामीन अर्ज मंगळवेढा न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर त्यांनी पंढरपूर येथील सत्र न्यायालयात ॲड. शशी कुलकर्णी यांचे मार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी होऊन सरकारी वकिलांनी तपास अपूर्ण असल्याच्या कारणावरून जामीन अर्ज नामंजूर करण्याचा युक्तिवाद केला.त्यामध्ये संचालकांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, आरोपी बाबतचा तपास पूर्ण झाला आहे, तपासात काही निष्पन्न झाले नाही ,आरोपीची संस्था बरेच वर्षापासून विद्यार्थ्यांन साठी काम करीत आहे,आरोपीस यापुढे अटकेत ठेवता येणार नाही. या पृष्ठर्थ त्यांनी मा.सर्वोच्य न्यायालयाचा निवाडा सादर केला. संचालकाच्या तर्फेचा युक्तिवाद विचारात घेऊन पंढरपूर येथील सत्र न्यायालयाने रक्कम रुपये २५000/- चे जात मुचलक्यावर व पोलीस स्टेशन हजेरीच्या अटीवर जामीन अर्ज मंजूर केला. यात संचालका तर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. ओंकार बुरकुल, ॲड. प्रसाद अग्निहोत्री, ॲड. संकेत पवार यांनी काम पाहिले.

# कार्तिकी एकादशी निमित्त विठ्ठलाची नगरप्रदक्षिणा

## राही, रखुमाईसह विठुरायाची रथयात्रा; वारकऱ्यांची रस्त्यावर मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ नोव्हेंबर-**

कार्तिकी एकादशी निमित्त परंपरे प्रमाणे श्री विठ्ठलाची शहरातील नगरप्रदक्षिणा रस्त्यावरुन मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेचे दर्शन घेण्यासाठी वारकऱ्यांनी नगरप्रदक्षिणा रस्त्यावर मोठी गर्दी केली होती.

दरम्यान येथील माहेश्वरी (पूर्वीची खासगीवाले) धर्मशाळे पासून रविवारी दुपारी या रथयात्रेस सुरुवात झाली. त्या अगोदर माहेश्वरी धर्मशाळे मध्ये श्रीविठ्ठल, राही आणि रखुमाईंच्या मुर्तीवर सकाळी अभिषेक करुन विधीवत पुजा करण्यात आली. नातू, रानडे आणि देवधर या रथावरील मानकऱ्यांनी विठ्ठल, राहि आणि रखुमाईंच्या मुर्ती रंगीबेरंगी आकर्षक फुलांनी सजविलेल्या लाकडी रथावर नेवुन ठेवल्या. त्या नंतर या रथयात्रेस सुरुवात करण्यात आली.

ही रथयात्रा पाहण्यासाठी नगरप्रदक्षिणा मागार्वर वारकऱ्यांची तसेच स्थानिक नागरिकांची दुर्तफा गर्दी झालेली दिसत होती. ऱथयात्रेवर खारीक, बत्तासे आणि सुट्टे पैसे उधळण्याची परंपरा आहे. त्यामुळे बत्तासे आणि खारकांची विक्री करणारे बरेच विक्रेते या नगरप्रदक्षिणा रस्त्यावर रथ येण्या अगोदर विक्री करण्यासाठी फिरताना दिसत होते. रथ जवळ आल्यानंतर त्याचे दर्शन घेवून भाविकांकडून मोठ्या शध्देने त्यावर खारकांचा वर्षाव केला जात होता. अनेक भाविक, स्थानिक नागरिक नगरप्रदक्षिणा रस्त्यावरील असलेल्या मठ, धर्मशाळा तसेच घरांच्या गच्चीवरुन रथयात्रेचा हा सोहळा याचि देहि याचि डोळा पाहून श्री विठ्ठलाच्या दर्शनाने मनोमनी त्रुप्त होताना दिसत होते. दरम्यान माहेश्वरी धर्मशाळे पासून निघालेली ही रथयात्रा कालिकादेवी चौक, काळामारुती, चौफाळा, नाथचौक मार्गे पुढे पुढे मार्गक्रमण करीत होती. अखेर माहेश्वरी धर्मशाळेजवळ पुन्हा ही रथ यात्रा दाखल झाली. त्या नंतर या रथावरील उत्सवमुर्तीस पुन्हा धर्मशाळेत नेण्यात आल्या. त्या ठिकाणी पुन्हा या मुर्तिंची आरती होवून त्या मुळजागी पुन्हा ठेवण्यात आल्या. या नंतर या रथयात्रा उत्सवाची सांगता झाली. या वेळी भाविकांना प्रसादाचे देखील वाटप करण्यात आले.



**पंढरपूर : कार्तिकी एकादशी निमित्त श्री विठ्ठलाची शहरातील नगरप्रदक्षिणा मागार्वरुन रथयात्रा काढण्यात आली.**

**आषाढी, कार्तिकी यात्रेच्या वेळींच रथयात्रा**

आषाढी व कातिर्क एकादशी निमित्त लाखोंच्या संख्येने भाविक येथे येत असतात. सर्वच भाविकांना एकादशी दिवशी श्रीविठुरायांचे दर्शन घडत नसते. त्यामुळे आषाढी आणि कातिर्की एकादशीच्या सोहळ्यासाठी येथे आलेल्या प्रत्येकाला श्री विठ्ठलाचे दर्शन घडावे यासाठी बऱ्याच वर्षा पासून रथयात्रेचा उत्सव सरु करण्यात आलेला आहे. या रथयात्रे मध्ये श्री विठ्ठल, राही आणि रखुमाईच्या मुर्ती असतात.

## कार्तिकी एकादशीनिमित्त बार्शीत अभंगवाणी

### श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**

कार्तिकी एकादशीनिमित्त येथील श्री स्वामी समर्थ कला उपासक मंडळाच्यावतीने श्री भगवंत मंदिर येथे सकाळी ८-३0 ते ११ या वेळेत सुमधुर अशा अभंगवाणी या कार्यक्रमाची प्रस्तुती करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात वंदितो तुजला गजवदना या गीताने करण्यात आली.



या कार्यक्रमात मधुसुदन चांडक, सूर्यकांत वायकर, डॉ. मदन देगांवकर, अजित काळे, अमोल जोशी, कैवल्य सहस्त्रबुध्दे, रुपाली पवार, दिपाली शेटे, लक्ष्मी भंडारी, संगीता महिमाने, लक्ष्मी तोरड, काव्या पाटील, लावण्या पाटील यांनी आपले सुरेल सादरीकरण करताना ऊठ पंढरीच्या राजा, केशवा माधवा, बोलावा विठ्ठल, फिरत्या चाकावरती, राजस सुकुमार, छुन्नुक छुन्नुक टाळ वाजवी, चला हो पंढरीसी जाऊ, चंद्रभागेच्या तीरी, वृंदावनी वेणू, टाळ बोले चिपळीला, यमुनेच्या तीरी, पुसतो घोंगडी वाला, धन्य ती पंढरी, गुरुवीण नाही दुजा आधार, अरे कृष्णा अरे कान्हा, कानडा राजा, मन लागो रे, सुखाचे हे नाम, विठूरायाची पंढरी, खेळ मांडियेला, तुझी सेवा करीन मनोभावे अशा सुरेल गीतांनी वातावरण भक्तीमय करुन टाकले.

कार्यक्रमाची सांगता संत तुकाराम महाराजांच्या लई नाही मागणं या भैरवी रागातील अभंगाने करण्यात आली.

यावेळी सुहास जोशी, तुषार गदगी यांनी तबल्याची तर प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी हार्मोनियमची साथ केली. तसेच कमलेश कोटगुंड यांनी ध्वनीक्षेपणाचे काम पाहिले.

## महिला व बालविकास भवन उभारणीस गती

**माजी आमदार दीपक साळुंखे पाटील व सुभाष चव्हाण यांच्या प्रयत्नाला यश**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

सोलापूर येथे उभारण्यात येणाऱ्या महिला व बालविकास भवनाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. महिलांना व बालकांना मिळणाऱ्या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने हे भवन उभारण्यात येत आहे. यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला असून, कामाची गती वाढवण्यासाठी मी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मंजूर व्हावा यासाठी सुभाष चव्हाण यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी पाठपुरावा केल्यामुळे या कामास सुरवात होणार आहे.

या भवनात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कार्यालय, तीन नागरी प्रकल्प अधिकारी कार्यालये, महिला आर्थिक विकास महामंडळ कार्यालय, हिरकणी कक्ष, बैठक कक्ष, वूमन व चाईल्ड हेल्पलाईन, अभिलेख कक्ष आणि विश्रामगृह आदी सुविधा असणार आहेत. या सुविधेमुळे महिलांच्या सक्षमीकरणाला नवे बळ मिळेल, स्वयंसहाय्यता गटांचे काम सुलभ होईल, तसेच कौशल्य विकास, सल्ला सेवा आणि घरगुती हिंसा, छळ, अत्याचार यासंबंधी तक्रारींवर तात्काळ सहाय्य मिळेल. सोलापूर जिल्ह्यातील महिलांसाठी हे भवन सक्षमतेचे आणि सुरक्षिततेचे एक केंद्र ठरेल.

## १२ नोव्हेंबर पासून सिद्धनाथ जोगेश्वरी यात्रा

### सलग तीन दिवस धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी गावचे ग्रामदैवत श्री सिद्धनाथ जोगेश्वरी यात्रेस दिनांक १२ नोव्हेंबर पासून सुरुवात होणार असून यानिमित्त सलग तीन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक, क्रिडा व मनोरंजनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तांदुळवाडी ग्रामस्थांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे ग्रामदैवत श्री सिद्धनाथ जोगेश्वरी यात्रेचे आयोजन करण्यात आले असून १२,१३ व १४ नोव्हेंबर रोजी असे सलग तीन



दिवस यात्रेनिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक,मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते ११ लेझीम, ११ ते सायंकाळी पाच गजी ढोल, सायंकाळी सात ते दहा ह भ प राम महाराज अभंग वडापुरी यांचे कीर्तन, रात्री दहा वाजता पुष्पवृष्टी, अकरा ते बारा संगीत भजन, दिनांक १३ नोव्हेंबर रोजी पहाटे पाच वाजता श्रींची महापूजा, ग्रामस्थांचे नैवेद्य व महाप्रसाद, सायंकाळी सव्वा सात वाजता महाआरती, साडेसात ते दहा ह भ प संदीप महाराज मोहिते जुनोनी व इतर यांचे जुगलबंदी भारुड, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता भव्य दिव्य मुक्तपणे गुलालाची उधळण करत पालखी मिरवणुकीस सुरुवात, सायंकाळी सव्वा सात वाजता महाआरती, सायंकाळी साडेसात वाजता झंकार म्युझिकल ऑर्केस्ट्रा कोल्हापुर यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून प्रतिवर्षीप्रमाणे येणाऱ्या या यात्रेची उत्सुकता तांदूळवाडीकरांना लागून राहिली आहे. गुलालाची उत्साहात होणारी मुक्त उधळण यामुळे अवघे तांदूळवाडी श्री सिद्धनाथ जोगेश्वरीमय होऊन जात असते.

## शिक्षकांचा अपमान करणाऱ्या रीलवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ नोव्हेंबर-**

मास्तरड्या तुला शेतीमधल्या वांगाचं तरी कळतं का? असा अपमानास्पद शब्दप्रयोग असलेली रील सोशल मीडियावर पोस्ट केल्याप्रकरणी रविराज साबळे पाटील यांच्या विरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौजे ताडसौंदणे येथील दत्तात्रय सुरेश पाटील यांनी याबाबत पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, रविराज साबळे पाटील या नावाने फेसबुक अकाऊंटवरून संबंधित रील पोस्ट करण्यात आली होती. या वक्तव्यामुळे शिक्षक वर्गाचा अपमान झाला असून शिक्षक बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत, तसेच फिर्यादीसह स्थानिक समाजात अस्वस्थता निर्माण झाली आहे, असे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बोबडे करीत आहेत.

## आण्णा ग्रुपने बुजविले वैराग-माढा मार्गावरील खड्डे

### सार्वजनिक बांधकाम विभागाची असलेली निष्क्रीय अन् उदासीन भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २ नोव्हेंबर-**

सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या अधिकारातील वैराग माढा रस्त्यावर वैराग एसटी स्टॅंडपासून ते संतनाथ कारखान्यापर्यंत खड्डेच खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात होत होते. वारंवार मागणी करून सुद्धा या ठिकाणचे खड्डे बुजवले जात नव्हते त्यामुळे बांधकाम खात्याच्या निष्क्रीय कारभाराला त्रासून कंटाळून वैराग येथील आण्णा ग्रुपने स्वखर्चाने या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मोहीम हाती घेतल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यावर वारंवार अपघात होऊन काहींचे बळी गेलेले असतानाही निष्क्रीय आणि उदासीन सार्वजनिक बांधकाम विभाग दखल घेत नव्हता अखेर वैतागलेल्या ग्रामस्थांच्या सहभागातून येथील आण्णा ग्रुपचे अध्यक्ष वैजनाथ आदमाने व मेजर जगन्नाथ आदमने यांच्या पुढाकारातून रविवारी या रस्त्यावर मुरूम व खडी टाकून रस्ते दुरुस्तीचे काम चालू करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की वैराग ते माढा हा सतत रहदारी व गर्दीचा असणारा रस्ता आहे या रस्त्यावर विद्यामंदिर शाळा, नवीन मराठी विद्यालय, तुळशीदास जाधव प्रशाला, डेफिडेल इंग्लिश मीडियम स्कूल, रवी बाल संस्कार केंद्र, वैरागचा विस्तारित भाग, शिवाजीनगर परिसर असल्यामुळे या रस्त्यावरून शाळकरी मुलांची व नागरिकांची मोठी ये-जा असते. बाबासाहेब रेड्डी यांनी सार्वजनिक बांधकाम खाते व जिल्हा परिषद ग्रामीण यांच्याकडे हा रस्ता दुरुस्त करण्याची वारंवार लेखी मागणी केली होती. निवेदन देखील दिले होते तरी देखील या दोन्ही खात्याने या निवेदनाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे नागरिकांच्या या जीव घेण्या रस्त्याची वैराग येथील सामाजिक कार्यकर्ते व आण्णा ग्रुपने दखल घेतली व त्यांनी रस्त्यावर पडलेले खड्डे मुरूम टाकून बुजविण्यात आले असून त्यामुळे आण्णा ग्रुपचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

